# सन २०१३-१६ करिता

# ठोक पाणी वापराच्या

# दर निर्धारणाच्या निकषांकरिता

# दृष्टिनिबंध

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई (भारत)

मार्च २०१२

# अनुक्रमणिका


| प्रकरण क्र. | विषय | पृ.क्र |
|---|---|---|
| | प्रास्ताविक | (i) - (ii) |
| प्रकरण - १ | पार्श्वभूमी - सन २०१०-१३ प्रक्रियेचे संक्षिप्त वर्णन आणि सन २०१३-१६ साठीच्या प्रस्तावित दृष्टिनिबंधाचा सर्वसाधारण दृष्टिकोन | १ - ५ |
| प्रकरण - २ | सिंचन प्रणालीतील वहनव्यय आणि पाणी वापर कार्यक्षमता | ५५ - ६४ |
| प्रकरण - ३ | सिंचन व्यवस्थापनाचा प्रचालन व देखभाल खर्च | ७७ - ८१ |
| प्रकरण - ४ | प्राप्त सूचना आणि निश्चित केलेले मुद्दे | १०५ - १२१ |
| प्रकरण - ५ | आधारभूत सामुग्री | १२७ - १३४ |
| प्रकरण - ६ | आधारभूत माहितीचा सन २०१३-१६ साठी अंदाज | १३५ - १३६ |
| प्रकरण - ७ | ठोक जलदर निश्चितीची प्रस्तावित पध्दत (२०१३-१६) | १३९ - १४९ |
| | **परिशिष्टांची यादी** | |
| १.१. | ठोक जलदराबाबतचे निकष आणि सन २०१०-१३ साठी दरादेश पारित करणे - घटनाक्रम | ६ - ७ |
| १.२. | महाराष्ट्र राज्यासाठी ठोक पाणीप्रशुल्क निर्धारणाचे निकष | ९ - ५२ |
| १.३. | सन २०१३-१६ च्या दृष्टिनिबंधाच्या मसुद्याकरिता अभिप्राय दिलेल्या संबंधित विभाग/पाणीवापर गट/अशासकीय | ५३ |
| २.१. | सन २००७-०८ ते २००९-१० मध्ये वार्षिक सिंचित क्षेत्र प्रति एकक (हे. / दलघमी) | ६५ - ७३ |
| २.२. | राज्यातील निवडक मोठया प्रकल्पातील मुख्य कालव्यांची वहन कार्यक्षमता | ७४ - ७५ |
| ३.१. | पाटबंधारे विभागाच्या अधिपत्याखालील क्षेत्रिय आस्थापनेचा आढावा – आकृतीबंध निश्चित करणे. (पाटबंधारे विभाग शा.नि. दि. ६/२/२००३) | ८२ - ९१ |
| ३.२. | पाटबंधारे विभागाअंतर्गत बांधकाम व सिंचन व्यवस्थापन कार्यप्रकारामध्ये काम करणाऱ्या रुपांतरित अस्थायी आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांसाठी आकृतीबंध निश्चित करणेबाबत. (पाटबंधारे विभाग शा.नि. दि. २०/८/२००३) | ९२ - १०१ |

| प्रकरण क्र. | विषय | पृ.क्र |
| --- | --- | --- |
| ३.३ | देखभाल व दुरुस्ती चे २०१०-१३ करिता प्रस्तावित मापदंड जल व भूमि व्यवस्थापन संस्था अहवाल २००८ चा गोषवारा | १०२ - १०३ |
| ४.१. | खाजगी उपसा सिंचन योजनांसाठी मापदंड | १२२ |
| ४.२ | नागरी क्षेत्रात सांडपाण्याचे पुनर्चक्रीकरण व पुनर्वापराबाबत | १२३ - १२५ |
| ६.१ | बिगर सिंचन पाणी वापर दर्शविणारा आलेख (दलघमी) | १३७ |
| ७.१. | लघुवितरिका स्तरावरील पाणी वापर संस्थेकरिता कृषिवापराचे घनमापन दर परिगणित करण्याची पध्दत | १५० |

# प्रास्ताविक

१. विधानमंडळाने संमत केलेल्या कायद्यानुसार राज्य शासनाने ऑगस्ट २००५ मध्ये स्थापन केलेल्या महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने आपली पहिली जलदराची कार्यवाही मे २०११ मध्ये पूर्ण केली. विविध वापरकर्त्यां गटांसाठी सन २०१०-१३ करिता घनमापन दराचे आदेश निर्गमित केल्यानंतर हया कार्यवाहीची सांगता झाली. हे आदेश निर्गमित करण्यापूर्वी कायद्यातील कलम ११ (घ) नुसार लाभार्थीसमवेत सल्लामसलतीची गुंतागुंतीची तपशीलवार प्रक्रिया पार पाडून जून २०१० मध्ये प्राधिकरणाने ठोक पाणी प्रशुल्क निर्धारणाचे निकष निश्चित केले होते. कायद्यातील कलम ११ (प) नुसार प्राधिकरणाने दर तीन वर्षांनी पाणीपट्टीचे पुनर्विलोकन व पुनरिक्षण करणे आवश्यक आहे. अशा प्रकारे पाणीपट्टीतील पहिली सुधारणा २०१३-१६ कालावधीकरिता सन २०१३ मध्ये करावी लागणार आहे.

२. तीन वर्षांच्या कालावधीत पार पडलेली ही पहिली कार्यवाही, प्राधिकरणासाठी शिकवणुकीचा अनुभव देणारी ठरली. या अनुभवावर आधारित प्राधिकरणाने आधीच दर निश्चिती प्रक्रियेमध्ये अवलंबावयाच्या पध्दतीची रुपरेषा दर्शविणारे विनियम तयार केले आहेत. हे विनियम आता या दुसऱ्या दर कार्यवाहीकरिता वापरले जात आहेत. यातील पहिली पायरी दृष्टिनिबंध तयार करणे व तो प्रसारित करणे ही असून, विनियमानुसार हाच टप्पा सध्या पार पाडला जात आहे. विविध तज्ञ, अशासकीय संघटना, संबंधित शासन विभाग, पाणी वापर संस्था आणि ठोक पाणी वापरकर्ते यांना जून २०११ मध्ये केलेल्या आवाहनास मिळालेल्या प्रतिसादामधील सर्व अभिप्राय / सूचना विचारात घेऊन दृष्टिनिबंध तयार केला गेला आहे.

३. या दृष्टिनिबंधातील काही नवीन वैशिष्टये म्हणजे सिंचन प्रणालीतील वहनव्ययावर स्वतंत्र प्रकरणाचा अंतर्भाव, भारांकन कोष्टकातील घटकांच्या भारांकनात सुधारणा, आणि खर्चाच्या बाबी निश्चित करण्यासाठी सुधारित दृष्टिकोन ही होत. वहनव्ययाच्या अंदाजाकरिता कार्यक्षमतेबाबतची आधारभूत माहिती पडताळून वापरण्यात आली आहे. भारांकनातील सुधारणा मागणी व पुरवठयाच्या गतिमानतेबाबत प्राधिकरणास झालेल्या आकलनावर आधारित आहे आणि खर्चविषयक अभ्यासात सिंचन व्यवस्थापनाच्या खर्चातील मोठा वाटा असणाऱ्या आस्थापना खर्चाच्या बाबीवर विवेचन केले आहे.

पूर्वीच्या निकषातील बहुतेक सवलती कायम ठेवल्या आहेत. देखभाल दुरुस्तीच्या मापदंडाचा तज्ञ समितीच्या माध्यमातून वाल्मीने आढावा घेतला आहे. प्रचालन व परिरक्षण खर्चाचा सिंचन प्रयोजनाच्या वाट्याला आलेला भाग पुनर्विलोकित करुन हा बोजा अल्पप्रमाणात कमी करण्यात आला आहे.

४. पाण्याची गुणवत्ता उन्नत करणे आणि राखणे तसेच जलसंधारण यावर राज्यात आणखी खूप काम करणे आवश्यक आहे हे वेगळे सांगण्याची गरज नाही. या बाबींना पाठिंबा देण्यासाठी दराचे साधन वापरण्यास मर्यादित वाव असून राज्य शासनाने या दिशेने पुढे प्रयत्न जारी ठेवणे आवश्यक आहे. सिंचन व्यवस्थापनासंबंधी हे लक्षात घ्यावे लागेल की बहुतेक प्रश्नांवर - विशेषतः दीर्घ कालावधीचा उपाय म्हणून - पाणी वापर संस्थांची स्थापना व व्यवस्थापनाकरिता कालवे प्रणालीचे त्यांना हस्तांतरण हा चांगला पर्याय आहे. राज्याने याची सुरवात माफकरित्या केली आहे. परंतु प्रणालीच्या पुनर्स्थापनेकरिता आवश्यक निधी मिळण्यातील अडचणी पाहता या दशकांअखेर फक्त २० % सिंचित क्षेत्राचा भाग व्यवस्थापनाकरिता पाणी वापर संस्थांकडे हस्तांतरित करता येऊ शकेल असे दिसते. पाणी वापराची कमी कार्यक्षमता, चोरी आणि गळती / पाझर इ. प्रणालीतील व्यय यासारख्या बाबी या पार्श्वभूमीवर पाहणे आवश्यक आहे.

५. हा दृष्टिनिबंध व्यापकरित्या प्रसारित केला जात आहे आणि राज्यातील सर्व तालुका मुख्यालयांस उपलब्ध केला जात आहे. प्राप्त होणारे अभिप्राय व सूचनांवर आधारित निकषाचा मसुदा तयार केला जाईल आणि तो लाभार्थींशी सल्लामसलत आणि जाहीर सुनावणीचे वेळी मते व्यक्त करण्यासाठी प्रसारित केला जाईल. सर्व लाभार्थींनी दृष्टिनिबंध बारकाईने पहावा आणि दराच्या मुद्याशी संबंधित सूचनांसह पुढे यावे अशी माझी आग्रहाची विनंती आहे. त्यामुळे प्राधिकरणास लाभार्थींबरोबर व्यापक सल्लामसलती नंतर आणि पारदर्शक पध्दतीने निश्चित करावयाच्या निकषांवर आधारित दराचे आदेश (२०१३-१६ करिता) पारित करण्याचे उद्दिष्टय गाठणे शक्य होईल.

मुंबई
दि. ८ मार्च २०१२

**(ए. के. डी. जाधव)**
प्रभारी अध्यक्ष व सदस्य (अर्थ)

# प्रकरण - १
# पार्श्वभूमी
## सन २०१०-१३ प्रक्रियेचे संक्षिप्त वर्णन आणि सन २०१३-१६ साठीच्या प्रस्तावित दृष्टिनिबंधाचा सर्वसाधारण दृष्टिकोन

१.१ दि. ८/६/२००५ पासून अंमलात आलेल्या महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण (मजनिप्रा) अधिनियम २००५ नुसार महाराष्ट्र राज्यामधील जलसंपत्तीचे विनियमन करण्याकरिता, जलसंपत्तीचे कुशल, समन्यायी व टिकाऊ व्यवस्थापन, वाटप व वापर सुकर करण्याकरिता आणि त्यांची सुनिश्चिती करण्याकरिता कृषिविषयक, औद्योगिक, पिण्याच्या व इतर प्रयोजनांसाठी वापरावयाच्या पाण्याचे ठोक दर निश्चित करण्याकरिता आणि तत्संबंधीच्या बाबींचे विनियमन करण्यासाठी मजनिप्राची स्थापना करण्याची तरतूद आहे. त्यानुसार महाराष्ट्र शासनाने दि. १२/८/२००८ पासून मजनिप्राची स्थापना केली. जलक्षेत्रामध्ये अशा प्रकारे नियामक प्राधिकरण स्थापन करणारे महाराष्ट्र हे पहिलेच राज्य आहे.

१.२ ठोक जलदरासंबंधी अधिनियमातील कलम ११ (घ), ११ (द) आणि ११ (प) हे प्राधिकरणास असलेले अधिकार, कर्तव्ये व कार्ये यांच्याशी संबंधित आहेत.

*कलम (घ) प्रत्येक नदी खोऱ्यातील लाभार्थींच्या किंवा उपभोक्यांच्या मतांची खात्री करुन घेतल्यानंतर, सिंचन व्यवस्थापनाच्या प्रशासकीय कार्यचालन व परिरक्षणाच्या संपूर्ण खर्चाची वसुली परावर्तित होईल अशा तऱ्हेने पाण्याची दर (जल प्रशुल्क) पध्दती ठरविणे आणि उपखोरे, नदी खोरे आणि राज्यस्तरावरील पाणीपट्टी आकारण्याचे निकष ठरविणे.*

*कलम (द) राज्यातील जल व्यवस्थापनाचे कायमस्वरुपी प्रचालन व परिरक्षण तसेच वितरणव्यवस्था यांना कोणत्याही प्रकारे धोका पोहोचू नये याची खातरजमा करण्यासाठी विविध प्रकारच्या वापरांकरिता शासनाकडून देण्यात येणारे कोणतेही अंतर्गत अर्थसहाय्य आणि अशा अर्थसहाय्यातून किंवा शासकीय निधीतून नियमित पुरवला जाणारा निधी यांचा मेळ घातला जाईल याची सुनिश्चिती करणे.*

*कलम (प)	प्राधिकरण, दर तीन वर्षांनी पाणीपट्टीचे पुनर्विलोकन व पुनर्निरीक्षण करील.*

मजनिप्रा (सुधारणा व चालू ठेवणे) अधिनियम २०११, जो २२/४/२०११ रोजी प्रसिध्द झाला आहे त्यानुसार वरील पाण्याच्या दरांशी संबंधित कलमांमध्ये कोणतेही बदल करण्यात आलेले नाही.

१.३ सप्टेंबर २००७ मध्ये मजनिप्राने २०१०-१३ या पहिल्या नियंत्रण कालावधीसाठी दराबाबतचा प्रथम अभ्यास हाती घेतला. प्रारुप दृष्टिनिबंधावर तपशिलवार चर्चा घडविण्यासाठी लाभार्थींसमवेत सल्लामसलत प्रक्रिया हाती घेण्यात आली होती. सुधारित दृष्टिनिबंध आणि मसुदा निकष तसेच अंतिमतः दराबाबतच्या प्रस्तावाचा मसुदा सुध्दा लाभार्थींसमवेत व्यापक सल्लमसलतीनंतर अंतिम करण्यात आला. प्राधिकरणाने पहिले दर आदेश दि. ३०/५/२०११ रोजी (औद्योगिक आणि कृषी वापरासाठी घनमापक ठोक जलप्रशुल्क) आणि दि. २९/६/२०११ रोजी (प्राधिकरणाच्या मान्यतेनंतर जलसंपदा विभागाने) सिंचनासाठीचे क्षेत्राधारित दर आदेश निर्गमित केले. या पहिल्या दर आदेशाचा घटनाक्रम दर्शविणारे **परिशिष्ट १.१** सोबत जोडले आहे.

१.४ जून २०१० मध्ये अंतिम केलेल्या आणि जलसंपदा विभागाने केलेल्या दराबाबतच्या प्रस्तावाचा आधार असलेले २०१०-१३ साठीचे ठोक जलप्रशुल्क निर्धारणाचे निकष **परिशिष्ट १.२** मध्ये जोडले आहेत. या निकषांच्या भाग ३ मधील तरतुदीनुसार निकषांचा कार्यकाल ३ वर्षांसाठी म्हणजेच जून २०१३ अखेरपर्यंत असणार आहे. त्या पुढील नियंत्रण कालावधीसाठी पाण्याच्या दराचे पुनर्विलोकन आणि सुधारणा हाती घेण्यापूर्वी प्राधिकरणास संबंधित विनियमात विहित केलेल्या तरतुदींनुसार निकषांचे पुनर्विलोकन आणि सुधारणा करणे आवश्यक आहे.

१.५ सन २०१० ते १३ साठीचे दर निश्चित करण्यासाठी अनुसरलेली पध्दत, जलदराचे निकष निर्धारित करणे, ठोक जलप्रशुल्क आदेश निर्गमित करण्यासाठी व मसुदा विनियम तयार करण्यासाठी उपयुक्त ठरली. सन २०१३-१६ साठीच्या नव्याने हाती घेतलेल्या दराबाबतच्या अभ्यासामध्ये राज्य शासनाच्या मान्यतेसाठी जलसंपदा

विभागास सादर केलेल्या या विनियमांचा आधार घेण्यात आलेला आहे. विनियमात नमूद केलेले प्रक्रियेचे विविध टप्पे खालील प्रमाणे आहेत -

१) सल्लागार / तज्ञ समिती / अथवा प्राधिकरणाने स्वत: मसुदा दृष्टिनिबंध तयार करणे.

२) संबंधित (शासन) विभाग, पाणीवापर संस्था, अशासकीय संधटना आणि तज्ञ यांना मसुदा दृष्टिनिबंध पाठविणे आणि प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर (www.mwrra.org) तसेच सर्व तालुका मुख्यालयांस मसुदा दृष्टिनिबंध लोकांना उपलब्ध करणे.

३) दृष्टिनिबंधावर प्राप्त अभिप्रायांनुसार मसुदा ठोक जलदर निकषाचे प्रारुप तयार करणे आणि लाभार्थीसमवेतच्या सल्लामसलतीसाठी ते वितरित करणे.

४) मसुदा निकषांवर लाभार्थींची मते जाणून घेण्याकरीता सर्व महसूल विभागीय मुख्यालयांचे ठिकाणी जनसुनावणी घेणे.

५) निकष अंतिम करणे आणि जलसंपदा विभागास ठोक जलप्रशुल्क प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना देणे.

६) ठोक जलप्रशुल्क प्रस्तावाची छाननी करणे आणि जलसंपदा विभागास तो सर्व तालुकास्तरावर उपलब्ध करण्याचे आणि तो संक्षिप्त स्वरुपात वृत्तपत्रात प्रसिध्दीस देण्याचे निदेश देणे.

७) प्राप्त अभिप्रायांवर आधारित दरादेश अंतिम करणे व पारित करणे.

१.६ प्राधिकरणाने, संबंधित विभाग, पाणीवापर गट, अशासकीय संस्था आणि तज्ञ यांजकडून अभिप्राय मागविल्यानंतर दृष्टिनिबंधाचा प्रारुप बनविण्याचे निश्चित केले. टप्याटप्याने दृष्टिनिबंध तयार करीत जाण्याची ही पध्दत एका अशासकीय संघटनेच्या सूचनेला धरुन आहे. या सध्याचे प्रकरणात सुरवातीच्या तयारीतच लाभार्थींच्या सहभागाची निश्चिती होते आणि त्यायोगे अंतिम उपलब्धी अधिक चांगल्या रितीने स्वीकारार्ह ठरते. त्यानुसार दि. ६/७/२०११ रोजी सर्व संबंधितांना

एक पत्र पाठवून मसुदा दृष्टिनिबंधात समावेश करण्याचे मुद्दे मागविण्यात आले. एका इंग्रजी व ३५ जिल्हांच्या ठिकाणच्या प्रमुख मराठी वृत्तपत्रातही दृष्टिनिबंधाच्या मसुद्यात अंतर्भूत करण्याचे मुद्दे सुचविण्यासाठी जाहिरात दिली होती. याकरिता दि. ३१/८/२०११ पर्यंत अभिप्राय / सूचना पाठविण्याची मुदत देण्यात आली होती.

१.७ काही तज्ञ, महानगरपालिका व अशासकीय संघटनांकडून प्रतिसाद मिळाला. **परिशिष्ट १.३** मध्ये ज्यांनी अभिप्राय दिले आहेत अशा व्यक्ति / संघटनांची यादी जोडली आहे. दि. १५/११/२०११ रोजी पुणे येथे जलसंपदा विभागाच्या संबंधित मुख्य अभियंता / अधीक्षक अभियंता बरोबर एक बैठक घेण्यात आली ज्यामध्ये बऱ्याच सूचना प्राप्त झाल्या. या सूचनांवर योग्य ठिकाणी संबंधित प्रकरणात जरी उहापोह केला असला तरी त्यातील एका अशासकीय संघटनेच्या सूचनेची येथे दखल घ्यावीशी वाटते ती म्हणजे, नवीन दराचा अभ्यास, २०१५-१६ पर्यंत म्हणजे जोपर्यंत पहिल्या दरादेशाचा परिणामाचे मूल्यमापन हाती येईपर्यंत, लांबवावा. कायद्यानुसार दर तीन वर्षांनी दराचे पुनर्विलोकन व सुधारणा करणे बंधनकारक आहे. त्यानुसार २०१३ साली सुधारणा लागू होते. ती २०१६ पर्यंत लांबविणे म्हणजे कायद्याचे उल्लंघन ठरेल. जरी आधीच्या दरादेशाच्या परिणामाच्या मूल्यमापनाच्या मुद्यांमध्ये तथ्य असले तरी दरासंबंधीच्या नव्याने करावयाच्या अभ्यासाबरोबर ते करण्याचा प्रयत्न राहील.

कोणत्याही परिस्थितीत, २०१३ पासून लागू होणारे नवीन दरादेश पारित करण्यापूर्वी सन २०१०-११ आणि कदाचित २०११-१२ चे सुध्दा संपूर्ण चित्र स्पष्ट होईल. विविध सवलतीचा विशेषतः कृषी क्षेत्रातील परिणाम त्यासाठी अशा सवलतींचा ३-४ वर्षे अवलंब करणे अटळ असल्यामुळे प्राप्त होण्यास काही कालावधी लागणारच. वहनव्ययासारख्या बाबींसंबंधी दृष्टिनिबंधामध्ये योग्य ठिकाणी विवेचन केलेले आहे.

१.८ अधिनियमातील कलम ११ (घ) नुसार प्राधिकरणाने खोरे, उपखोरे व राज्यस्तरावर जल प्रशुल्काचे निकष ठरवायचे आहेत. सन २०१०-१३ चे निकष, खोरे / उपखोरे याऐवजी राज्यस्तरावर निश्चित केले आहेत म्हणजेच संपूर्ण राज्यात याबाबत एकच निकष वापरले आहेत. याचे मुख्य कारण हे आहे की, पाटबंधारे विकास महामंडळे खोरेनिहाय महसूल स्त्रोत असणारे स्वतंत्र आर्थिक रुपात म्हणजेच नदीखोरे

अभिकरणामध्ये सध्याच्या पाटबंधारे विकास महामंडळाचे रुपांतर झालेले नाही. ही परिस्थिती अद्यापही बदलली नसल्याने राज्यभर २०१३-१६ साठी एकसारखे दर ठरविण्याचा प्राधिकरणाचा प्रस्ताव आहे. त्यानुसार २०१३-१६ साठीचे निकष राज्यस्तरावर एकच बनविण्यात येत आहेत.

१.९ या पार्श्वभूमी प्रकरण-१ खेरीज दृष्टिनिबंधाच्या मसुद्यामध्ये अन्य सहा प्रकरणे आहेत ती संक्षिप्तपणे खालीलप्रमाणे आहेत:-

प्रकरण २ : विविध स्त्रोतांकडून मिळालेल्या माहितीच्या संकलनावर आधारित राज्यातील **सिंचन प्रणालीतील वहनव्यय आणि पाणी वापर कार्यक्षमता**.

प्रकरण ३ : वाल्मीच्या सुधारित अभ्यासानुसार देखभाल दुरुस्तीच्या निकषांसह **सिंचन व्यवस्थापनाचा प्रचालन व देखभाल खर्च** आणि शासनाच्या प्रचलित आदेशांनुसार आस्थापना मापदंड.

प्रकरण ४ : संबंधित शासकीय विभाग, पाणीवापर गट, अशासकीय संघटना आणि तज्ञांकडून **प्राप्त सूचना आणि निश्चित केलेले मुद्दे**.

प्रकरण ५ : सन २०१३-१६ च्या जलदर अभ्यासाशी संबंधित कृषि सिंचन, घरगुती आणि औद्योगिक पाणीवापराची **आधारभूत सामुग्री**.

प्रकरण ६ : पाणीवापराचे अनुमान ठरविण्याची पध्दती आणि सिंचनक्षमता, आस्थापना खर्च यासारख्या इतर **आधारभूत माहितीचा सन २०१३-१६ साठी अंदाज**.

प्रकरण ७ : परिरक्षण व प्रचालन खर्चाचे तीन पाणीवापर वर्गांमध्ये विभागणी करण्याची पध्दत आणि घनमापन दर व क्षेत्राधारित (कृषि वापराकरिता) **ठोक जलदर निश्चितीची प्रस्तावित पध्दत (२०१३-१६)**

१.१० सन २०१०-१३ चे पूर्वीच्या दृष्टिनिबंधामध्ये ठोक जल दरासंबंधी आंतरराष्ट्रीय अनुभव, पाणीपट्टी दर आकारणी संदर्भात विविध समित्यांच्या शिफारशी, ठोक पाणी पुरवठा क्षेत्रासाठी राज्यातील कायदेशीर चौकट, जलसंवर्धन आणि पुर्नवापराची आधुनिक तंत्रे आणि अन्य राज्यातील जलदर या सारख्या प्रकरणांना व्यापक स्थान देण्यात आले होते. आताच्या दृष्टिनिबंधामध्ये या विषयाचा संदर्भ देण्याबाबत कोणत्याही सूचना मिळालेल्या नाहीत म्हणून या प्रकरणांची पुर्नरावृत्ती या दृष्टिनिबंधात केलेली नाही.

**परिशिष्ट १.१**
**(परिच्छेद १.३)**

## ठोक जलदराबाबतचे निकष आणि सन २०१०-१३ साठी दरादेश पारित करणे

**घटनाक्रम**

| | | |
|---|---|---|
| १. | ठोक जलदर निश्चितीसाठी नियुक्त करावयाच्या सल्लागाराच्या अटी व शर्ती याचा मसुदा संबंधित विभाग, पाणीवापर गट, अशासकीय संघटना यांना वितरित | सप्टेंबर-नोव्हेंबर २००७ |
| २. | ठोक जलदर निकष तयार करण्यासाठी सल्लागारांकडून स्वारस्य अभिव्यक्ती (EoI) बोलाविण्याची जाहिरात | २८ जानेवारी,२००८ |
| ३. | निविदांची छाननी व निविदा स्वीकृती | फेब्रुवारी-मार्च २००८ |
| ४. | काम सुरु करण्याचे ए.बी.पी.एस. सल्लागारास आदेश | ३१ मार्च २००८ |
| ५. | देखभाल, दुरुस्तीच्या मापदंडाबाबत वाल्मीकडून अहवाल प्राप्त | जुलै २००८ |
| ६. | सल्लागाराकडून दृष्टिनिबंधाचा मसुदा सादर | १९ सप्टेंबर २००८ |
| ७. | दृष्टिनिबंधाचा मसुदा संबंधित विभाग,पाणीवापर गट, अशासकीय संघटना व तज्ञ व्यक्तिंना पाठविला | ऑक्टोबर २००८-जानेवारी २००९ |
| ८. | दृष्टिनिबंधाच्या मसुद्यावर सल्लामसलतीसाठी खालील ९ ठिकाणी बैठकांचे आयोजन | |
| | १) मुंबई | ५/०२/२००९ |
| | २) पुणे | १२/२/२००९ |
| | ३) पेण | १७/२/२००९ |
| | ४) औरंगाबाद | २०/२/२००९ |
| | ५) अमरावती | २५/२/२००९ |
| | ६) नागपूर | २६/०२/२००९ |
| | ७) कोल्हापूर | २५/५/२००९ |
| | ८) ओरोस | २६/५/२००९ |
| | ९) नाशिक | १५/६/२००९ |
| ९. | सल्लागाराकडून दृष्टिनिबंध मसुद्यामध्ये सुधारणा व निकषाचा मसुदा तयार करण्याचे काम | जुलै-ऑगस्ट २००९ |

| | | |
|---|---|---|
| १०. | ए.बी.पी.एस. कडून सुधारित दृष्टिनिबंध सादर आणि निकषाचा मसुदा प्राधिकरणाकडून अंतिम | सप्टेंबर २००९ |
| ११. | सुधारित मसुदे संबंधित विभाग, पाणीवापर गट, अशासकीय संघटना, तज्ञ यांना वितरित आणि मराठी प्रतीची तालुकास्तरावर उपलब्धी | ऑक्टोबर- डिसेंबर २००९ |
| १२. | सुधारित दृष्टिनिबंध आणि निकषाच्या मसुद्यावर पुणे येथे राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजन | २१ जानेवारी २०१० |
| १३. | सुधारित मसुद्यांवर सल्लामसलतीसाठी खालील ६ महसूल विभागाच्या मुख्यालयी बैठकांचे आयोजन | |
| | १) अमरावती | १६/०२/२०१० |
| | २) औरंगाबाद | २२/२/२०१० |
| | ३) नाशिक | २३/२/२०१० |
| | ४) नवी मुंबई | २/३/२०१० |
| | ५) पुणे | ३/३/२०१० |
| | ६) नागपूर | २/४/२०१० |
| १४. | ठोक जलदर निर्धारणाचे निकष प्राधिकरणाकडून अंतिम व जलसंपदा विभागास दर प्रस्ताव तयार करण्यासाठी निर्गमित | जून २०१० |
| १५. | जलसंपदा विभागाकडून दर प्रस्ताव प्राप्त | डिसेंबर २०१० |
| १६. | प्राधिकरणाकडून दर प्रस्तावास तपासणी अंती मान्यता व जलसंपदा विभागास प्रस्ताव जनतेच्या सल्लामसलतीकरिता निर्गमित | जानेवारी २०११ |
| १७. | वृत्तपत्रांत दर प्रस्तावास प्रसिध्दी आणि प्रस्तावाच्या प्रती तालुका पातळीवर उपलब्ध | मार्च २०११ |
| १८. | लोकांच्या अभिप्राय/सूचनांवर जलसंपदा विभागाचे अभिप्राय प्राप्त आणि काही अशासकीय संघटनांसमवेत बैठक | मे २०११ |
| १९. | घनमापन दर आदेश प्राधिकरणाकडून निर्गमित | ३० मे २०११ |
| २०. | क्षेत्राधारित दर आदेश जलसंपदा विभागाकडून निर्गमित | २९ जून २०११ |

**परिशिष्ट १.२**
**(परिच्छेद १.४)**

# महाराष्ट्र राज्यासाठी ठोक पाणीप्रशुल्क निर्धारणाचे निकष

## (सुधारित अंतिम मसुदा)

**भाग-३**

***सादरकर्ता:***

## महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण

मे २०१०

(वितरणासाठी)

# महाराष्ट्र राज्यासाठी ठोक पाणी प्रशुल्क निर्धारणाचे निकष

## १.० पार्श्वभूमी :

१.१ महाराष्ट्र राज्यातील जलसंपत्तीचे विनियमन करण्याकरिता, जलसंपत्तीचे कुशल समन्यायी व शाश्वत व्यवस्थापन वाटप व वापर सुकर करण्याकरिता आणि त्याची सुनिश्चिती करण्यासाठी महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन अधिनियम, २००५ करण्यात आला. अधिनियमान्वये आवश्यक म्हणून राज्य शासनाने क्र.२००५/(७२/०५)/१/ डब्ल्यूआरआय, दि. ८/६/२००५ च्या राजपत्राद्वारे, त्याच दिनांकाला अधिनियम अंमलात आणला आणि २००५/७८/०५, दि. १२/८/२००५ या अधिसूचनेद्वारे अधिनियमात नमूद केलेली प्रयोजने पार पाडण्याकरिता प्राधिकरणाची स्थापना केली.

१.२ प्राधिकरणाचे एक कर्तव्य म्हणून कलम ११ (घ) नुसार प्राधिकरणास लाभार्थींच्या मतांची खात्री करुन घेतल्यानंतर सिंचन व्यवस्थापनाच्या प्रशासकीय कार्यचालन व परिरक्षणाच्या संपूर्ण खर्चाची वसुली परावर्तीत होईल अशा त-हेने पाण्याची प्रशुल्क पध्दती ठरविणे व पाणीपट्टी आकारण्याचे निकष ठरवणे हे प्राधिकरणाचे एक कार्य आहे.

१.३ या कार्याचे कारणार्थ प्राधिकरणाने, प्रथम ठोक जलदर निश्चितीसाठी विकसित करावयाच्या निकषावरचा दृष्टिनिबंधाचा मसुदा तयार करण्यासाठी एका सल्लागाराची नेमणूक केली. त्यानंतर हा मसुदा ऑक्टोबर २००८ मध्ये लाभार्थी, संबंधित विभाग, पाणीवापरकर्ते आणि स्वयंसेवी संघटना यांचे अभिप्राय व भाष्य विचारात घेण्यासाठी वितरित केला. प्राधिकरणाने त्यानंतर फेब्रुवारी ते जून २००९ मध्ये राज्यांत नऊ विविध ठिकाणी यावर वापरकर्त्यासोबत सल्लामसलत बैठका आयोजित केल्या. या बैठकांमध्ये केलेले भाष्य आणि त्यामध्ये व्यक्त केलेली मते यावर आधारित प्राधिकरणाने सुधारित दृष्टीनिबंध तसेच त्यावर आधारित जलदर निश्चितीच्या निकषाचा मसुदा तयार केला. तद्नंतर सुधारित दृष्टिनिबंध व निकषाचा मसुदा ऑक्टोबर-नोव्हेंबर २००९ मध्ये राज्यात लाभार्थी, संबंधित विभाग, जलतज्ञ आणि प्रमुख अशासकीय संघटना यांना त्यांचे अभिप्राय घेण्याचे दृष्टिने

वितरित केला. त्यानंतर प्राधिकरणाने पुणे येथे दि. २१ जानेवारी २०१० रोजी एक राज्यस्तरीय कार्यशाळा घेतली. ही कार्यशाळा तज्ञगट स्थापून त्यांचेशी, प्रमुख लाभार्थी, अशासकीय संघटना यांचे प्रतिनिधी व इतर तज्ञ यांच्या चर्चेच्या माध्यमातून पार पडली. ज्यामध्ये त्यांनी सुधारित दृष्टिनिबंधावर आपले विचार व मते मांडली. यानंतर प्राधिकरणाने फेब्रुवारी ते एप्रिल २०१० या कालावधीत विभागातील लाभार्थींची सुधारित दृष्टिनिबंध व जलदर निकष-मसुदा यावर मते आजमाविण्याकरिता सहा महसूल विभागाच्या मुख्यालयीसुध्दा जनसुनावण्या घेतल्या. त्या घेण्यापूर्वी सुधारित दृष्टिनिबंध व जलदर निकष-मसुदा यांच्या प्रती राज्यातील सर्व तालुका स्तरावरील शासकीय कार्यालयात सर्वसामान्यांसाठी मराठीमध्ये उपलब्ध केल्या होत्या. या सल्लामसलत प्रक्रियेतून प्राप्त झालेल्या अभिप्रायांवर आधारित प्राधिकरणाने ठोक जलदर निकष अंतिम केले आहेत यास अंतीम स्वरुप दिल्यावर "ठोक जल दराचे निकष" राज्य शासनाकडे २०१० ते २०१३ या तीन वर्षाच्या कालावधीकरिता, या निकषानुसार जलदराचे प्रस्ताव तयार करुन प्राधिकरणास सादर करण्यासाठी पाठविण्यात येतील.

## २.० ठोक जलदर निकषाची व्याप्ती :

२.१ अधिनियमाच्या प्रास्ताविकात उल्लेख केल्याप्रमाणे या निकषाची व्याप्ती कृषि विषयक, औद्योगिक व पिण्याचे पाणी या तीन प्रवर्गाकरिता राज्यातील ठोक जलदराचे निकष निर्धारित करण्यापुरती मर्यादित आहे. कृषिवापरासाठी क्षेत्राधारित जलदराची तत्वेसुद्दा निकषामध्ये अंतर्भूत केली जातील.

## ३.० ठोक जलदर निकषाची विधीग्राह्यताः

ठोक जलदर निकषाचा विधिग्राह्यता कालावधी तीन वर्षांकरिता राहील व हे निकष ३० जून २०१३ पर्यंतच्या नियंत्रण कालावधीस लागू राहतील. त्यानंतरच्या नियंत्रण कालावधीसाठी ठोक जलदराचा आढावा व सुधारणा करण्यापूर्वी आवश्यकतेनुसार

ठोक जलदर निकषाचे पुनर्विलोकन व सुधारणा व त्याबाबतच्या विनियमातील तरतुदींनुसार करण्याचे काम प्राधिकरण हाती घेईल.

**४.० व्याख्याः**

(क) **"अधिनियम"** याचा अर्थ महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम २००५ असा आहे.

(ख) **"कृषि वापरकर्ता"** याचा अर्थ राज्यातील जलाशय/कालवा/वितरिका/लघु वितरिका तरावरील कोणत्याही पाणीवापर संस्थांमधून पाणी वापरतो किंवा जेथे पाणीवापर संस्था स्थापन झाली नसेल किंवा स्थापन होऊन कार्यान्वयीत झाली नसेल तेथे ज्यास पीकवृध्दीसाठी प्रकल्प अधिकाऱ्यांकडून पाणी पुरविले जाते, असा वैयक्तिक शेतकरी.

(ग) **"प्राधिकरण"** याचा अर्थ महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण असा आहे.

(घ) **"मूळदर"** (पायाभूत दर) हा कोणत्याही प्रवर्गासाठीच्या वापदारासाठी रबी हंगामासाठीचा लागू असलेला घनमापन पध्दतीचा दर असा आहे.

(ङ) **"ठोक जल"** याचा अर्थ जलसंपदा विभागाने अथवा पाटबंधारे विकास महामंडळाने बांधलेल्या व त्याचेद्वारे प्रचालन करण्यात येत असलेल्या राज्यातील जलाशयामधून/कालवे प्रणालीमधून प्रवाही अथवा उपसा पध्दतीने कृषी/घरगुती/औद्योगिक वापरकर्त्यांना पुरविलेले पाणी किंवा जलसंपदा विभाग/पाटबंधारे विकास महामंडळ यांनी अशा वापरकर्त्यांना राज्यातील नियंत्रित नद्या आणि त्यांच्या उपनद्यांमधून अथवा नैसर्गिक पाणीसाठे, तलाव यामधून प्रवाही अथवा उपसा पध्दतीने वापरण्यास उपलब्ध केलेले पाणी होय. तसेच यामध्ये जलवापरकर्ते/ उद्योग यांनी बांधण्यात व प्रचालन करण्यात येणाऱ्या जलाशयामधून घेतलेले पाणी अथवा नैसर्गिक पाणीसाठे, तलाव यामधून त्यांचे स्वखर्चाने बांधलेल्या आणि प्रचालन करण्यात येणाऱ्या

बांधकामातून प्रवाही अथवा उपसा पध्दतीने घेतलेले पाणी याचासुध्दा समावेश होतो.

(च) **"ठोक जल दर"** याचा अर्थ आकारणीच्या वेळी लागू असलेल्या प्राधिकरणाने निर्गमित केलेल्या घनमापन पध्दतीच्या जलदरासंबंधी आदेशानुसार जलसंपदा विभागाने ठोक जलवापर कर्त्यांवर आकारलेला दर, असा होय.

(छ) **"वसुलीची कार्यक्षमता"** याचा अर्थ, थकबाकी वगळता, ठोक जल वापरकर्त्यांकडून प्राप्त झालेला महसूल व केलेली जलदराची आकारणी याचे गुणोत्तर होय.

(ज) **"नियंत्रण कालावधी"** याचा अर्थ जल दर लागू करण्यासाठीचा कालावधी, म्हणजेच १ जुलै २०१० ते ३० जून २०११, १ जुलै २०११ ते ३० जून २०१२ व १ जुलै २०१२ ते ३० जून २०१३ या तीन सलग जल वर्षाचा कालावधी होय.

(झ) **"लागवडीलायक क्षेत्र"** म्हणजे योजनेचे असे क्षेत्र की ज्यावर सिंचन प्रकल्पांद्वारे सिंचन करता येईल व ते लागवडीसाठी योग्य असेल.

(ञ) **"घरगुती वापरकर्ते"** याचा अर्थ ज्यांना जलसंपदा विभागाने / पाटबंधारे विकास महामंडळाने प्रक्रिया केलेले अथवा प्रक्रियारहित ठोक जल उपलब्ध केले आहे असे वापरकर्ते (ग्रामपंचायत, स्थानिक नागरी संस्था, महानगरपालिका, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण इत्यादी).

(ट) **"अवर्षण"** म्हणजे राज्य शासनाने 'अवर्षण' म्हणून जाहीर केलेला असा कालावधी की, ज्यांत पीकवाढीच्या हंगामात जेव्हा मातीची आर्द्रता व पर्जन्यमान पिकाच्या निरोगी वाढीसाठी अपुरे ठरते व त्यामुळे पिकांवर ताण येवून त्याची वाढ खुंटते.

(ठ) **"ऊर्जा भार"** याचा अर्थ पाण्याच्या वापराकरिता परवानाधारक वीज वितरण संस्थेकडून ठोक जल वापरकर्त्यांच्या विविध प्रवर्गावर पाणी उचलण्यासाठी लावण्यात येणारा वीज आकार, असा होय.

(ड) **"उन्हाळी"** याचा जलदरापुरता अर्थ, मार्च ते जून पर्यंतचा हंगाम अथवा राज्य शासनाने अधिसूचित केलेला हंगाम. कोकण आणि विदर्भ प्रदेश करिता हा हंगाम १ एप्रिल ते ३० जून असेल.

(ढ) **"औद्योगिक वापरकर्ते"** ह्याचा अर्थ कच्चा माल (उदा. शीतपेय) म्हणून अथवा उत्पादन प्रक्रियेसाठी (उदा. तापमान कमी करणे, स्वच्छता इ.) जलसंपदा विभागाकडून / पाटबंधारे विकास महामंडळाकडून उपलब्ध केलेल्या पाण्याचा वापर करणारे उद्योग (औद्योगिक विकास महामंडळासह).

(ण) **"खरीप"** याचा जलदरापुरता अर्थ कोकण व विदर्भ वगळता जुलै ते ऑक्टोबर पर्यंतचा हंगाम आणि कोकण व विदर्भासाठी जुलै ते १५ नोव्हेंबर पर्यंतचा हंगाम असा होय.

(त) **"मोठे, मध्यम व लघु पाटबंधारे प्रकल्प"** याचा अर्थ अनुक्रमे १०,००० हेक्टरपेक्षा अधिक, २००० ते १०,००० हेक्टर या दरम्यानचे आणि २००० हेक्टरपेक्षा कमी, लागवड करण्याजोगे क्षेत्र असलेला प्रकल्प असा होय.

(थ) **"आधुनिक सिंचन पध्दती"** याचा अर्थ सूक्ष्म-सिंचन (ठिंबक व तुषार) किंवा प्राधिकरण वेळोवेळी विनिर्दिष्ट करील अशी कोणतीही अन्य पध्दती असा होय.

(द) **"प्रचालन व परिरक्षण (ओ अँड एम्) खर्च"** याचा अर्थ आस्थापना खर्च व जलसंपत्ती प्रकल्पाच्या सिंचन प्रणालीवर प्राधिकरणाने वेळोवेळी ठरविलेल्या मानकानुसार येणारा देखभाल व दुरुस्ती खर्च मिळून येणारा एकूण खर्च होय.

(ध) **"रब्बी"** याचा जलदरापुरता अर्थ कोकण आणि विदर्भ वगळता ऑक्टोबर ते फेब्रुवारीपर्यंतचा हंगाम आणि कोकण व विदर्भाकरिता १५ नोव्हेंबर ते ३१ मार्च पर्यंतचा हंगाम असा होय.

(न) **"राज्य"** याचा अर्थ, महाराष्ट्र राज्य असा आहे.

## ५.० मार्गदर्शक तत्वे :

जलदराचे निकष तयार करताना महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम २००५, महाराष्ट्र शेतकऱ्यांद्वारे सिंचन पध्दतीचे व्यवस्थापन अधिनियम २००५, राज्य जलनीती २००३ आणि महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम १९७६ यांतील तरतुदींचा विचार प्राधिकरणाने केला आहे. जलदर या विषयावर विविध केंद्रीय व राज्य समित्यांनी पूर्वी केलेल्या शिफारशींचा संदर्भ देखील आवश्यक तेथे घेण्यात आला आहे.

## ६.० जल प्रशुल्क आदेश निर्गमित करण्यासाठी अनुसरावयाची कार्यपध्दती आणि त्याचे पुनर्विलोकनः

६.१ जल प्रशुल्क पध्दतीचे निकष प्राधिकरणाने निश्चित केल्यावर, प्राधिकरणाने विहित केलेल्या प्रपत्रात जुलै २०१० ते जून २०१३ या तीन वर्षाच्या कालावधीकरिता जलसंपदा विभाग जलदर प्रस्ताव प्राधिकरणास सादर करेल. हा प्रस्ताव जलप्रशुल्कासाठी निर्धारित केलेल्या निकषांवर आधारीत तसेच अंदाजीत वार्षिक प्रचालन व परिरक्षण खर्चाचे आणि वापरकर्त्यांच्या प्रवर्गानुसार प्रस्तावित केलेल्या जलदराशी सुसंगत असेल.

६.२ जल दर प्रस्तावाचा मसुदा जलदर निश्चितीचे निकष प्राधिकरणाकडून मिळाल्यावर ४ आठवड्याचे आत जलसंपदा विभाग प्राधिकरणास सादर करील.

६.३ मसुद्याची तपासणी झाल्यावर, जलसंपदा विभागाकडून, प्राधिकरणास योग्य वाटतील अशी स्पष्टीकरणे प्राप्त करेल व आवश्यकतेनुसार पाणीवापरकर्त्यांबरोबर विचार विमर्श करण्यात येईल आणि जलदर विषयक प्रस्ताव अंतिम करुन व मंजुरी देईल.

६.४ कृषि/घरगुती/औद्योगिक ठोक जलवापरकर्त्यांसाठीच्या घनमापक जलदराचे आदेश प्राधिकरण निर्गमित करेल. कृषि वापरातील पिकांचे क्षेत्राधारित जलदर आदेश जलसंपदा विभागाकडून निर्गमित केले जातील.

६.५ प्राधिकरणाने निर्गमित केलेल्या जलदर आदेशातील कोणत्याही तरतुदीचा फेरविचार करण्यासाठी वापरकर्ते / जलसंपदा विभागास प्राधिकरणाने विहीत केलेल्या पध्दतीनुसार, प्राधिकरणाकडे दाद मागण्याचा हक्क राहील.

**७.० वार्षिक प्रचालन व परिरक्षण खर्चाचे घटक :**

७.१ वार्षिक प्रचालन व परिरक्षण यात पुढील गोष्टी अंतर्भूत असतील -

(क) जलसंपदा विभागाच्या/पाटबंधारे विकास महामंडळाच्या प्रकल्पांच्या कालवे प्रणालीतील व शीर्ष कामातील (धरणाच्या) परिरक्षण व वर्षातील दुरुस्तीची कामे

(ख) सिंचन प्रकल्पांच्या देखभालीसाठी नियुक्त करण्यात आलेल्या जलसंपदा विभागाच्या /पाटबंधारे विकास महामंडळाच्या कर्मचाऱ्यांचा वेतनाचा - ज्यात मूळ वेतन, महागाई भत्ता, बोनस, इतर भत्ते इत्यादी यांचा-राज्य शासनाने मंजूर केल्याप्रमाणे समावेश असेल त्याचप्रमाणे त्यात प्रवास व भत्ते, वकीलाची फी, लेखा तपासणी फी, इ. जलव्यवस्थापनाशी संबंधीत खर्च असतील. आस्थापना खर्चात राज्यशासनाने विहीत केलेल्या मानकानुसार आस्थापना असल्याची खात्री करुन घेण्यात येईल.

७.२ प्रचालन व परिरक्षण यात पुढील गोष्टी अंतर्भूत नसतील.

(क) घसारा, कर्जावरील व्याज, विशेष दुरुस्त्या पुनस्थापना खर्च यांसह सिंचन प्रकल्पाचा सर्व भांडवली खर्च.

(ख) सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशी स्वीकारल्यामुळे वेतनांमध्ये झालेल्या वाढीचा परिणाम

(ग) जलविद्युत घटकांचा देखभाल व दुरुस्ती खर्च

(घ) शासनाने ठरवून दिलेल्या मानकापेक्षा अधिक असलेल्या आस्थापना खर्च.

## ८.० देखभाल व दुरुस्तीची मानके, आणि पुरवठादाराच्या जबाबदाऱ्याः

८.१ कालवे प्रणाली, शीर्षकामे व सहाय्यभूत कामे यांकरिता राज्य शासन मानके विहित करील. प्राधिकरणाने मानकांची छाननी केल्यानंतर जर निर्मित मालमत्तांची (Assets) योग्य प्रकारे निगा/परिरक्षण करण्यास मानके अपुरी आहेत असे वाटल्यास प्राधिकरण ते राज्य शासनाकडे पुनर्विलोकनासाठी व सुधारण्यासाठी पाठवेल. परिरक्षण व दुरुस्तीसाठी लागणाऱ्या निधीचे अंदाज या विहीत मानकांनुसार व्हावयास हवे.

८.२ सेवा पुरवठादार म्हणून जलसंपदा विभागाच्या निर्मित (माल) मत्तांच्या सुयोग्य देखभालीसाठी काही जबाबदाऱ्या आहेत, जशा की, पाणीवापराच्या कार्यक्षमतेत सुधारणा आणि पाणीवापर संस्थांना लघुवितरिकेखालील प्रणालीच्या व्यवस्थापनाकरिता आवश्यक अनुदान/निधी उपलब्ध करणे. कालव्यातील वहन व्ययाचे योग्य निर्धारणासाठी जलसंपदा विभागास वितरण प्रणालीमध्ये मोजमाप यंत्रे बसविणे आणि त्यांचे नियत कालावधित अंशशोधन (प्रमाणीकरण / calibration) करणे आवश्यक ठरेल. जलदरासंबंधित सेवा पुरवठादाराच्या जबाबदाऱ्यांकरिता जलसंपदा विभाग ठोक जलदर निर्धारणाचे निकष (सीडब्ल्यूबीटी) च्या परिशिष्ट-५ व ६ मध्ये घालून दिलेल्या तत्वांचे तंतोतंत पालन करील.

## ९.० प्रशुल्केतर आणि इतर उत्पन्न :

९.१ पाणीपट्टी महसुलाचा अंदाज बांधताना, प्रशुल्केतर उत्पन्नाचा (म्हणजे निविदांची विक्री, भंगार, जलविद्युतचे मानधन, मत्स्यसंवर्धन, मनोरंजन जलपर्यटन यांद्वारे मिळणारे उत्पन्न) विचार केला जाणार नाही.

## १०.० शासकीय अर्थसहाय्य :

अंदाजित वार्षिक प्रचालन व परिरक्षण खर्च भागविण्याकरिता जलसंपदा विभाग आवश्यक अर्थसहाय्य उपलब्ध करील. जलदर आदेशानुसार अंदाजित प्रशुल्क

वसुली आणि अंदाजित वार्षिक प्रचालन व परिरक्षण खर्च यातील महसुली तूट शासनाकडून अर्थसहाय्य समजण्यात येईल.

**११.० महसूली तूट / आधिक्य :**

११.१ नियंत्रित कालावधीच्या प्रत्येक जलवर्षाच्या अखेरीस, जलसंपदा विभाग, प्राधिकरणाला जल वापराचे प्रवर्गानुसार व स्त्रोतानुसार वापरलेले पाणी, आकारलेले प्रशुल्क, वसूल झालेला महसूल, विहीत मानकानुसार सिंचन क्षमतेपैकी सिंचित क्षेत्र व सिंचन न झालेले क्षेत्र यासाठी आवश्यक परिरक्षण व दुरुस्ती खर्च, प्रत्यक्ष परिरक्षण व दुरुस्ती खर्च, आस्थापना खर्च व पुरविलेले अर्थसहाय्य (जर कोणते असल्यास) त्याची माहिती सादर करील. आधीच्या वर्षातील प्रशुल्काची थकबाकी (आकारणी व वसुली) ही महसूली तूट/आधिक्य निर्धारित करताना विचारात घेतली जाणार नाही.

**१२.० प्रचालन आणि परिरक्षण खर्चाची विभागणी :**

१२.१ परि.७.१(क) आणि (ख) मध्ये विहीत केल्यानुसार एकूण प्रचालन आणि परिरक्षण खर्चाची विभागणी ही (एक) परवडण्याची क्षमता (दोन) सुलभ उपलब्धता आणि (तीन) प्रमाण व नियमितता या तीन मुलभूत घटकांवर आधारित कृषि, घरगुती आणि उद्योग या वापरकर्त्यांच्या प्रवर्गामध्ये करण्यात येईल. ही विभागणी खालील परि. १२.२ ते १२.६ मध्ये दिल्यानुसार तीन टप्प्यात करण्यात येईल.

१२.२ प्रथमतः तील घटकांपैकी प्रत्येकास भारांकन (भारीत टक्केवारी) नेमून देण्यात येईल जी सर्व वापरकर्त्यांसाठी सामायिक असेल. भारांकन टक्केवारी पुढीलप्रकारे असेल.

| घटक | भारांकन (भारीत टक्केवारी) |
|---|---|
| परवडण्याची क्षमता | ६० टक्के |
| सुलभ उपलब्धता | २० टक्के |
| प्रमाण व नियमितता | २० टक्के |

१२.३ परवडणे सुलभ उपलब्धता आणि प्रमाण व नियमितता या निकषांआधारे पाणीवापराचे प्रत्येक प्रवर्गास लागू होऊ शकणारी आस्थापना व दुरुस्ती खर्चाची विभागणी प्रत्येक घटकास शंभर रुपये धरल्यास ती खालीलप्रमाणे असेल :

| | **कृषी** | **पिण्याचे पाणी** | **उद्योग** | **एकूण** |
|---|---|---|---|---|
| परवडण्याची क्षमता | १५ | १० | ७५ | १०० |
| सुलभ उपलब्धता | ३० | २५ | ४५ | १०० |
| प्रमाण व नियमितता | ३० | २५ | ४५ | १०० |

१२.४ घटकांची भारांकन टक्केवारी वरील विभागणीमध्ये वापरुन होणारी आस्थापना व देखभाल खर्चाची विभागणी खालील प्रमाणे :

| | **कृषि** | **पिण्याचे पाणी** | **उद्योग** |
|---|---|---|---|
| परवडण्याची क्षमता | १५ x ०.६ = ९ | १० x ०.६ = ६ | ७५ x ०.६ = ४५ |
| सुलभ उपलब्धता | ३० x ०.२ = ६ | २५ x ०.२ = ५ | ४५ x ०.२ = ९ |
| प्रमाण व नियमितता | ३० x ०.२ = ६ | २५ x ०.२ = ५ | ४५ x ०.२ = ९ |
| एकूण | **२१** | **१६** | **६३** |

वरील टक्केवारी ही पाणी वापरकर्त्यांच्या प्रत्येक प्रवर्गासाठीचा मूळ दर ठरवितांना परिरक्षण व प्रचालक खर्चाची विभागणी करण्यासाठी वापरण्यात येईल.

१२.५ घरगुती पाणीवापराचे मागणीचे १५ टक्के पाणी औद्योगिक वापरासाठी आणि औद्योगिक पाणी मागणीच्या १५ टक्के पाणी घरगुती वापरासाठी वापरल्याचे गृहित धरले तर,

पिण्याचे पाण्यासाठी अंतिम खर्चाची विभागणी = (०.१६ x ०.८५) (०.६३ x ०.१५)

= ०.१३६ + ०.०९५ = ०.२३१

औद्योगिक पाण्यासाठी अंतिम खर्चाची विभागणी = (०.१६ X ०.८५) (०.६३ X ०.१५)

= ०.५३६ + ०.०२४ = ०.५६०

१२.६ अशा प्रकारे वरील दोन प्रवर्गातील परिरक्षण व्यवस्थापन खर्चाचे वाटप पुढील प्रमाणे.

| | |
|---|---|
| घरगुती वापर | २३ टक्के |
| उद्योग वापर | ५६ टक्के |

१२.७ कृषीवापराकरिता परिरक्षण व दुरुस्ती खर्चाच्या २१ टक्के वाटपात, कालव्यातून होणाऱ्या पाझरामळे व झिरप्यामुळे मोठ्या प्रमाणात भूजलाचे पुनर्भरण होत असल्याने, कालव्याद्वारे तसेच विहीरीद्वारे सिंचित लाभक्षेत्रातून मिळणाऱ्या पाणीपट्टी महसुलाचा विचार केला आहे. यातील कालव्याद्वारे १६ टक्के व विहीरीद्वारे ५ टक्के खर्च वाटपात सहभाग असेल. विहीरीद्वारे होणाऱ्या सिंचनाची पाणीपट्टी शासनाच्या नवीन धोरणानुसार माफ केलेली असल्यामुळे, प्रवाही सिंचनाचे क्षेत्रावर फक्त १६ टक्के परिरक्षण व दुरुस्ती खर्चाचा भार पडेल. महसुलातील ५ टक्के तुट ही शासनाचे अनुदान असेल, कारण विहीरीवरील पाणीपट्टी शासनाने माफ केली आहे. अशाप्रकारे कृषि वापराकरीता क्षेत्राधारित आणि घनमापन पध्दतीच्या प्रशुल्क दराची रचना फक्त १६ टक्के परिरक्षण व दुरुस्ती खर्च भागविण्याचे उद्देशाने केली जाईल.

## १३.० <u>जलदर निश्चितीमध्ये अनुसरावयाची तत्वे/प्रोत्साहने/सूट/दंड तरतुदी</u>

१३.१ <u>कृषी</u>

१३.१.१ तत्वे

(एक) "क्षेत्र आधारित" पिकनिहाय रब्बी हंगामातील मूळ दर निश्चित करताना नगदी पिके वगळून इतर पिकांसाठी ढोबळ उत्पादन मूल्याच्या* ३ ते ५ टक्के आणि नगदी पिकांच्या (उदा. ऊस, केळी, फळबागा इ.) बाबतीत ढोबळ उत्पादन मूल्याच्या* ८ ते १० टक्के यापेक्षा अधिक जलदर असणार नाही यांची सुनिश्चिती करण्यात यावी. फळबागाकरिता १३.१.२(iv) मधील

तरतुद देखील लागू राहील, तसेच फळबागा करीता क्षेत्राधारित मूळ दर हा ऊस व केळी करीता असलेल्या मूळ दराच्या ७५ टक्के पेक्षा जादा असणार नाही याची खातरजमा करणे आवश्यक राहिल.

(दोन) क्षेत्राधारित जलदराबाबत पिकांचे गट कमी करण्याच्या दृष्टीने, पिकांची विभागणी तीन प्रमुख गटात करण्यात येईल. उदा. हंगामी पिके, बारमाही पिके व भात पिके. हंगामनिहाय पिकांची उपगटात विभागणी करताना सर्वसाधारणपणे संबधित पिकांना लागणारे पाणी व त्याची ढोबळ मुल्ये विचारात घेतली जावीत.

(तीन) रब्बी पिकांसाठी वरील "मूळ/पायाभूत दर" असेल. रब्बी हंगामातील पिकांच्या वर्गवारीतील पिके खरीप/उन्हाळी हंगामात असतील तर खरीप पिकांसाठी मूळ दराच्या ५० टक्के दर आकारण्यात येईल आणि उन्हाळी पिकांसाठी मूळ दराच्या १५० टक्के दर आकारण्यात येईल. तथपि खरीप/उन्हाळी हंगामातील पिके रब्बी हंगामच्या पिकांच्या वर्गवारीतील नसतील तर वरील १३.१.१ (एक) नुसार परिगणना करण्यात येईल. दुहंगामी व बारमाही पिकांसाठीही हयाच प्रमाणे जलदर निश्चिती करण्यात येईल.

(चार) क्षेत्राधारीत जलदर निश्चितीनंतर परिशिष्ट-१ मध्ये दिलेल्या पध्दतीचा अवलंब करुन ठोक पाण्यासाठीचे घनमापन पध्दतीचे दर निश्चित करण्यात येतील.

(पाच) परिशिष्ट-२ मध्ये उद्धृत केलेल्या नमुन्यानुसार शासकीय आणि खाजगी उपसा सिंचन योजनेकरिता जलदर असतील.

(सहा) जलदर निश्चितीमध्ये सामान्य व टंचाई काळासाठी कोणताही फरक केला जाणार नाही. तथापि, राज्य शासन अर्थसहाय्य देऊन टंचाईच्या काळात पाणीपट्टीत सूट सवलत देण्याचा विचार करेल.

*टीप : प्रत्येक पिकांचे ढोबळ मुल्य ठरविताना शासनामार्फत प्रकाशित वार्षिक सरासरी किंमत ऊस वगळून इतर पिकांकरीता विचारात घेतली जाईल, (उदा. कृषी उत्पादन मुल्य व किंमत बाबत समितीचा अहवाल) ऊसाकरीता क्षेत्रावरील लागवाडी साठीची किंमत ही महाराष्ट्र राज्य सहकारी साखर महासंघा कडील तपशीलाच्या आधारे घेण्यात येईल. आकडेवारीचे उगमस्थान इत्यादी तपशील जलदर आदेशामध्ये नमुद करण्यात येईल.

१३.१.२ सूट / सवलती

(एक) क्षेत्राधारीत जलदरामध्ये, राज्सतील २ हेक्टर पेक्षा कमी क्षेत्रधारण करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी मुळ दराच्या ७५ टक्के जलदर प्रमाणे सवलतीचा दर आकारण्यात येईल. तसेच विदर्भातील पंतप्रधान कार्यक्रमा अंतर्गत असलेल्या तसेच महाराष्ट्र शासनाने नक्षलग्रस्त घोषित केलेल्या जिल्ह्यातील ४ हेक्टर पेक्षा कमी क्षेत्र धारण करणाऱ्या शेतकऱ्यांना मूळ दराच्या ५० टक्के प्रमाणे आकारणी करण्यात येईल.

वरील प्रमाणे दोन्ही प्रकारची सूट ही ऊस, केळी व फळबागासारख्या नगदी पिकांना लागू असणार नाही.

(दोन) आदिवासी विकास उपयोजने अंतर्गत राबविलेले प्रकल्पांसाठी सर्व आदिवासी शेतकऱ्यांना कोणतेही जलदर आकारण्यात येणार नाहीत.

(तीन) प्रकल्पग्रस्त लोकांना सर्व पिकांसाठी मूळ जलदराच्या ७५ टक्के प्रमाणे आकारणी करण्यात येईल.

(चार) फळबागासाठी उदा. केळी, आंबा, संत्री, द्राक्षे, चिक्कू, चिंच, आवळा, नारळ इत्यादी पिकांना उत्पन्नासाठी बराच कालावधी लागतो. यास्तव खालील प्रमाणे पिकनिहाय नमूद कालावधीसाठी मूळ दराच्या २५ टक्के प्रमाणे क्षेत्राधारीत जलदर आकारणी करण्यात येईल.

| | | |
|---|---|---|
| अ) | केळी | १ वर्ष |
| ब) | द्राक्षे | ३ वर्ष |
| क) | संत्री | ४ वर्ष |
| ड) | आंबा/नारळ/<br>आवळा/चिकू/चिंच | ५ वर्ष |

तथापि सदर कालावधीत आंतरपिक घेतल्यास संबंधीत आंतरपिकांच्या अनुषंगाने आकारणी करण्यात येईल व सदर कालावधीत फळबागासाठी काहीही आकारणी करण्यात येणार नाही.

(पाच) भात पिकांसाठी घनमापन पध्दतीचा दर हा क्षेत्राधारित दराच्या ५० टक्के प्रमाणे राहील.

१३.१.३ प्रोत्साहनेः

(एक) क्षेत्राधारीत पुरवठ्यामध्ये आधुनिक सिंचन पध्दतीचा अवलंब केल्यास } लागू असलेल्या दराच्या ७५ टक्के जलदर

परंतु, ही सवलत जे फळबागायतदार वरील १३.१.२ (चार) अंतर्गत सवलत घेतील त्यांना नमूद कालावधीमध्ये देय असणार नाही आणि ही सवलत संपूर्ण मूळ दराप्रमाणे भरणा सुरू केल्यानंतरच्या कालावधीत अनुज्ञेय असेल.

१३.१.४ दंड/शास्ती

(एक) कुटंबाचा आकार - कायदा अधिनियमित होण्याच्या एक वर्षानंतर, दोनपेक्षा अधिक अपत्ये असलेल्या शेतकऱ्यांना लागू असलेल्या दराच्या १.५ पटीने जलदर आकारण्यात येईल. तसेच अधिनियमाच्या कलम १२(११) (क) व (ख) च्या तरतुदी लागू होतील.

१३.२ घरगुती वापरासाठी पाणी

१३.२.१ तत्वे

(एक) परिशिष्ट ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मूळ/पायाभूत दरांची सांगड पुरवठा स्त्रोताशी घालण्यात येईल व जलदर खरीप, रब्बी व उन्हाळी हंगामात सारखा असेल.

(दोन) महापालिका / नगरपरिषदा / ग्रामपंचायत समवेत ठोक पाणी पुरवठा करार करताना औद्योगिक तसेच व्यापारी तत्वावरील वापराचे प्रमाण निश्चित केले जाईल आणि त्यासाठी उचित औद्योगिक दर आकारण्यात येईल.

१३.२.२ प्रोत्साहनेः

(एक) सांडपाणी प्रक्रियेसाठी सूट - जर महानगरपालिका / नगरपालिका / यंत्रणा सांडपाण्यावर महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण बोर्डाच्या आवश्यकतेनुसारच्या विहीत मानकाप्रमाणे प्रक्रिया करुन प्रक्रिया केलेले पाणी सिंचन/बगीचा करीता वापरण्या योग्य असेल तर सदर प्रक्रिया करण्यासाठी वापरलेल्या पाण्याच्या प्रमाणाकरीता मुळदराच्या ७५ टक्के प्रमाणे आकारणी करण्यात येईल.

१३.२.३ सूट :

(एक) बहुस्तरीय जलदर - शहरी व ग्रामीण वापरदारांसाठी खालीलप्रमाणे वेगवेगळे दर असतील.

| | |
|---|---|
| अ) ग्रामपंचायती | पायाभूत दराच्या ७५ टक्के |
| ब) स्थानिक नागरी संस्था | पायाभूत दराच्या ९० टक्के |
| क) महानगरपालिका | पायाभूत दराचे १२५ टक्के. |

१३.२.४ दंड/शास्ती :

| | | | |
|---|---|---|---|
| (एक) | महापालिका / नगरपालिकांची अतिरिक्त मागणी | - | अतिरिक्त मागणी जेथे शक्य असल्यास तेथे पुनर्वापराने भागविली जाईल. तथापि याचा विचार पाणीपुरवठ्याचे निकष व जललेखे यांच्या पुनर्विलोकनानंतर व सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा (STP) स्थापन करण्याच्या प्रगतीच्या आढाव्यानंतर केला जाईल. |
| (दोन) | दुष्काळाच्या कालावधीमध्ये जलाशयामधील आरक्षण | - | पिण्याच्या पाण्याच्या वापराकरिता करण्यात आलेल्या संपूर्ण आरक्षणासाठी दर आकारण्यात येईल, हे करताना त्यात बाष्पीभवन व वहन व्ययाचा समावेश असेल. |
| (तीन) | प्रदूषण करणाऱ्यांनी “किंमत चुकवावी” हे तत्त्व | - | ज्या महानगर पालिका/नगरपालिका अथवा नगरपरिषदा सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा उभारण्यात पर्याप्त/समुचित रितीने प्रगती करीत नाहीत, अशा यंत्रणाना जास्तीचा दंडनीय दर आकारण्याबाबत विचार करण्यात येईल. |

## १३.३ औद्योगिक वापर

१३.३.१ **तत्वे**

(एक) परिशिष्ट ४ मध्ये दाखविल्याप्रमाणे पाणी पुरवठयाच्या स्त्रोताशी मूळ दराची सांगड घालण्यात येईल.

(दोन) प्रक्रिया उद्योगांसाठी रब्बी हंगामासाठीचा मूळ दर लागू करण्यात येईल. खरिप हंगामाकरिता मूळ दराच्या ५० टक्के दर आकारण्यात येईल आणि उन्हाळी हंगामासाठी मूळ दराच्या १५० टक्के दर आकारण्यात येईल.

(तीन) पाण्याचा कच्चा माल म्हणून वापर करणाऱ्या उद्योगांकरिता वरील मूळ दराच्या पाच पट दर आकारण्यात येईल.

(चार) औद्योगिक वापरकर्त्यांबरोबर ठोक पाणी पुरवठा करार करताना घरगुती वापराचे प्रमाण निश्चित केले जाईल व त्यासाठी उचित घरगुती दर आकारण्यात येईल.

१३.३.२ सूट

| | | | |
|---|---|---|---|
| (एक) | कृषी उद्योग (कुक्कूट पालन, कॅनिंग, साखर, दुग्धव्यवसाय) | - | लागू असलेल्या दराच्या ७५ टक्के दर आकारण्यात येईल. |
| (दोन) | पुनर्वापराकरिता सूट | - | उद्योग पाण्याचा पुनर्वापर करुन (वापर २५ टक्क्यांपर्यंत कमी करुन) मागणी ७५ टक्के पर्यंत कमी करत असेल तर लागू असलेल्या दराच्या ७५ टक्के दर कमी केलेल्या मागणीसाठी आकारण्यात येईल. याकरीता जलसंपदा विभागाकडून ही पडताळणीची (घट) तपासणी यंत्रणा विकसित करण्यात येईल. |

१३.३.३ शास्ती/दंड

(एक) "प्रदूषण करणाऱ्यांनी किंमत चुकवावी" हे तत्त्व - प्रत्येक उद्योगाने, नैसर्गिक पाण्याच्या प्रवाहात सांडपाणी सोडण्यापूर्वी त्या पाण्यावर उचित प्रक्रिया करणे अपेक्षित आहे, अशा प्रकरणात लागू असलेला दर आकारण्यात येईल. जर महाराष्ट्र जलप्रदूषण नियंत्रण मंडळाच्या आवश्यक त्या मानकानुसार सांडपाण्यावर उचित प्रक्रिया केली नसेल तर अशाप्रकरणी लागू असलेल्या दराच्या दुप्पट दराने दर आकारण्यात येईल.

१३.४ सर्वसाधारण (सर्व प्रवर्गांकरिता)

(एक) विहीत मुदतीनंतर पाणीपट्टी भरणा करण्यात झालेल्या विलंबासाठी दंडनीय दर १ टक्के प्रतिमहिना अथवा १२ टक्के प्रतिवर्ष प्रमाणे आकारण्यात येईल.

(दोन) हंगाम सुरू होण्यापूर्वी आगाऊ बील प्रदान केल्यास आकारणी मध्ये ५ टक्के सवलत शेतीकरीता देण्यात येईल.

(तीन) भविष्यकाळात बिगरसिंचन वापरासाठीच्या पाण्यासंबंधातील सर्व करार, मागणीची मापदंडानुसार आवश्यकता लक्षात घेऊन होतील. (पिण्याच्या पाण्यासाठी ग्रामीण व शहरी भागाच्या लि/दिन/डोई मापदंडानुसार आणि उद्योगांसाठी उद्योगप्रकारानुसार घ.मी./युनिट उत्पादनावर आधारीत).

(चार) बिगर सिचंन वापराच्या बाबत, करारनाम्यामध्ये विहित केलेल्या प्रमाणाच्या १० टक्के पेक्षा कमी अथवा जादा वापर केल्यास, जादा/कमी उचल केलेल्या पाण्याकरिता मंजूर असलेल्या दराच्या १.५ पटीने दंडनीय दर आकारण्यात येईल.

(पाच) जलसंपदा विभागाशी करारनामा करताना बिगरसिंचन पाणीपारकर्ते अंतिम पाणी मागणी प्रमाणे टप्प्याटप्याने पाणीवापर करण्याचे नियोजन नमूद करू शकतील. अंतिम पाणी मागणी प्रमाणे पुरवठा सुरू होईपर्यंत वर्षनिहाय खालील प्रमाणे आकारणी करण्यात येईल

अ) टप्प्यानुसार ठरवून घेतलेल्या प्रमाणात पाणीवापर असल्यास लागू दराने आकारणी

ब) टप्प्यानुसार ठरवून घेतलेल्या पाणीवापरापेक्षा ± १० पाणीवापर (अधिक/कमी) झाल्यास, फरकाच्या वापरास दंडनीय दर लागू दराच्या १.५ पट.

क) उर्वरित प्रमाणाकरिता म्हणजे अंतिम नियोजित पाणीवापर वजा टप्प्यानुसार नियोजित पाणीवापरा करीता, बांधिलकी / लेखबध्द आकार लागू दराच्या ५ टक्के वार्षिक प्रमाणे आकारण्यात येईल.

जलसंपदा विभाग त्या वर्षाकरिता शिल्लक राहणारे पाणी कोणत्याही प्रवर्गातील इतर पाणीवापर कर्त्यांना त्या वर्षीच्या कालावधीत देवू शकेल. तथापि सदर पाणीवापरकर्त्याला सदर पाणीवापराचा कोणताही हक्क प्रस्थापित होणार नाही.

**१४ <u>(एक) बिगरसिंचनासाठी घनमापन मूळ जलदर आणि (दोन) कृषीवापरासाठी पीकनिहाय क्षेत्राधारीत मूळ जलदर तसेच घनमापन पध्दतीचे मूळ जलदर निश्चितीकरण</u>**

१) घरगुती आणि औद्यागिक ठोक वापर कर्त्यांचे मूळ घनमापन दर हे, निकषानुसार निश्चित केलेल्या खर्चाची टक्केवारी (घरगुतीसाठी १६% आणि औद्योगिकसाठी ६३%) व संभाव्य पाणी वापराचे परिमाण विचारात घेऊन परिगणित करण्यात येईल.

२) वरील प्रमाणे, प्रत्येक प्रवर्गातून मिळणारा एकुण महसूल निर्धारित करताना, घरगुती आणि औद्यागिक वापरकर्त्यांकडून होणारा दुहेरी पाणीवापर विचारात घेतला जाईल. जर परिरक्षण व प्रचालन खर्चापेक्षा संभाव्य महसूल जास्त होत

असेल तर मुळ दर कमी करुन परिगणनेचा हा अभ्यास पुन्हा करण्यात येईल. जर तो कमी असेल तर मूळ दर वाढवण्यात येईल. परीगणनेचा हा अभ्यास परिरक्षण व प्रचालन खर्च आणि प्राप्त होणाऱ्या महसूलाची सांगड बसेपर्यंत करण्यात येईल.

३) वरील निकषामध्ये प्रस्तावित केलेल्या पुरवठयाच्या स्त्रोतावर अवलंबित (परिशिष्ट ३ व ४ नुसार) लागू असलेल्या काही सवलती असल्यास त्या विचारात घेऊन सविस्तर मूळ दर परिगणित करण्यात येतील.

४) कृषी वापराकरता, पीकनिहाय आणि घनमापन मूळ दर निश्चितीकरण यांचा परस्परावलंबित समन्वय केलेला व खालील पायऱ्यांवर आधारीत अंतर्गत अभ्यास असेल -

अ. निकषातील परिच्छेद १२.४ नुसार कृषीवापरासाठी २१ टक्के इतकी परिरक्षण व प्रचालन खर्च विभागणी करण्यात येईल.

ब. निकषातील परिच्छेद १२.७ नुसार कालव्यातील पाझरामुळे उपलब्ध होणारा भूजलाचा वापर आता माफ केल्याचे विचारात घेऊन, ५% खर्च विभागणी ही राज्य शासन अनुदान म्हणून समजण्यात येईल.

क. अशा प्रकारे कृषी वापराच्या जलदरातून प्राप्त होणाऱ्या महसुलासाठी फक्त १६% इतकी परिरक्षण व प्रचालन खर्चाची विभागणी करण्यात येईल.

ड. निकषाच्या परिच्छेद क्र. १३.१.१(एक) नुसार क्षेत्राधरित पीकनिहाय मूळदर ठरविण्यात येतील. हे करताना कोणत्याही पीकासाठीचा जलदर दि.०१.०७.२००३ च्या दरापेक्षा अधिक असणार नाही याची खातरजमा करणे आवश्यक राहील.

५) निकषामधील परिशिष्ट - १ मध्ये दिलेल्या पध्दतीचा अवलंब करुन क्षेत्राधारित दरावर आधारीत घनमापन पध्दतीचे मूळ दर परिगणित करण्यात येतील. कृषीवापरातील वसूल करावयाच्या महसूलाचे निर्धारण, सिंचन करावयाचे क्षेत्र

आणि पाणी वापराचे परिमाण ह्यांच्या आधारे निश्चित करण्यात येईल. जर महसूलाची वसुली ही परिरक्षण व प्रचालन खर्च विभागणीपेक्षा जास्त असेल तर क्षेत्राधारीत दर त्याप्रमाणात कमी करण्यात येऊन हा अभ्यास पुन्हा करण्यात येईल. जर महसूलाची वसुली ही परिरक्षण व प्रचालन खर्च विभागणीपेक्षा कमी होत असेल (अशीच अपेक्षा असेल) तर महसूल वसुली आणि परिरक्षण व प्रचालन खर्चातील फरक प्राधिकरणाने प्रस्तावित केल्यानुसार विकास व समन्यायाशी सांगड घालून, संबंधित अनुदान म्हणून शासनाने मान्य करणे आवश्यक राहील.

६) कृषी क्षेत्रातील निर्धारित महसूल वसुली, भूजलवापराच्या जलदरासाठी दिलेले अनुदान व विकास व समन्यायाशी संबंधीत अनुदान ह्यांची बेरीज निकषातील परिच्छेद क्र.१२.४ नुसार कृषीक्षेत्रासाठी २१ टक्के इतकी परिरक्षण व प्रचालन खर्च विभागणी असावी.

# परिशिष्टे

| परिशिष्ट | विषय |
|---|---|
| १) | कृषिक्षेत्रातील ठोक पाणीवापराच्या जलदराची परिगणना करण्याची पध्दत |
| २) | शासकीय व खाजगी उपसा सिंचन योजनांकरिता जलदर परिगणना करण्याकरिता अनुसरावयाची पध्दती. |
| २-अ) | |
| २-ब) | |
| ३) | घरगुती पाणीवापराचे प्रयोजनासाठी बिगर सिंचन पाणीवापर<br>विविध स्त्रोतांपासून घरगुती वापरासाठी (पिण्यासाठी) पाणी पुरवठा |
| ४) | औद्योगिक प्रयोजनासाठी बिगर सिंचन पाणी वापर<br>विविध स्त्रोतांपासून औद्यागिक वापरकर्त्यांना (औद्योगिक वापरासाठी) पाणी पुरवठा |
| ५) | जलप्रशुल्काच्या संबंधात सेवा पुरवठादारांच्या (जलसंपदा विभाग) जबाबदाऱ्या |
| ६) | कालवा प्रणालीतील वहन व्ययाचे निर्धारण |

## परिशिष्ट-१

# कृषिक्षेत्रातील ठोक पाणीवापराच्या जलदराची परिगणना करण्याची पध्दत.

**(पहा निकष १३.१.१ (चार))**

१. रब्बी हंगामांकरिता मोठे, मध्यम व लघु पाटबंधारे प्रकल्पांसाठी जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन खालील पध्दतीनुसार घनमापन दर परिगणित करील.

**२. आदर्श स्थिती (भविष्याकरीता)**

महाराष्ट्र जलक्षेत्र सुधार प्रकल्पातील पुनर्स्थापना कामे पूर्ण झाल्यावर जेव्हा मोठ्या व मध्यम प्रकल्पांसाठी ०.६४ आणि लघु प्रकल्पांसाठी ०.८० कार्यक्षमतेनुसार, सिंचनाचे मानक १५० हे/दलघमी होईल ती आदर्श स्थिती मानली जाईल.

**३. सद्यःस्थिती**

वरील स्थिती येईपर्यंत मोठ्या, मध्यम व लघु प्रकल्पांसाठी सध्या प्रचलित असलेले सिंचनाचे मानक ११० हे/दलघमी. म्हणजे संबंधित लघुवितरिकेपर्यंत ४७% कार्यक्षमता असे विचारात घेण्यात येईल.

**४. पाणी वापर कार्यक्षमता**

सध्या, स्त्रोतापाशी (शीर्ष भाग, पाणी उचलण्याचे स्थळ वगैरे) प्रवाही सिंचनासाठी वळविण्यात आलेले एकूण वार्षिक पाणी व कालव्याचे सिंचन क्षेत्र यानुसार सिंचनाचे मानक ११० हे/घमी आहे. महाराष्ट्र जलक्षेत्र सुधार प्रकल्पासाठी निर्धारित केलेल्या प्रकल्प कार्यक्षमता दर्शकानुसार प्रकल्पाचे अंतीम उद्दीष्ट १५० हे/घमी असे असणार आहे. प्राधिकरणाने जानेवारी २००७ मध्ये पारीत केलेल्या हक्कदारीच्या तांत्रिक संहितेनुसार, हक्कदारी कार्यक्रमांतर्गत घेतलेल्या पथदर्शी प्रकल्पासाठी अस्तरीकरण न केलेल्या मुख्य / शाखा कालव्यासाढी ०.८० व अस्तरीकरण न केलेल्या वितरिकेसाठी ०.८० म्हणजे लघुवितरिकेच्या मुखापाशी ०.६४ अशी कार्यक्षमता (मानके) घेण्यात आली

आहेत. हे सर्व पुनर्स्थापनेनंतर असल्याने, सध्याची वितरिका पातळीवरील कार्यक्षमता ०.६४ × ११० ÷ १५० = ०.४७ अशी घेता येईल.

५. <u>मोठ्या व मध्यम प्रकल्पांच्या पीक रचनेनुसार रबी हंगामातील पाण्याची गरज परिगणित करण्याची पध्दती</u>

अ) **सद्यःस्थिती**

(i) रबी बंगामातील राज्यातील मोठ्या/मध्यम प्रकल्पांची सरासरी पीकरचना प्रत्येक पिकासाठी सिंचनक्षेत्राच्या (ICA) टक्केवारीमध्ये मागील ३ वर्षांच्या सरासरीवरुन ठरविण्यात येईल. समजा पीक A,B,C, ..N साठी ही $P_1$, $P_2$, $P_3$... $P_n$ टक्के अशी आहे.

(ii) रबीसाठी पीकाची पाण्याची गरज खालीलप्रमाणे काढण्यात येईल.

१ दलघमी साठ्यातून सिंचित क्षेत्र = ११० हे रबीकरिता लघुवितरिकेच्या मुखाशी असलेली पाण्याची गरज खरीप : (रबी + उन्हाळी) पाणीवापर १०:९० आणि रबीचा पाणीवापर (रबी + उन्हाळी) च्या ८५ टक्के असेल. लघुवितरिकेच्या मुखापर्यंत वहन कार्यक्षमता ४७ टक्के अशी धरुन काढण्यात येईल.

अशाप्रकारे १ दलघमी वार्षिक साठ्याच्या वापरानुसार ११० हे क्षेत्रासाठी रबीचा पाणीवापर

= 1,000,000 x 0.9 x 0.85 x 0.47

= 3,59,550 Cum ($m^3$) इतका असेल.

म्हणजे १०० हे सिंचनक्षेत्र गटाच्या रबीतील तो पाणीवापर,

= 3,59,550 $\times \frac{100}{110}$ – 3,26,864 घमी असा येईल.

ब) **आदर्श स्थिती (भविष्याकरीता)**

आदर्श स्थितीत कार्यक्षमतेतील वाढीमुळे सिंचनाचा वापर $\frac{150}{110}$ या प्रमाणात वाढेल. प्रत्येक रबी पिकासाठी पाण्याची गरज सुधारित पेनमन पध्दत अथवा ड्युटी-डेल्टा पध्दतीनुसार घ.मी. मध्ये काढण्यात येईल. ही गरज V1, V2, V3 .... Vn घ.मी. आहे असे गृहित धरु.

१०० हे. सिंचनक्षेत्रासाठी एकूण पाण्याची गरज

$$V\ field\ (m3) = 100\left(\frac{P1}{100} \times \frac{150}{110} \times V1 + \frac{P2}{100} \times \frac{150}{110} \times V2 + \ldots \frac{Pn}{100} \times \frac{150}{110} \times Vn\right)$$

$$V\ Minor = \frac{V\ field}{0.75}$$

टीप : बारमाही आणि दुहंगामी पिकांसाठी, पिकाला लागणाऱ्या पाण्याची गरज ही हंगामासाठीच असेल.

६. **जलदर आकारणीची पध्दत :**

अ) <u>सद्यःस्थिती</u>

समजा पीक A, B, C करिता दर $T_1, T_2, T_3$ हे क्षेत्रावर आधारित निकषानुसार आलेले दर आहेत.

१०० हे. सिंचन क्षेत्रगटासाठी एकूण पाणीपट्टी

$$T_{Today}\ Rs = 100\left(\frac{P1}{100} \times T1 + \frac{P2}{100} \times T2 + \cdots\right)$$

ब) <u>आदर्श स्थिती (भविष्याकरीता)</u>

$$T_{Ideal}\ Rs = 100\left(\frac{P1}{100} \times \frac{150}{110} \times T1 + \frac{P2}{100} \times \frac{150}{110} \times T2 + \cdots\right)$$

टीप : बारमाही व दुहंगामी पिकांसाठी त्या हंगामासाठीची गरज भागिले एकूण पाणी आवश्यक त्या प्रमाणात वार्षिक दर कमी करुन, अंशतः दर विचारात घेतले जातील.

७. **सरासरी घनमापन दर**

अ) <u>सद्यःस्थिती</u>

$$\text{घनमापन दर } Rs/m^3 = \frac{T\ Today}{3,26,864}$$

ब) <u>आदर्श स्थिती (भविष्याकरीता)</u>

$$\text{घनमापन दर } Rs/m^3 = \frac{T\ ideal}{V\ Minor}$$

८. प्रत्यक्ष घनमापन दर वरील दराच्या ०.७५ पट असेल.

९. भातपिक सोडून इतर पिकांसाठी खरीप हंगामाचे दर वरील ७ मध्ये काढलेल्या दराच्या ५० टक्के असतील तर उन्हाळी हंगामासाठी ते १५० टक्के असतील.

१०. राज्यातील भातपिकाच्या क्षेत्रासाठी, भातपिकास जास्त पाणी लागते व तुलनेने भातपीक हे नगदी पिकांप्रमाणे मोबदला देणारे पीक नाही आणि त्यामुळे शेतकऱ्यांना पाणीवापर संस्था स्थापन करण्यास प्रोत्साहन मिळणार नाही व ते घनमापन प्रणालीकडे झुकण्यास तयार नसतात, हे विचारात घेऊन घनमापन दर हे क्षेत्राधारित दरापेक्षा जास्त असणार नाहीत. म्हणून भातपिकाचे दर, क्षेत्राधारित दर व पाण्याचे प्रमाण विचारात घेऊन काढलेल्या दराच्या ५० टक्के असतील. भातपिकाचे घनमापन दर

$$Rs/m^3 = \frac{0.5 \times \text{क्षेत्राधारित दर (रु/हे)}}{\text{1 हे भातपीक क्षेत्रास लागणारे पाणी(घ.मी.)}}$$

१०. जर वरील पध्दतीनुसार काढलेले घनमापन दर जुलै २००३ मधील शासन निर्णयातील दरापेक्षा जास्त असतील तर राज्य शासन शेतकऱ्यांना "दरवाढीचा धक्का" बसू नये म्हणून आवश्यक अनुदान देऊ शकेल.

# परिशिष्ट-२

(पहा निकष १३.१.१ (पाच))

## शासकीय व खाजगी उपसा सिंचन योजनांकरिता जलदर परिगणना करण्याकरिता अनुसरावयाची पध्दती.

| अ.क्र. | उपसासिंचन योजनेचा प्रकार | ऊर्जा आकार | ठोक जलदर |
|---|---|---|---|
| १) | खाजगीरित्या चालविल्या जाणाऱ्या | खाजगी वापरकर्त्यांकडून देय | प्रवाही क्षेत्रावर आधारित हंगामातील सरासरी घनमापन दर<br><br>क्षेत्रावर आधारित पाणी पुरवठयासाठी परिशिष्ट-२ अ नुसार उपशाची जागा व पीकाचा प्रकार व हंगाम यावर जलदर आधारित असेल. |
| २) | शासनाकडून चालवल्या जाणाऱ्या (जलसंपदा विभाग/ पाटबंधारे विकास महामंडळे यांनी लाभक्षेत्रामध्ये पाणीवापर संस्था स्थापन झाल्यावरही देखभाल केलेली शीर्षकामे, उपसागृहे (पंप हाऊस) व इतर सहाय्यभूत कामे.) | लाभधारकांकडून देय तथापि शासनाने वीज आकाराचा काही भाग अनुदान म्हणून द्यावयाचे ठरवले तर त्यास तसे करता येईल. परिशिष्ट-२ब मध्ये जलदर वसूली बाबतची कार्यपध्दती विहित केली आहे, ती अनुसरण्यात यावी. | परिशिष्ट-२ ब नुसार |

## परिशिष्ट - २ अ

## जलदराचे परिशिष्ट

## उपसा सिंचन योजनाकरीता जलदर

| अ. क्र. | पुरवठ्याचा स्त्रोत | ऊस व केळी | | अन्य बारमाही फलोत्पादन | | खरीप पिके | रब्बी पिके | उन्हाळी पिके |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रवाही | ठिबक सिंचन | प्रवाही | ठिबक सिंचन | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १) | **आश्वासित पाणी पुरवठा :** मोठे मध्यम जलाशय / कालवा विरहीत साठवण तलाव | | | | | | | |
| २) | **वहनव्ययासह नियंत्रित पाणी पुरवठाः** धरणाच्या खालच्या बाजूला नदीचा नियंत्रीत भाग / कालव्यातून उपसा/ जलाशयाचा आधार असलेला कोल्हापूर पध्दतीचा बंधारा/ जलाशयातील अवजल | | | | | | | |
| ३) | **अंशतः आश्वासित पाणी पुरवठा :** कालवा असलेला लघु जलाशय / जलाशयाचा आधार नसलेला कोल्हापूर पध्दतीचा बंधारा/ कोणताही बंधारा नसलेला नदीचा अनियंत्रीत भाग किंवा इतर कोणताही कोल्हापूर पध्दतीचा बंधारा वा बंधारा नसलेला लाभक्षेत्रातील अनियंत्रीत नदीचा भाग. | | | | | | | |
| ४) | **पाणी वापरकर्त्यांनी स्वखर्चाने बांधलेला जलाशय / वापरकर्त्यांने प्रमाणशीर खर्चाचा वाटा उचलल्यासः** पाणी वापर संस्थेने प्रकल्पाच्या पायाभूत सोयी सुविधासाठी प्रमाणशीर खर्चाचा भार उचलला असेल तर किंवा स्वखर्चाने धरण / बंधारा / कोल्हापूर पध्दतीचा बंधारा बांधला असेल तर. | | | | | | | |

## परिशिष्ट-२ ब

**महाराष्ट्र शासनाच्या मालकीच्या उपसा सिंचन योजनांकरिता उर्जा आकारासह प्रकल्पनिहाय जलदर निश्चित करणेसाठीची पध्दती**

१. कृष्णा खोऱ्यातील सन २००५-०६ पासून कार्यान्वित असलेल्या व वेगवेगळ्या उंची असलेल्या म्हैसाळ, ताकारी व सिना-म्हाडा या उपसा सिंचन योजनांपासून मिळालेल्या अनुभवावर आधारीत पध्दती विकसित केलेली आहे. प्रकल्प अधिकाऱ्यांनी या प्रत्येक योजनेच्या परीचालनाची प्रत्यक्षातील माहिती पुरविली आहे. प्राधिकरणाने वीज आकार, सिंचित क्षेत्र, दर हेक्टरी महसुल आकारणी यांचा तपशील असलेले एक नमुना वर्ष विचारात घेतले आहे. या माहितीवर आधारीत पाणी वापर संस्था नसलेल्या क्षेत्रा करीता खालील पध्दत पाणीवापर संस्था स्थापन होईपर्यंत विहित करण्यात आली आहे.

२. हंगामाच्या प्रारंभी प्रकल्प अधिकारी सिंचनाची संभाव्य मागणी व येणाऱ्या वीज देयकांच्या आधारे लागू करावयाचे संभाव्य वीज आकार यांचा अंदाज घेतात. (i) वीज आकार व (ii) पीकवार सिंचन आकार (सध्या अस्तित्वात असलेले शासन मंजूर दर अधिक २० टक्के स्थानिक उपकर व अन्य किरकोळ उपकर/आकार) अंतर्भुत असलेला प्रती हेक्टरी प्रती पाणीपाळीचा दर निश्चित केला जाऊन त्यास संबंधित मुख्य अभियंत्यांची मंजुरी घेतली जाते. शेतकऱ्यांना या दरांची माहिती देण्यात येते. (काही योजनांत या दरावर आधारीत आगाऊ रक्कमही स्विकारली जाते.)

३. प्रत्यक्ष जल दर ठरविण्याकरिता अनुसरावयाची कार्यपध्दती

- म.रा.वि.मं. च्या अधिकाऱ्यांकडून संबंधीत प्रकल्प अधिकाऱ्यांना, प्रत्यक्ष वीज वापरानुसार प्राप्त झालेल्या एकूण वीज आकाराच्या आधारे योजनानिहाय दर हेक्टरी सिंचनाचे वीजदर निश्चित केले जातात.

- राज्य शासनाने हंगामवार, पीकवार निश्चित केलेल्या दरहेक्टरी सिंचनाच्या दरानुसार (२० टक्के स्थानिक उपकरांसह) प्रत्यक्ष सिंचन क्षेत्र व पाणी पाळ्यांची संख्या या आधारे आकारणी केली जाते.
- प्रती हेक्टरी वीज आकारासह प्रती हेक्टरी पाणीदर आणि प्रती हेक्टरी २० टक्के स्थानिक उपकरांसह सिंचनाचे प्रती हेक्टरी दर यांच्या आधारे एकूण दर ठरविण्यात येऊन वसुली करण्यासाठी या दराचे रुपांतर प्रती हेक्टरी प्रती पाणीपाळी मध्ये करण्यात येते.
- योजना निरंतर चालू रहावी यासाठी, उपसा सिंचन योजनांखालील जास्तीत जास्त क्षेत्र सिंचनाखाली आणले गेले पाहिजे. जेणेकरून वापरदारांना दर हेक्टरी कमीतकमी वीज आकार लागू होऊ शकेल. सर्व पाणीवापरदारांकडून वीज आकाराची संपूर्ण वसुली होईल, हे ध्येय असले पाहिजे.
- शासनातर्फे चालविल्या जाणाऱ्या उपसा सिंचन योजनांसाठीचे पाणीदर योजना निहाय असावेत. म्हणून उपशाचा प्रकार व खर्ची पडणारी वीज लक्षात घेऊन प्रत्येक योजनेसाठी वेगळे दर ठरविले जातील.

लाभक्षेत्रात जशा आणि जेव्हा पाणीवापर संस्था स्थापन होतील तेव्हा घनमापन पध्दतीने पाणी पुरवठा करुन प्रवाही क्षेत्रांसाठी प्राधिकरणाने निश्चित केलेले घनमापनाचे दर व प्रत्यक्ष सिंचीत क्षेत्रानुसार यथाप्रमाण प्रती हेक्टरी वीज आकाराच्या आधारे पाणीदर पाणीवापर संस्थेस लावले जातील.

४. <u>पाणी उचलून तलावात / पाझर तलावात सोडणाऱ्या ज्या उपसासिंचन योजना शासनातर्फे चालविल्या जातात अशा उपसासिंचन योजनांच्या वीज आकाराची लाभधारकांकडून वसूली करण्यासाठीं अनुसरावयाची पध्दती.</u>

म.रा.वि.मं.च्या अधिकाऱ्यांकडून संबंधीत प्रकल्प अधिकाऱ्यांना, प्रत्यक्ष वीज वापरावर आधारीत प्राप्त झालेले एकूण वीज देयक व या तलावांमुळे सिंचनाचा लाभ मिळणारे एकूण क्षेत्र यांचे आधारे प्रति हेक्टरी सिंचनाचा वीज दर निर्धारित करण्यात यावा.

# परिशिष्ट ३

## घरगुती पाणीवापराचे प्रयोजनासाठी बिगर सिंचन पाणीवापर

## विविध स्त्रोतांपासून घरगुती वापरासाठी (पिण्यासाठी) पाणी पुरवठा

## पाणी दर निश्चिती करीता प्रमाणके

[(पहा : निकष १३.२.१(एक)]

रु/१०००० लिटर्स (१० घ.मी.)

| अ. क्र. | पुरवठ्याचा स्त्रोत | जलदर |
|---|---|---|
| १ | आश्वासित पाणी पुरवठा<br>मोठे / मध्यम जलाशय / कालवा नसलेले साठवण तलाव | मूळ दर |
| २ | वहन व्ययासह नियंत्रित पाणी पुरवठा<br>धरणाच्या खालच्या बाजूचा नदीचा नियंत्रित भाग / कालव्यातून उपसा / जलाशयाचा आधार असलेला कोल्हापूर पध्दतीचा बंधारा/ जलाशयातील अवजल. | मूळ दराच्या दोन पट |
| ३ | अंशतः आश्वासित पाणी पुरवठा<br>कालवा असलेला लहान जलाशय / जलाशयाचा आधार नसलेला कोल्हापूर पध्दतीचा बंधारा / कोणताही को.प. बंधारासुद्धा नसलेली अनियंत्रित नदी किंवा कोणताही बंधारा अथवा को.प.बंधारा नसलेला नदीचा लाभ क्षेत्रातील अनियंत्रित भाग | मूळ दराच्या ०.५ पट |
| ४ | पाणी वापर संस्थेने जलाशय बांधला असेल/पाणीवापर संस्थेने प्रमाणशीर खर्चाचा वाटा उचलला असेल<br>पाणी वापरणाऱ्या संस्थेने (ग्रामपंचायत, स्थानिक स्वराज्य संस्था, महानगर पालिका व तत्सम संस्था) पायाभूत सुविधेच्या प्रमाणशीर खर्चाचा वाटा उचलला असेल अथवा धरण/बंधारा/कच्चा बंधारा/कोल्हापूर पध्दरीचा बंधारा स्वखर्चाने बांधला असेल. | मूळ दराच्या ०.३३ पट |

टिप : १. पुरवठ्याच्या स्त्रोतानुसार वर नमुद केल्याप्रमाणे वेगवेगळे दर लागू होतील.

२ वरील मूळ दर तिन्ही हंगामांसाठी एकसारखेच लागू राहतील.

३ नगरपालिका / महानगरपालिका / छावणी क्षेत्र यांना मूळ दराच्या १.२५ पट इतका दर आकारण्यात येईल.

४ नगरपरिषदा / नागरी स्थानिक संस्था यांना, मूळ दराच्या ०.९ पट इतका दर आकारण्यात येईल.

५ ग्रामपंचायतींना मूळ दराच्या ०.७५ पट इतका दर आकारण्यात येईल.

६ जर नगरपालिका/पाणीवापर संस्था सांडपाण्यावर आवश्यक त्या दर्जा इतकी प्रक्रीया करीत असेल व प्रक्रिया केलेले सांडपाणी सिंचनासाठी व उद्यानांसाठी वापर करण्यायोग्य असल्याचे महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे प्रमाणपत्र सदर संस्थेने प्राप्त केलेले असेल तर सदर प्रक्रिया केलेले सांडपाणी तयार करण्यासाठी वापरलेल्या पाण्यासाठी जलदर हा लागू असलेल्या जलदराच्या ७५ टक्के लावण्यात येईल.

७ पाण्याचे दर जवळच्या १० रुपयात पूर्णांकित करण्यात येतील.

नमुना उदाहरण : अनियंत्रित नदीतुन पाणी पुरवठा होत असलेल्या ग्रामपंचायतीस जलदर हा मूळदर X ०.७५ X ०.५० इतका असेल.

# परिशिष्ट ४

## औद्योगिक प्रयोजनासाठी बिगर सिंचन पाणी वापर

## विविध स्त्रोतांपासून औद्यागिक वापरकर्त्यांना (औद्योगिक वापरासाठी) पाणी पुरवठा

## पाणीदर निश्चिती करीता प्रमाणके

[(पहा : निकष १३.३.१(एक)]

रु./१०,००० लिटर (१० घ.मी.)

| अ. क्र. | पुरवठ्याचा स्त्रोत | जलदर |
|---|---|---|
| १ | आश्वासित पाणी पुरवठा<br>मोठे/मध्यम जलाशय/कालवा नसलेले साठवण तलाव | मूळदर |
| २ | वहन व्ययासह नियंत्रित पाणी पुरवठा<br>धरणाच्या खालच्या बाजूचा नदीचा नियंत्रित भाग / कालव्यातून उपसा / जलाशयाचा आधार असलेला कोल्हापूर पध्दतीचा बंधारा / जलाशयातील अवजल. | मूळदराच्या दोन पट |
| ३ | अंशतः आश्वासित पाणीपुरवठा<br>कालवा असलेला लहान जलाशय / जलाशयाचा आधार नसलेला कोल्हापूर पध्दतीचा बंधारा / कोणताही को. प. बंधारासुध्दा नसलेली अनियंत्रित नदी किंवा कोणताही बंधारा अथवा को. प. बंधारा नसलेला नदीचा लाभक्षेत्रातील अनियंत्रित भाग. | मूळदराच्या ०.५ पट |
| ४ | पाणी वापर संस्थेने जलाशय बांधला असेल/पाणीवापर संस्थेने प्रमाणशीर खर्चाचा वाटा उचलला असेल.<br>पाणी वापरणाऱ्या संस्थेने पायाभूत सुविधेच्या प्रमाणशीर खर्चाचा वाटा उचलला असेल अथवा धरण/बंधारा/कच्चा बंधारा/कोल्हापूर पध्दतीचा बंधारा स्वखर्चाने बांधला असेल. | मूळदराच्या ०.३३ पट |

## टिप

१. पुरवठ्याच्या स्त्रोतानुसार वर नमूद केल्याप्रमाणे वेगवेगळे दर लागू होतील.

२. जे उद्योग औद्योगिक वापरासाठी पाणी वापर करतात त्यांचे साठी वरील दर आहेत. ज्या उद्योगात पाण्याचा कच्चा माल म्हणून वापर करण्यात येतो त्यांचे बाबतीत पुरवठ्याच्या स्त्रोतावर आधारीत उचित मूळदराच्या ५ पट इतके जलदर लागू राहतील.

३. अ) उपरोक्त मूळदर हे रब्बी हंगामासाठी (१ नोव्हेंबर ते ३१ मार्च) लागू राहतील.

ब) पावसाळ्यातील १ जुलै ते ३१ ऑक्टोंबर या कालावधीतील पाणी पुरवठ्यासाठी जलदरात ५० टक्के इतकी प्रोत्साहनात्मक सूट राहील.

क) उन्हाळ्यातील १ एप्रिल ते ३० जून या कालावधीतील जलदर ५० टक्के जादा राहतील.

४. उद्योग क्षेत्रातील निवासी भागास लागणाऱ्या पिण्याच्या पाण्याची मागणी उद्योगांनी करार करते वेळी करारात स्पष्टपणे नमूद करावी. अशा पाणी वापरांसाठी स्वतंत्र नळमार्ग व पाण्याचे स्वतंत्र मोजणी यंत्र असावे. अशा प्रकरणी पाणी वापराच्या प्रकारानुसार पिण्याच्या पाण्यासाठी व औद्योगिक वापरासाठी वेगवगळे जलदर निश्चित करण्यात येतील. घरगुती पाणी वापरासाठी स्वतंत्र नळमार्ग व पाण्याचे स्वतंत्र मोजणी यंत्र नसल्यास अथवा प्रत्यक्षातील घरगुती पाणी वापर करारात नमूद केलेल्या परिमाणाहून जास्त झाल्यास या वापरासाठी / जादा वापरासाठी औद्योगिक जलदराने आकारणी केली जाईल.

५. अ) प्रत्येक उद्योगाने सांडपाणी नैसर्गिक जलप्रवाहात सोडण्यापूर्वी सांडपाण्यावर अपेक्षित दर्जा इतकी प्रक्रिया करणे अपेक्षित आहे. अशा प्रकरणी मूळ जलदर लागला जाईल. ज्या प्रकरणी सांडपाण्यावर महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने विहित केलेल्या दर्जा इतकी प्रक्रिया करण्यात आलेली नसेल त्या प्रकरणी मूळ दराच्या दुप्पट जलदर लावण्यात येईल.

ब) शेतीच्या अनुषंगीक उद्योगांसाठी (कॅनिंग, कुक्कुटपालन, साखर उद्योग, दुग्ध व्यवसाय) मूळ दराच्या ७५ टक्के जलदर लावला जाईल.

क) जर पाण्याचा पुनर्वापर केल्यामुळे उद्योगाने त्यांच्या पाण्याच्या मागणीत कमीतकमी २५ टक्के कपात केली असेल तर कपातीनंतरच्या उर्वरीत मागणीवर मूळ दराच्या ७५ टक्के इतका जलदर लावला जाईल.

६. पाण्याचे दर जवळच्या १० रुपयात पूर्णांकीत करण्यात यतील.

उदाहरण : प्रक्रिया करणाऱ्या उद्योगांसाठी अंशतः आश्वासित पाणी पुरवठ्याच्या स्त्रोतामधून उन्हाळ्यातील पाणी वापरासाठीचा जलदर हा मूळदर X ०.५ X १.५० इतका असेल.

# परिशिष्ट – ५

(निकष ८.२ पहा)

## जलप्रशुल्काच्या संबंधात सेवा पुरवठादारांच्या (जलसंपदा विभाग) जबाबदाऱ्या

### १. वसुलीच्या कार्यक्षमतेत सुधारणा

प्रकरण २ मध्ये जलप्रशुल्काच्या वसुलीच्या कार्यक्षमतेच्या बाबीबद्दल विवेचन करण्यात आलेले आहे. उद्योगांच्या बाबतीत वसुलीची कार्यक्षमता ९० टक्क्यापर्यंत आहे तर पेयजलाच्या बाबतीत ती ६० ते ७० टक्क्याच्या दरम्यान आहे. सिंचनाच्या बाबतीत मात्र वसुलीची कार्यक्षमता बरीच कमी म्हणजे २५ ते ४६ टक्क्याच्या दरम्यान आहे. महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम – १९७६ (पहा कलम ८८.२) मध्ये जलप्रशुल्काची वसुली जमीन महसुलाची थकबाकी समजून करण्यात यावी अशी सक्त तरतूद आहे. आता निर्धारित करण्यात आलेल्या निकषामध्ये आगाऊ व वेळेवर शुल्क प्रदान करणाऱ्या वापरकर्त्यांना प्रोत्स्हान देण्याची तरतूद आहे. सिंचनासाठीच्या प्रशुल्काच्या वसुलीची कार्यक्षमता आगामी ३ वर्षात किमान ७५ टक्के होण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. प्राधिकरणाला या बाबत प्रभावी संनियंत्रण करणे शक्य व्हावे यासाठी प्रत्येक पाटबंधारे प्रकल्पाच्या बाबतीत सिंचन प्रशुल्काची आकारणी व प्रशुल्क वसुली (चालू व थकबाकी विभक्तपणे) याबाबत मंडळनिहाय माहिती वर्षवार सादर करण्यात यावी.

### २. शेवटच्या भागातील शेतकऱ्यांना पाण्याची हमी देण्याबाबत

मजनिप्रा अधिनियमाच्या कलम १२(७) नुसार प्राधिकरणाने नदीखोरे अभिकरणाकडून शेवटाकडून आरंभाकडे' सिंचनाचे तत्व राबविले जात आहे किंवा नाही याची खात्री करावयाची आहे. महाराष्ट्र सिंचन पध्दतीचे शेतकऱ्यांकडून व्यवस्थापन अधिनियमाच्या नियमातील कलम १८ नुसार पाणीवापर संस्थेच्या प्रत्येक सदस्याला अनुज्ञेय पाणी हक्कानुसार परिमाण मिळते आहे किंवा नाही याबाबत संनियंत्रण व खातरजमा करण्याची जबाबदारी कालवा अधिकाऱ्याची आहे. जनसुनवाईच्या वेळी हक्क दावेदारांनी

पाणीपुरवठ्यातील समन्यायी व वक्तशीरपणा पाळण्याच्या बाबीवर भर दिला. राज्यातील ९० टक्के सिंचित क्षेत्राला अजूनही पाणी पुरवठा क्षेत्राधारित होत असल्यामुळे विभागाची विशेष जबाबदारी आहे की, प्रत्येक शेतकऱ्याला सिंचनासाठी समन्यायी व वेळेवर पाणीपुरवठा झाला पाहिजे. कालव्याच्या लाभक्षेत्रात मुखाकडील, मध्य व पुच्छ भागात सिंचित होणाऱ्या क्षेत्राची टक्केवारी जवळजवळ समान असावी. दरवर्षी प्रकाशित होणाऱ्या सिंचन स्थितीदर्शक अहवालात या बाबीविषयक माहितीचा अंतर्भाव असावा. प्राधिकरणाला याचे प्रभावीपणे संनियंत्रण करता येणे शक्य व्हावे यासाठी प्रत्येक मोठ्या व मध्यम प्रकल्पाच्या बाबतीत प्रत्येक हंगामाच्या शेवटी मंडळनिहाय माहिती सादर व्हावी ज्यामध्ये प्रत्येक प्रकल्पाच्या मुखाकडील, मध्य व पुच्छ भागात सिंचित झालेल्या क्षेत्राची टक्केवारी दिलेली असावी. पाणीवापर संस्थांना घनमापनाधारित पाणीपुरवठा करताना विभागाने संस्थेच्या मागणीला अनुसरुन अनुज्ञेय पाणी हक्कानुसार पाणीपुरवठा केला जाईल याची खात्री करावी.

### ३. पाणीवापर कार्यक्षमतेमध्ये सुधारणा

जरी प्रकल्प नियोजनाच्या टप्प्यामध्ये सरसकट कार्यक्षमता ४७ ते ५० टक्के गृहीत धरलेली असते तरी प्रत्यक्षात क्षेत्रावर मिळणारी कार्यक्षमता २५ ते ३५ टक्के असते. याचा अर्थ असा की, सोडलेल्या पाण्याचा लक्षणीय भाग पाझर वा क्षेत्रावरील वहन व्ययामध्ये व्यतीत होतो. पाणीवापर कार्यक्षमतेतील सुधारणा केवळ उत्पादकतेमध्येच सुधारणा घडवून आणित नाही तर बचत केलेल्या पाण्यातून अतिरिक्त क्षेत्र सिंचित करते. याद्वारे सिंचन उपक्षेत्रापासून अधिक महसूल मिळतो आणि प्रशुल्काच्या पुनर्विलोकन व सुधारणेच्यावेळी सिंचन प्रशुल्कात कपात सुध्दा करणे शक्य होते. जलसंपदा विभागाकडून दरवर्षी प्रकाशित होणाऱ्या जललेखा अहवालावरुन असे दिसते की, राज्यातील प्रकल्पांच्या बाबतीत सरासरी पाणीवापर कार्यक्षमता प्रति दलघमी वापरलेल्या पाण्यातून सिंचीत होणारे हेक्टर मधील क्षेत्र ९४ पासून ११० पर्यंत वाढलेले आहे. कार्यक्षमता वाढीची ही स्थिती राखली गेली पाहिजे आणि जलसंपदा विभागाने (आगामी) ३ वर्षात खालील लक्ष्य साध्य करण्याचे ध्येय ठेवले पाहिजे.

| वर्ष | पाणीवापर कार्यक्षमता लक्ष्य (हे/दलघमी) |
|---|---|
| २०१०-११ | १२० |
| २०११-१२ | १२५ |
| २०१२-१३ | १३० |

भविष्यामध्ये प्रशुल्क प्रस्ताव सादर करताना जलसंपदा विभागाने वरीलप्रमाणे त्रुटीबाबत (असल्यास) कारणमीमांसा व प्रस्तावित सुधारात्मक उपाय यासह प्रगती अहवाल प्रस्तुत केला पाहिजे. प्राधिकरणाला याबाबत प्रभावीपणे संनियंत्रण करता येणे शक्य व्हावे यासाठी प्रत्येक (मोठ्या व मध्यम) प्रकल्पाच्या बाबतीत मंडळनिहाय वर्षवार माहिती प्रति दलघमी साठविलेल्या पाण्यावर हंगामनिहाय सिंचित होणारे क्षेत्र इ. सादर करण्यात यावे.

## ४. मालमत्ता व्यवस्थापन

अ) **पाणी वापर संस्थांकडे हस्तांतरित न केलेल्या प्रणालीसाठी :**

सिंचन क्षेत्र व बिगर सिंचन क्षेत्रांसाठी मंजुर केलेल्या मापदंडाच्या आधारे जलसंपदा विभागाने प्रकल्पांच्या देखभाल दुरुस्ती कामासाठी आवश्यक असणाऱ्या वार्षिक निधीची छाननी केली पाहिजे आणि इतर पूरक घटकांसाठी (धरण, द्वारे, बारे इ.) आवश्यक असणाऱ्या निधीचा तसेच विशेष दुरुस्त्यांसाठी आवश्यक असणाऱ्या निधीचा अर्थसंकल्पात समावेश केला पाहिजे. अर्थसंकल्पास मंजुरी मिळाल्यानंतर प्रत्येक प्रकल्पास ठरवून दिलेल्या मानकानुसार आणि सिंचित व बिगर सिंचित क्षेत्रानुसार आवश्यक गरजे इतका निधी उपलबध करुन देण्याची आणि इतर कोणत्याही तदर्थ पध्दतीने खर्च न करण्याची जबाबदारी अधीक्षक अभियंता आणि जलसंपदा विभागाने घ्यावी. सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या कामांना प्राधान्यक्रम देऊन निधीचा वापर करण्यात यावा. याची माहिती प्राधिकरणास नियमितपणे उपलब्ध करुन द्यावी.

ब) **पाणीवापर संस्थांकडे हस्तांतरीत केलेल्या प्रणालींसाठी** :

शेतकरी कायदा (MMISF Act) २००५ मधील तरतुदीनुसार लघुवितरिका स्तरावरील पाणीवापर संस्था स्थापन झाल्यानंतर लघु वितरिकेखालील प्रणाली पाणीवापर संस्थेकडे हस्तातरीत करण्यात येईल. जलसंपदा विभागाकडून या पाणीवापर संस्थेस तिच्या हक्कदारी

नुसार घनमापन पध्दतीने लघु वितरिका मुखाशी पाणीपुरवठा करण्यात येईल आणि घनमापन पध्दतीने आकारणी करण्यात येईल. याखेरीज कायद्यामध्ये उल्लेख केल्याप्रमाणे पाणीवापर संस्था सर्वसाधारण सभेत मंजूर केलेल्या जलदरानुसार आपल्या सभासदांना आकारणी करेल.

वाल्मीने आपल्या परिरक्षण व देखभाल दुरुस्ती बाबतच्या अभ्यासात रु.३८०/हे सिंचनाखालील क्षेत्रासाठी आणि रु.१९०/हे उर्वरित सिंचन न झालेल्या क्षेत्रासाठी देखभाल दुरुस्ती अनुदानाची शिफारस केली आहे. वाल्मीने या अनुदानाची विभागणी ४० टक्के मुख्य व शाखा कालवे, २५ टक्के वितरिका आणि ३५ टक्के लघुवितरिका अशी सुचविली आहे.

२३.७.२००१ च्या शासन निर्णयानुसार जलसंपदा विभागाने पाणीवापर संस्थांकरिता अनुदानाच्या मंजुरीसाठीचे मापदंड निश्चित केले आहेत. सभासदांकडून जलदर वसुल केल्यानंतर आणि शासनाकडे ती रक्कम जमा केल्यानंतर पाणीवापर संस्था देखभाल दुरुस्तीचे अनुदान (उपकर वगळता) मिळविण्यास खालील तक्त्यात नमूद केलेल्या टक्केवारी प्रमाणे पात्र ठरतील.

**पाणीवापर संस्थेचा अनुदानातील वाटा**

| प्रकल्प | कार्यकारी संस्था लघुवितरिका स्तरीय पाणीवापर संस्था | उच्चस्तरीय संस्था | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| | | वितरिका स्तरीय पाणीवापर संस्था | कालवास्तरीय पाणीवापर संस्था | प्रकल्पस्तरीय पाणीवापर संस्था | |
| लघु | ७५% | -- | -- | -- | ७५% |
| मध्यम | ५०% | १५% | १०% | ३% | ७८% |
| मोठे | ५०% | २०% | २०% | ३% | ९३% |

सिंचन झालेल्या व सिंचन न झालेल्या क्षेत्रासाठी वाल्मीने शिफारस केलेले परिरक्षण व देखभाल दुरुस्तीचे मापदंड पुरेसे ठरतील किंवा कसे याची तपासणी प्राधिकरणाने केली असता असे दिसून आले आहे की, लघु वितरिका स्तरावरील पाणीवापर संस्थेने जमा केलेल्या महसुलापैकी शासन निर्णयात नमूद केल्या प्रमाणे ७५ टक्के महसूल ल. पा. प्रकल्प व ५० टक्के मोठ्या व मध्यम प्रकल्पातील लघुवितरिके खालील पाणीवापर संस्थांना परत करण्याऐवजी देखभाल दुरुस्तीचे काम योग्य त्या प्रकारे होण्यासाठी ९५ टक्के निधी मोठ्या व मध्यम प्रकल्पातील लघु वितरिकेवरील पाणीवापर संस्थाना परत देणे गरजेचे आहे आणि लघु पाटबंधारे प्रकल्पावरील पाणीवापर संस्थांना आणखी जादा अनुदान द्यावे लागणार आहे. कारण तेथील सिंचनाची शाश्वती/ पाण्याची उपलब्धता मोठ्या/मध्यम प्रकल्पाचे तुलनेत कमी असते. अन्यथा कालांतराने धरण/कालवे/वितरण प्रणाली या वापरायोग्य राहणार नाहीत. उर्वरित ५ टक्के महसूल शासनाने स्वतःकडे स्वामित्व शुल्क म्हणून ठेवावा. तथापि जलसंपदा विभागाने खालील बाबींची हमी देण्यासाठी यंत्रणा विकसित करणे आवश्यक आहे.

- महाराष्ट्र सिंचन पध्दतीचे शेतकऱ्यांकडून व्यवस्थापन अधिनियम (MMISF Act) २००५ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे पाणीवापर संस्थांच्या सभासदांकडे असलेली थकबाकी आधी वसूल करावी.

- पाणीवापर संस्थांनी गोळा केलेल्या रकमेतून उपकर वगळता ९५ टक्के रक्कम संस्थेकडे सिंचन प्रणालीची देखभाल दुरुस्ती करण्यासाठी सुपूर्द करावी. तसेच देखभाल दुरुस्ती योग्य प्रकारे झाली किंवा कसे हे पाणीवापर संस्था आणि जलसंपदा विभागाचा प्रतिनिधी यांनी संयुक्तपणे पाहून व तसे सही करुन दस्तऐवज म्हणून ठेवावे.

लघुवितरीकेच्या वरच्या स्तरावरील संस्थांची उभारणी होईपर्यंत जलसंपदा विभाग देखभाल दुरुस्तीचे काम सुरु ठेवील. त्यानंतर वरच्या स्तरावरील पाणीवापर संस्थेची स्थापना झाल्यानंतर मुख्य कालवा, शाखा कालवा आणि वितरिका यांच्या आवश्यक देखभाल दुरुस्तीसाठी लागणारा निधी या उच्चस्तरीय संस्थांना जलसंपदा विभाग अनुदानाच्या

स्वरुपात देईल. कारण वसुल केलेले शुल्क जवळपास पूर्णपणे लघुवितरिका स्तरावरील संस्थांना परत करावे लागेल. जलसंपदा विभागाने मुख्य कालवा, शाखा कालवा आणि वितरिकांची देखभाल दुरुस्ती करण्यासाठी दिलेल्या अनुदानाचा संबंधित उच्चस्तरीय संस्थांनी योग्य प्रकारे विनियोग करावा आणि जलसंपदा विभागाच्या कर्मचाऱ्याने या खर्चाची तपासणी करुन त्याप्रमाणे प्रमाणित करावे. अशा प्रकारच्या प्रमाणपत्रांच्या आधारावरच पुढील अनुदान देण्यात यावे.

तथापि धरणे व अनुषंगिक कामे यांच्या देखभाल दुरुस्तीचे कार्य जलसंपदा विभागाने उच्चस्तरीय संस्थांची उभारणी झाल्यानंतरही सुरु ठेवावे आणि त्यासाठी मापदंडानुसार अर्थसंकल्पात तरतूद करावी.

# परिशिष्ट – ६

## कालवा प्रणालीतील वहन व्ययाचे निर्धारण

१. राज्यातील सिंचनेतर तसेच सिंचन असा दोन्हींच्या विनियोगातील वहन व्ययाचे निर्धारण याचा पाणीवापराच्या एकंदरीत कार्यक्षमतेमध्ये सुधारणा आणि ठोक तसेच किरकोळ अशा दोन्ही पातळ्यांवर पाण्याचे प्रशुल्क याचेशी महत्वाचा संबंध आहे. सिंचनाच्या बाबतीत कालव्यातील पाझर, द्वारांमधून होणारी गळती, पाण्याची चोरी व पळवापळवी यामुळे प्रकल्प नियोजनानुसार सिंचित होणारे क्षेत्र कमी होते. त्याच बरोबर कालव्याच्या पुच्छ भागातील शेतकऱ्यांना पाणी वेळेवर देणे व पुरेशा प्रमाणात देणे अशा दोन्ही बाबतीतील पाणीपुरवठ्यातील हमीला बाधा पोहोचते. घरगुती पाणी पुरवठ्याच्या बाबतीत वहन व्यय, पाण्याची चोरी यासारख्या हिशोबक्षम नसणाऱ्या बाबींमुळे किरकोळ ग्राहकांपासून प्रशुल्काच्या स्वरुपात मिळणारा संभाव्य महसूल तर कमी होतोच पण त्याचबरोबर ग्राहकांना मिळणाऱ्या दरडोई पाणी उपलब्धतेतही घट होते ज्या परिणामी त्यांना प्रचंड दराने खाजगी स्त्रोतांकडून पूरक पाणीपुरवठा करुन घ्यावा लागतो.

२. कालवा प्रणालीतील वहन व्ययाच्या यथायोग्य निर्धारणासाठी जलसंपदा विभागाने अचूक मोजमाप करणे व पाण्याचा बिनचूक हिशोब ठेवणे यास योग्य महत्व दिले पाहिजे. शेतीस मोजून पाणी देण्यासाठी जलसंपदा विभागाने उघड्या वहन मार्गामध्ये मुख्य कालवा, शाखा कालवा, वितरिका व लघुवितरिकांच्या विमोचकांपासून सुयोग्य मापक यंत्रे बसविली पाहिजेत. ही यंत्रे योग्य पध्दतीने बसवून प्रमाणीकरण (calibration) केलेली असली पाहिजेत. संबंधित प्रकल्प अधिकाऱ्यांनी या यंत्रांच्या ठिकाणी नियतकालीकपणे मापनांची नोंद ठेवली पाहिजे; संबंधित प्रमाणित आलेखाद्वारे विसर्ग परिगणित करुन पाहिला पाहिजे आणि दोन मापक यंत्रांच्या मधील लांबीतील वहनव्यय निर्धारित केला पाहिजे. <u>राज्यातील प्रत्येक मोठ्या व मध्यम पाटबंधारे प्रकल्पातील वहन व्ययाचा प्रकल्पनिहाय अभ्यास प्रत्येक हंगामात प्रकल्पाच्या नियंत्रक अधीक्षक अभियंत्यांनी केला पाहिजे. लघु पाटबंधारे प्रकल्पांच्या बाबतीत प्रत्येक जिल्ह्यातील</u>

काही प्रकल्प (अभ्यासासाठी) घेतले पाहिजेत. जलसंपदा विभागाने ३ महिन्याच्या कालावधीत क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनार्थ वहन व्यय निर्धारित करण्यासाठी प्रमाणित नमुना विकसित करावा. या प्रकल्पनिहाय वहनव्ययाचे अभ्यासाचा सिंचन स्थितीदर्शक अहवालात स्वतंत्र प्रकरण म्हणून समावेश असावा.

३. सर्व शेतकऱ्यांना समन्यायी पध्दतीने पाणी देता येणे व लघु वितरिकांच्या मुखाशी देण्यात आलेल्या पाणी हक्काच्या परिमाणाचा योग्य हिशोब ठेवणे पाणीवापर संस्थेला शक्य व्हावे यासाठी शेतचाऱ्यांमध्ये V-नॉचेस सारखी मापन यंत्रे बसविण्यात यावीत.

४. राज्यातील सिंचन व सिंचनेतर वापरासाठी मापन यंत्रे बसविण्याची जबाबदारी क्षेत्रीय अधीक्षक अभियंत्यांची आहे तर त्यांचे प्रमाणीकरण (calibration), नियतकालिक तपासणी व कामगिरीचे मूल्यमापन याबाबतची जबाबदारी जलसंपदा विभागाने मुख्य अभियंता, महाराष्ट्र जलसंपत्ती विकास केंद्र, औरंगाबाद/ वाल्मी, औरंगाबाद/ मेरी, नाशिक यांच्या अधिपत्याखालील संघटनेवर अतिरिक्त म्हणून सोपवावी. सहा महिन्याच्या कालावधीत शासनाने ही जबाबदारी पार पाडण्यासाठी ह्या मुख्य अभियंत्यांच्या अधिपत्याखालील संघटना यथायोग्यपणे बळकट करावी. तीन महिन्याच्या कालावधीत जलसंपदा विभागाने ह्या प्रयोजनासाठी तपशीलवार मार्गदर्शक तत्वे वितरित करणे गरजेचे आहे. मुख्य अभियंता, महाराष्ट्र जलसंपत्ती विकास केंद्र, औरंगाबाद यांनी ह्या बाबतीत त्यांच्या संघटनेच्या घडामोडींचा वार्षिक अहवाल प्राधिकरणाला सादर करीत जावा.

५. औद्योगिक व घरगुती प्रयोजनासाठीच्या पाणीवापराचे ठोक वापरकर्ते यांनी त्यांना पाणीपुरवठा होणाऱ्या स्थळांपाशी विसर्गात येणारी कमालीची दोलायमानता हाताळणे शक्य होण्यासाठी योग्य प्रमाणीकरण (calibration) केलेली प्रमाणित मोजमापके बसवावीत. अशा वापरकर्त्यांनी प्रक्रिया करुन परत सोडलेल्या पाण्याचा हिशोब लावण्यासाठी अशी मोजमापके वापरलेल्या पाण्याच्या विसर्गस्थळी देखील बसवावीत.

**परिशिष्ट १.३**
**(परिच्छेद १.७)**

## सन २०१३-१६ च्या दृष्टिनिबंधाच्या मसुद्याकरिता अभिप्राय दिलेल्या संबंधित विभाग/पाणीवापर गट/अशासकीय संघटना/तज्ञ यांची यादी

**तज्ञ**

१. श्री. रामस्वामी आर. अय्यर, माजी सचिव (केंद्रीय जल संसाधन मंत्रालय), भारत सरकार
२. श्री. ग्रॅमी टर्नर (जागतिक बँक सल्लागार )
३. श्री. लॅरी डी. सिंम्पसन (जागतिक बँक सल्लागार )
४. श्री. एस.एन.सहस्त्रबुध्दे (माजी कार्यकारी संचालक, जलसंपदा विभाग)
५. डॉ. एस.एस. मगर (माजी विशेष निमंत्रित, मजनिप्रा)
६. श्री. मनोहर मुणगेकर

**पाणीवापर गट**

१. पुणे महानगरपालिका
२. सोलापूर महानगरपालिका

**अशासकीय संघटना**

१. प्रयास,
२. सोपेकॉम,
३. लोकाभिमुख पाणी धोरण संघर्ष मंच,
४. श्रमिक मुक्ती दल

**संबंधित विभाग**

१. पुणे येथे दि.१५/१०/२०११ रोजी जलसंपदा विभागाच्या निवडक मुख्य अभियंता आणि अधीक्षक अभियंता यांचेसमवेत सूचना मिळविण्यासाठी आयोजित केलेल्या बैठकीतील लेखी अभिप्राय प्राप्त.

# प्रकरण - २

## सिंचन प्रणालीतील वहनव्यय आणि पाणी वापर कार्यक्षमता

२.१ सिंचन प्रणालीतील वहनव्यय ही एक नैसर्गिक घटना आहे आणि कालव्याच्या मुखाशी सोडलेले सर्वच पाणी पिकाच्या मुळाशी पोचत नसते - त्याचा व्ययकारी वापर होत नसतो. वहनव्यय प्रामुख्याने झिरपा आणि बाष्पीभवन यामुळे होतो आणि काही प्रकरणांत तो पाणी चोरी अथवा मार्गातील अनधिकृत पाणी उचलण्यामुळे होतो. कालव्यांची लांबी, कालव्यांचा आकार, भूस्तरातील मातीचा प्रकार, कालवा अस्तरित आहे की अस्तररहित आहे, अस्तरीकरणाची गुणवत्ता आणि स्थिती, अस्तररहित कालव्याची स्थिती (पावसामुळे पडणाऱ्या भेगा, उंदरांमुळे होणारी बिळे इ.) इत्यादी विविध घटकांवर वहनव्ययाचे परिमाण अवलंबून असते.

२.२ वहनव्ययाचे परिमाण व्यक्त करण्यासाठी "एकंदर सिंचन कार्यक्षमता" ही पारिभाषिक संज्ञा वापरली जाते आणि त्याचा अर्थ पिकाच्या मुळाशी त्याच्या वाढीस आवश्यक असणारे त्याच्या व्ययकारी वापरासाठी दिलेले पाणी व स्त्रोताजवळ सोडलेले पाणी यांचे गुणोत्तर असा आहे. एकंदर सिंचन कार्यक्षमता दोन भागात मिळून होते - वहन कार्यक्षमता आणि क्षेत्रीय उपयोजन कार्यक्षमता. वहन कार्यक्षमता आणखी दोन उपभागात विभागली जाते - कालव्याच्या मुखापासून ते विमोचकापर्यंत (चारीच्या मुखापर्यंत) आणि चारीच्या मुखापासून ते लाभक्षेत्रापर्यंत (शेतापर्यंत). या संज्ञा गणितीय भाषेत पुढीलप्रमाणे मांडता येतील -

| | | |
|---|---|---|
| मुख्य कालवा आणि शाखा कालव्यातील वहन कार्यक्षमता | Ec 1= | $\frac{\text{विमोचकाच्या मुखाशी उपलब्ध केलेले पाणी}}{\text{कालव्याच्या मुखाशी सोडलेले पाणी}}$ |
| वितरण प्रणालीतील वहन कार्यक्षमता | Ec 2= | $\frac{\text{क्षेत्रास दिलेले पाणी}}{\text{विमोचकामधून घेतलेले पाणी}}$ |
| क्षेत्रीय उपयोजन कार्यक्षमता | Ea = | $\frac{\text{पिकाच्या मुळाशी दिलेले पाणी}}{\text{क्षेत्राच्या मुखाजवळ घेतेलेले पाणी}}$ |

क्षेत्रीय उपयोजन कार्यक्षमता ही क्षेत्राची (पाणी सोडण्यापूर्वी) सिध्दता, मातीचा प्रकार, शेतचारीचा आकार, पाणी देण्याच्या पध्दती इत्यादी बाबींवर अवलंबून असते.

एकंदर कार्यक्षमता E = Ec1 X Ec2 X Ea

२.३ सर्वसाधारणत: विमोचकापर्यंतचे विसर्गमापन कालवा प्रणालीमध्ये बसविलेल्या विविध मोजमाप यंत्रणांद्वारे होते जसे की पार्शल फ्लूम, कट थ्रोट फ्लूम, अथवा द्वारयुक्त काटनियामकाच्या ठिकाणी. विमोचकाखालील विसर्गमापन व्ही नॉच सारख्या यंत्रणेतून होऊ शकते परंतु सहसा हा विसर्ग मोजला जात नाही. अशा प्रकारे, लघुस्तरावरील (क्षेत्रावर) वितरण प्रणालीतील पाण्याचा लेखाजोखा असत नाही. क्षेत्रीय उपयोजन कार्यक्षमता मोजणे तर याहून अवघड आहे. विमोचकाखालील कार्यक्षमता (Ec2 X Ea) बहुधा भात वगळून सर्व पिकासाठी ०.७५ गृहीत धरली जाते. भाताच्या लावणीकरता पाणी साठवण्याच्या पध्दतीमुळे जास्त पाणीनाश होत असल्यामुळे ही कार्यक्षमता कमी म्हणजे ०.६ ते ०.६५ पर्यंत गृहीत धरली जाते. तथापि, मुख्य कालवा, शाखा आणि वितरिका यामध्ये एकूण वहनव्ययाचा मोठा भाग येत असल्याने या वहनव्ययाचे योग्य निर्धारण, प्रकल्पाच्या एकंदर वहनव्ययाचा अधिक वास्तववादी अंदाज ठरेल.

२.४ महाराष्ट्रात एकूण सुमारे २१० पूर्ण झालेले आणि ३१० बांधकामाधीन मोठे व मध्यम प्रकल्प आहेत. पूर्ण झालेल्या आणि बांधकामाधीन एकूण ५४०० लघु प्रकल्पांसह या सर्व प्रकल्पांवर मिळून ३८-४० लक्ष हे. सिंचनक्षमता निर्माण झाली आहे. राज्यामध्ये धरणांच्या माध्यमातून एकूण ३३ अब्ज घ.मी. निर्मित साठयापैकी शेतीसाठी वळविलेले पाणी सुमारे १८-२० अब्ज घ.मी. आहे. राज्यात हजारो कि. मी. लांबीचे कालवे आहेत आणि म्हणून वहनव्यय हा फार मोठा असणे अपरिहार्य आहे आणि तो जरी नियोजनाच्या टप्प्यावर फक्त सोडलेल्या पाण्याच्या ५० % वाया गेल्याचे गृहीत धरलेला असला तरी जवळजवळ धरणातून सोडलेल्या पाण्याच्या दोन तृतीयांश एवढा असतो.

२.५ यापूर्वीच्या सन २०१०-१३ साठी ठोक जलदर निर्धारणाच्या निकषांसाठी केलेल्या दृष्टिनिबंधामध्ये वहनव्ययाच्या बाबीवर फारसा भर दिलेला नव्हता. जरी कृषिक्षेत्रातील जलसंधारणाबाबत (पाणी साठयाचा) विचार केला असला तरी कालव्यांमधील वहनव्ययाची प्रत्यक्ष आधारभूत माहिती त्यात अंतर्भूत नव्हती. निकषामध्ये, घनमापन दर निश्चित करण्यासाठी मोठया व मध्यम प्रकल्पांच्या बाबतीत गृहीत धरलेल्या कार्यक्षमता खालीलप्रमाणे - (**निकषाचे परिशिष्ट -२.१**)

| | | कालवा प्रणालीच्या पुनर्स्थापनेपूर्वी | कालवा प्रणालीच्या पुनर्स्थापनेनंतर |
|---|---|---|---|
| १. | मुख्य कालवा, शाखा आणि वितरिका यातील विमोचकापर्यंत कार्यक्षमता | ०.४७ | ०.६४ |
| २. | विमोचकाखालील कार्यक्षमता | ०.७५ | ०.७५ |
| ३. | एकंदर कार्यक्षमता | ०.३५ | ०.४८ |

सन २०१०-१३ च्या निकषामध्ये, राज्यात सध्या सरासरी भूपृष्ठावरील प्रति दलघमी पाण्यातून ११० हे इतके क्षेत्र सिंचित होत असल्याचेही नमूद केले होते.

२.६ **कालवे प्रणालीतील वहनव्यय**:

सन २०१०-१३ च्या दर निश्चिती प्रक्रियेतील दृष्टिनिबंधामध्ये कालवे प्रणालीतील सद्यःस्थितीत असलेल्या वहनव्ययाची आधारभूत सामुग्री गोळा करुन संकलित करता आली नाही व त्यामुळे देता आली नव्हती. या वहनव्यया संबंधीच्या माहितीच्या अभावी, दृष्टिनिबंध आणि निकषाच्या मसुद्यावर झालेल्या जनसुनावण्यांचे वेळी कृषिक्षेत्रातील वापरकर्ते आणि काही अशासकीय संघटनांनी चिंता व्यक्त केली होती. त्यांनी अशीही निवेदने दिली की अशा गळती / व्ययामध्ये पाणीचोरी व अनधिकृत वापराचे प्रमाण फार आहे आणि जर ही गळती शोधून रोखली गेली तर अधिक क्षेत्र सिंचनाखाली आणता येईल आणि पर्यायाने शेतकऱ्यांवरील दराचा बोजा कमी करता येईल.

२.७ मजनिप्रा अधिनियमाच्या कलम ११ (घ) नुसार प्राधिकरणाने पाण्याची दर पध्दती प्रस्थापित करावयाची आहे आणि सिंचन व्यवस्थापनाच्या प्रशासकीय कार्यचालन व परिरक्षणाच्या संपूर्ण खर्चाची वसुली परावर्तित होईल अशा तऱ्हेने पाणीपट्टी आकारण्याचे निकष ठरवायचे आहेत. तथापि, प्राधिकरणास, पाण्याचा दक्षतेने वापर करण्यास चालना देणे आणि त्याचा अपव्यय टाळणे (कलम ११ (थ)) आणि पाण्याचे सुयोग्य संधारण व व्यवस्थापन करण्याच्या पध्दतीने प्रचालन व अंमलबजावणी करणे (कलम १२ (४)) ही जलदराशी संबंधित नसलेली कार्येसुध्दा पार पाडावयाची आहेत. लाभार्थींच्या मताशी वेगळेपणा राखत आणि अधिनियमातील तरतुदींनुसार पाण्याचा कार्यक्षम वापर डोळ्यापुढे ठेवून प्राधिकरणाने, वहनव्ययासंबंधी जलसंपदा विभागाकडे

असलेली माहिती गोळा करुन ती या प्रकरणात सादर केली आहे. पाण्याचा अपव्यय कमीत कमी करुन सिंचनक्षेत्र वाढविणे आणि त्यायोगे कृषिवापराचे जलदर कमी करण्याच्या प्रयत्नांबरोबरच, प्रशासकीय कार्यचालन आणि परिरक्षणाचा प्रत्यक्ष खर्च वसूल करण्यावर दरपध्दतीचा अभ्यास आधारीत करणे आवश्यक आहे. पाणीचोरीमुळे होणाऱ्या अपव्ययाबाबत असे म्हणता येईल की वरच्या स्तरावरील संस्था (प्रकल्प, मुख्य कालवा व वितरिका) त्याचप्रमाणे लघुवितरिका स्तरावरील पाणी वापर संस्था तयार झाल्यावर आणि वितरण प्रणाली त्यांचेकडे हस्तांतरित झाल्यावर सहभागात्मक सिंचन व्यवस्थापन जसजसे वाढेल तसतसा हा अपव्यय भविष्यात लक्षणीयरित्या पण हळूहळू कमी होत जाईल.

२.८ सन २०१०-१३ साठीच्या पाणी प्रशुल्काच्या निकषातील **परिशिष्ट ६** नुसार सेवापुरवठादार म्हणजेच जलसंपदा विभागावर राज्यातील वहनव्यय पध्दतशीरपणे सुनिश्चित करण्यासाठी काही जबाबदारी नेमून दिली आहे. हा अभ्यास जलसंपदा विभागाने चालू केला आहे. **परिशिष्ट ५** नुसार सुध्दा प्राधिकरणाने, जलसंपदा विभागास 'प्रति एकक पाणीसाठयानुसार सिंचित क्षेत्र' वाढत जाणारी पाणी वापर कार्यक्षमता साध्यकरण्याचे उद्दिष्टय ठरवून दिले आहे. आता पुढे देत असलेल्या माहितीनुसार परिच्छेद २.१७ मध्ये दिल्याप्रमाणे वाढीचा कल आढळून येतो.

**२.९ मुख्य कालव्याची वहन कार्यक्षमता** -

जलसंपदा विभाग राज्यातील ३५ मोठया प्रकल्पांतील मुख्य कालव्याच्या वहन कार्यक्षमतेचा अभ्यास करीत आहे. या कार्यक्षमतेची व्याख्या 'मुख्य कालव्यात सोडलेले पाणी आणि वितरिका व उपसा योजनांना पुरविलेल्या एकूण पाण्याचे गुणोत्तर' अशी केली आहे. दरवर्षी प्रसिध्द होणाऱ्या ''जललेखा अहवालामध्ये'' यासंबंधीचे निष्कर्ष देण्यात येतात. सन २००७-०८, २००८-०९ आणि २००९-१० ची माहिती **परिशिष्ट २.२** मध्ये दिली आहे.

२.१० **वहनव्ययासंबंधी जलसंपदा विभागाचे मापदंड** -

सन १९९२ मध्ये जलसंपदा विभागाने अस्तरित आणि अस्तरिकरण विरहीत कालव्यांचे संकल्पन करताना वापरण्याचे वहनव्ययाचे प्रमाण नेमून दिले आहे. हे प्रमाण खालीलप्रमाणे -

| **कालवा विसर्ग** | **व्यय घमी प्रति सेकंद / दलचौमी** | |
|---|---|---|
| | **अस्तरित कालवा** | **अस्तररहित कालवा** |
| ७ घमी / से. पर्यंत | १.२५ | ७ |
| ७ घमी / से. पेक्षा अधिक | ०.९० | ४.५० |

२.११ **वहनव्ययाबाबत क्षेत्रीय अभ्यास** - **इटियाडोह प्रकल्प (गोदावरी खोरे)**

२.११.१ केंद्रीय जलनियोजन आयोगाने (CWC) पुरस्कृत केलेल्या प्रकल्पोत्तर कामगिरीचे मूल्यमापनाच्या अभ्यासाचा भाग म्हणून जलसंपदा विभागाने सन २००५ मध्ये इटियाडोह प्रकल्पातील वहनव्ययाचा विस्तृत अभ्यास केलेला आहे. सुमारे ७२.५ किमी लांबीचा मुख्य कालवा आणि ४०.२३ किमी लांबीचा वैनगंगा शाखा कालवा आणि लघुवितरिका हे संपूर्ण कालवे अस्तररहीत आहेत. विविध वितरिका / लघुवितरिकांच्या उगमस्थानी मुख्य कालव्यातून सोडलेल्या पाण्याच्या लेखा परीक्षणावरुन मुख्य कालवा आणि शाखा कालव्यातील वहनव्यय परिगणित करण्यात आला. निवडक लघुवितरिकांवर मोजमाप यंत्रणा (फ्ल्यूमस) बसवून व आवक / जावक पध्दतीनुसार वहनव्यय काढण्यात आला. याचा निष्कर्ष खालीलप्रमाणे-

| कालवा | साखळी क्र. / लांबी | वहनव्यय घमी/से प्रति दलचौमी | वहनव्यय (%) | कार्यक्षमता (%) |
|---|---|---|---|---|
| मुख्य कालवा | शीर्षभाग ०-४० किमी | ७.८३ | २१.० | ७८.३ |
| | पुच्छभाग ४०-७२.५ किमी | ६.९५ | २२.४ | |
| शाखा कालवा | शीर्षभाग ०-१९ किमी | १०.७५ | २०.० | ७८.८४ |
| | मध्यभाग १९-३५ किमी | ८.७६ | २१.३ | |
| | पुच्छभाग ३५-४३.२ किमी | ११.०३ | २२.२ | |
| लघुवितरिका २ अ | मुख्य कालव्याच्या सा. क्र. ५९१० मी. पासून उद्‌गम झालेली आणि ११५० मी. लांबीची | १२.२ | २६.७ | ७३.८४ |
| अर्जुनी लघु वितरिका | मुख्य कालव्याच्या सा. क्र. २५१०० मी. पासून उद्‌गम झालेली आणि ८७६ मी. लांबीची | ११.७३ | २३.५३ | |
| बोरगाव लघु वितरिका | मुख्य कालव्याच्या सा. क्र. ६६१८० मी. पासून उद्‌गम झालेली आणि ३९४८ मी. लांबीची | ६.४७ | २८.२५ | |

२.११.२ शेततळी पध्दतीने (ponding method) क्षेत्रीय उपयोजन कार्यक्षमता, ९ लघु प्रकल्पांच्या निवडक भूखंडात काढण्यात आली आणि ही कार्यक्षमता भातासाठी ०.८० ते ०.९१ (सरासरी ०.८५) अशी आली. अशाप्रकारे प्रकल्पाची एकंदर पाणी वापर कार्यक्षमता

| ०.७८३ X | ०.७८८४ X | ०.७३८४ X | ०.८५ | = ३८.७५ % |
|---|---|---|---|---|
| (मुख्य) | (शाखा) | (वितरिका) | (शेतचाऱ्या) | |

## २.१२ **पाच प्रकल्पांमधील सिंचन कार्यक्षमता** :

राज्यातील पाच प्रकल्पांमधील सिंचन कार्यक्षमता भारतीय जलसंसाधन संस्थेच्या (Indian Water Resources Society, IWRS) प्रकाशनातील 'जलसंपत्ती प्रणालीची कार्यक्षमता (२००४)' मधून घेण्यात आली, ती खालीलप्रमाणे -

| | प्रकल्प आणि खोरे | वहन कार्यक्षमता | | | एकंदर | क्षेत्रीय उपयोजन कार्यक्षमता | प्रकल्प कार्यक्षमता |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मुख्य | शाखा | शेतचारी | | | |
| १ | नाझरे (मध्यम) कृष्णा खोरे जि. पुणे | ९२ | ७९ | ६८ | ४९ | ७७ | ३८ |
| २ | मन्याड (मध्यम) तापी खोरे जि. जळगाव | ८४ | ८६ | ६४ | ४४ | ६९ | ३१ |
| ३ | निर्गुणा (मध्यम) तापी खोरे जि. अकोला | ८५ | ७५ | ७२ | ४६ | ८३ | ३८ |
| ४ | असोला मेंढा (मोठा) गोदावरी खोरे जि. चंद्रपूर | ९४ | ७५ | * | ७० | ५८ | ४१ |
| ५ | कलोते मोकाशी (लघु) पश्चिमवाहिनी खोरे जि. रायगड | ८६ | ८९ | ६७ | ५१ | ५९ | ३० |

*शेतचाऱ्या नाहीत.

२.१३ सन २००६-०७ मध्ये अकोला पाटबंधारे विभागाने निर्गुणा मध्यम प्रकल्पाच्या रबी हंगामात कार्यक्षमतांचा अभ्यास केला. कालव्याच्या कार्यक्षम भागातील पाण्याचा लेखा ठेवण्यात आला व एकूण १८.२५ दलघमी पाणी वापर होऊन १४१०.३८ हे सिंचन झाले. निष्कर्ष खालीलप्रमाणे होते -

| कालवा | कार्यक्षमता |
|---|---|
| मुख्य कालवा | ०.८५ |
| डिग्रस वितरिका | ०.८६ |
| देऊळगाव लघुवितरिका | ०.८८ |
| शेतचाऱ्या | ०.७५ |
| एकंदर कार्यक्षमता | ०.४९ |
| क्षेत्रीय उपयोजन कार्यक्षमता | ०.७५ |
| एकंदर कार्यक्षमता | ०.३७ |

ही एकंदर कार्यक्षमता केंद्रीय नियोजन आयोगाच्या अहवालातील ०.३८ या कार्यक्षमतेशी जुळते.

**२.१४ लोणी लघु पाटबंधारे प्रकल्प**

वाल्मी, औरंगाबादने सन १९९१ ते १९९४ मध्ये लोणी लघु पाटबंधारे प्रकल्प, ता. खुलताबाद, जि. औरंगाबादचा अंगीकृत संशोधन अभ्यास केला होता. शिवणा नदीस मिळणाऱ्या गन नाल्याची उपशाखा असलेल्या नाल्यावर हा प्रकल्प आहे. या अभ्यासात सदर प्रकल्पातील कालवे प्रणालीच्या वहनव्ययाचे निर्धारण समाविष्ट होते. प्रकल्पीय उपयुक्त साठा ०.७७३ दलघमी असून सिंचन क्षेत्र १७० हे आहे. मुख्य कालवा २.५२ किमी लांबीचा आणि संकल्पित विसर्ग ०.१६४ घमी / से. आहे. तीनही वर्षांतील प्रत्येक आवर्तनाकरिता वहनव्ययाची मोजणी आवक / जावक पध्दतीने केली होती.

| | **१९९१-९२** | **१९९२-९३** | **१९९३-९४** |
|---|---|---|---|
| मुख्य कालव्यातील वहनव्यय कार्यक्षमता (%) | ८१ | ८७ | ७४ |
| शेतचाऱ्यांमधील वहनव्यय कार्यक्षमता (%) | ७२ | ७० | ७० |
| क्षेत्रीय उपयोजन कार्यक्षमता (%) | ८६ | ८५ | ८५ |
| एकंदर कार्यक्षमता (%) | ५० | ५१ | ४४ |

प्रकल्पाची सरासरी कार्यक्षमता ४८ %.

२.१५ **वहनव्यय अभ्यासाकरिता निवडलेले नवीन प्रकल्प**:

प्राधिकरणाने सुचविल्यानुसार जलसंपदा विभागाने राज्यातील खालील ८ मोठे व ४ मध्यम प्रकल्प वहनव्ययाच्या अभ्यासाकरिता निवडले आहेत. हे काम वाल्मी या संस्थेकडे सोपविण्यात आले असून ही संस्था सध्या या प्रकल्पांमधील मोजमाप यंत्रणेच्या संकल्पन वैशिष्टयासंबंधी आवश्यक आधारभूत माहिती गोळा करीत आहे.

**मोठे**

(१) निरा कालवा (कृष्णा)

(२) खडकवासला (कृष्णा)

(३) जायकवाडी (पैठण डावा कालवा) (गोदावरी)

(४) प्रवरा कालवा (गोदावरी)

(५) कुकडी (कृष्णा)

(६) उर्ध्व वर्धा (गोदावरी)

(७) पेंच (रामटेक धरुन) (गोदावरी)

(८) इटियाडोह (गोदावरी)

**मध्यम**

(१) नेर (कृष्णा)

(२) बेंबळा (गोदावरी)

(३) चारगाव (गोदावरी)

(४) पकडीगुड्डम (गोदावरी)

२.१६ **पाणी वापर कार्यक्षमता** :

सन २०१०-१३ च्या (जलदर निर्धारण) निकषानुसार जलसंपदा विभागाने खालील जबाबदारी पार पाडावयाची आहे -

(१) निकषाच्या परिच्छेद ३ / परिशिष्ट ५ नुसार प्रति दलघमी पाण्यामध्ये सिंचित क्षेत्रात वाढ करावयाची आहे. वर्षवार निश्चित केलेले उद्दिष्टय खालीलप्रमाणे -

| **वर्ष** | **उद्दिष्टय हे / दलघमी (राज्य सरासरी)** |
|---|---|
| २०१०-११ | १२० |
| २०११-१२ | १२५ |
| २०१२-१३ | १३० |

वरील उद्दिष्टयांच्या संनियंत्रणाकरिता प्राधिकरणाकडे मंडळनिहाय माहिती सादर करावयाची आहे.

(२) निकषाच्या परिशिष्ट ६ नुसार प्रकल्प निहाय राज्यातील प्रत्येक मोठया आणि मध्यम प्रकल्पांमध्ये संबंधित अधीक्षक अभियंतांनी वहनव्ययाचा अभ्यास करायचा आहे. लघु प्रकल्पांसाठी प्रत्येक जिल्हयातील काही प्रकल्प घ्यावयाचे आहेत.

२.१७ **पाणी वापर कार्यक्षमतेचे मंडळनिहाय संनियंत्रण** :

जलसंपदा विभाग दरवर्षी प्रसिध्द करीत असलेल्य बेंचमार्किंग अहवालामध्ये राज्यातील ४८ मोठे आणि १६४ मध्यम प्रकल्पातील प्रति एकक सिंचित क्षेत्राची माहिती आहे. सन २००७-०८, २००८-०९ आणि २००९-१० चे अहवाल तपासण्यात आले आणि अस्वीकाराहं अशी दोन्ही टोकाकडील आकडेवारी, सरासरी आकडेवारीवर तीव्र प्रभाव टाकणारी त्रुटीयुक्त माहिती म्हणून विचारात घेतली नाही. केवळ ६० हे. ते २५० हे. प्रति दलघमी मधील कक्षेत बसणारे प्रकल्प यानुसार निवडण्यात आले. ठाणे जिल्हयात जेथे भात हे प्रमुख पीक आहे, तेथे २५ हेक्टर प्रति दलघमी वा जास्त सिंचिंत क्षेत्र असलेले प्रकल्प केवळ विचारात घेतले. अशा रितीने ४३ मोठे व १३४ मध्यम प्रकल्प निवडण्यात आले. **निष्कर्ष परिशिष्ट २.१** मध्ये सादर कले आहेत. वर्षनिहाय गोषवारा खाली दिला आहे :

| वर्ष | वार्षिक सिंचन पाणी वापर (दलघमी) | वार्षिक सिंचित क्षेत्र (हे) | प्रति दलघमी सिंचित क्षेत्र (हे) |
|---|---|---|---|
| २००७-०८ | १३२१२ | १३, ४९, ३२७ | १०२ |
| २००८-०९ | १२८४२ | १२, ६५, ४१० | ९९ |
| २००९-१० | ९५२० | १०, ४६, १८९ | ११० |

सन २०१०-११ चा बेंचमार्किंग अहवाल आणि जललेखा अहवाल सन २०१२ च्या मध्यास उपलब्ध होतील. तथापि, सिंचन स्थितीदर्शक अहवाल २०१०-११ मध्ये दिलेल्या राज्यातील सर्व प्रकल्पांची सरासरी आकडेवारी खालीलप्रमाणे -

| वर्ष | वार्षिक सिंचन पाणी वापर (दलघमी) | वार्षिक सिंचित क्षेत्र (हे) | प्रति दलघमी सिंचित क्षेत्र (हे) |
|---|---|---|---|
| २०१०-११ | १५४०७ दलघमी | १८,४१,००० हे | ११९ हे / दलघमी |

अशा प्रकारे पाणी वापर कार्यक्षमतेत वाढ होण्याकडे कल असल्याचे दिसून येते.

**परिशिष्ट २.१**

परिच्छेद - २.५

## सन २००७-०८ ते २००९-१० मध्ये वार्षिक सिंचित क्षेत्र प्रति एकक (हे. / दलघमी)

(संदर्भ: महाराष्ट्र राज्याच्या पाटबंधारे योजनांचे बेंचमार्किंग अहवाल आणि जललेखा अहवाल - सन २००७-०८ ते २००९-१०)

| अ. क्र. | मंडळ कार्यालय प्रकल्प वर्गवारी | प्रकल्पाची वर्गवारी | प्रकल्पाचे नाव | | संकल्पित उपयुक्त साठा | सिंचन लाभक्षेत्र हे. | सिंचित क्षेत्र प्रति एकक पाणी वापर हे / दलघमी | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० | सरासरी |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १ | अकोला पाटबंधारे मंडळ, अकोला | मोठे | १ | नळगंगा | ६९.३२ | ८६०४ | १५९ | १४४ | - | १५२ |
| | | | २ | पूस | ९१.२६ | ८२१५ | १२६ | ७० | १०८ | १०१ |
| | | मध्यम | १ | ज्ञानगंगा | ३३.९३ | ४२४९ | २२५ | १५९ | - | १९२ |
| | | | २ | कोराडी | २०.७० | ४०६१ | २२२ | २२८ | - | २२५ |
| | | | ३ | लोअरपूस | ५९.६३ | ६६०० | ११३ | १३३ | १५० | १३२ |
| | | | ४ | मस | २२.०४ | ४४१५ | १६८ | २१४ | - | १९१ |
| | | | ५ | मोरणा | ४१.४६ | ४६३३ | १०८ | २२० | ११६ | १४८ |
| | | | ६ | निर्गुणा | २८.८५ | ५८३६ | १९० | १४५ | ८८ | १४१ |
| | | | ७ | पलढग | ७.५१ | १९३२ | १६६ | १२७ | १८२ | १५८ |
| | | | ८ | साईखेडा | २७.१८ | ३११६ | १२९ | ९४ | - | ११२ |
| | | | ९ | शहानूर | ४६.०४ | ७४६६ | १६२ | १६६ | - | १६४ |
| | | | १० | सोनल | १६.९२ | २४४७ | २१६ | - | १४३ | १८० |
| | | **सरासरी** | | | | | **१४६** | **११६** | **११३** | **१२५** |
| २ | बुलढाणा पाटबंधारे प्रकल्प मंडळ, बुलढाणा | मोठे | १ | वाण (बुलढाणा) | ८१.९६ | १५१०० | १२२ | ७३ | ८६ | ९४ |
| | | मध्यम | १ | मून | ३६.८३ | ७८०४ | ९५ | ११७ | १६४ | १२५ |
| | | | २ | तोरणा | ७.९० | १४६५ | - | ११० | ११३ | ११२ |

| अ. क्र. | मंडळ कार्यालय प्रकल्प वर्गवारी | प्रकल्पाची वर्गवारी | प्रकल्पाचे नाव | | संकल्पित उपयुक्त साठा | सिंचन लाभक्षेत्र हे. | सिंचित क्षेत्र प्रति एकक पाणी वापर हे / दलघमी | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० | सरासरी |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| | | **सरासरी** | | | | | **११८** | **८४** | **११३** | **१०५** |
| **३** | **लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, औरंगाबाद** | **मोठे** | १ | **जायकवाडी (टप्पा-१)*** | २१७१.०० | १८३३२२ | १०७ | ६७ | ९४ | ८९ |
| | | **मध्यम** | १ | अंबाडी | ११.५३ | २१४७ | - | १८८ | १६५ | १७७ |
| | | | २ | गडदगड | ४.६४ | ११८० | १६१ | २३८ | - | २०० |
| | | | ३ | गल्हाटी | १३.८४ | २२०० | - | ७० | १२३ | ९७ |
| | | | ४ | गिरजा | २१.२५ | ३४४३ | १९८ | १४६ | ११९ | १५४ |
| | | | ५ | जीवरेखा | ६.१३ | १०६४ | १४४ | १३६ | - | १४० |
| | | | ६ | कल्याण गिरजा | ८.४७ | १३७७ | १९२ | ९९ | - | १४६ |
| | | | ७ | करपारा | २४.९० | २१५१ | ८४ | - | १५४ | ११९ |
| | | | ८ | कोल्ही | ३.२३ | ४७२ | - | ९३ | २४५ | १६९ |
| | | | ९ | मासोळी | २७.१३ | २५९१ | ७८ | १०७ | - | ९३ |
| | | | १० | सुखना | १८.४९ | २५११ | २३५ | १३५ | - | १८५ |
| | | | ११ | खेलना | ११.०७ | २४२९ | १५० | - | २२९ | १९० |
उपरोक्त बाब विचारात घेऊन, पाटबंधारे विभागाच्या अधिपत्याखालील बांधकाम व सिंचन व्यवस्थापन कार्यप्रकारातील रुपांतरित अस्थायी आस्थापनेवरील पदांचा आढावा घेऊन मापदंड/ आकृतीबंध निश्चित करण्यासाठी तत्कालिन अधीक्षक अभियंता, पुणे पाटबंधारे मंडळ, पुणे यांचे अध्यक्षतेखाली समितीची स्थापना संदर्भाधीन शासन निर्णय दिनांक ७.९.२००१ अन्वये करण्यात आली होती. सदर समितीने सादर केलेल्या अहवालाबाबत शासन स्तरावर सखोल/सविस्तर व सर्वंकष विचार करण्यात आला. त्याअनुषंगाने **सिंचन व्यवस्थापन व देखभाल दुरुस्ती शाखेसाठी लागणाऱ्या रुपांतरित अस्थायी आस्थापनेचा आकृतीबंध सोबतच्या "प्रपत्र १" प्रमाणे राहिल. सिंचन व्यवस्थापन शाखेकडे धरण व इतर बाबी परिरक्षणासाठी असल्यास लागणा-या रुपांतरित अस्थायी आस्थापनेचा आकृतीबंध "प्रपत्र २" प्रमाणे ठरविण्यांत आला आहे. त्याचप्रमाणे बांधकाम कार्यप्रकारातील उप विभागासाठी लागणा-या रुपांतरित अस्थायी आस्थापनेचा आकृतीबंध "प्रपत्र ३" प्रमाणे राहिल. त्याशिवाय बांधकाम उप विभागाकडे धरण व इतर बाबी परिरक्षणासाठी असल्यास लागणा-**

**या रुपांतरित अस्थायी आस्थापनेचा आकृतीबंध "प्रपत्र ४" प्रमाणे निश्चित करण्यात आला आहे.**

तसेच सध्या अस्तित्वात असलेल्या रुपांतररित अस्थायी आस्थापनेवरील कार्यरत असलेल्या मोठया प्रमाणातील संवर्ग व त्याचे नामाभिधानामधील क्लिष्टता दूर होऊन, रुपांतरित अस्थायी आस्थापनेरील कर्मचारीवर्गाच्या संवर्गात सुटसुटीतपणा येण्यासाठी रुपांतरित अस्थायी आस्थापनेवरील सध्या अस्तित्वात असलेल्या विविध १७३ तांत्रिक व अतांत्रिक संवर्गातील कर्मचा-यांचे वेतनश्रेणीनुरुप आवश्यक अशा २७ संवर्गात **"प्रपत्र ७"** प्रमाणे समावेशन/ वर्गीकरण करण्यात आले आहे.

तरी आता सिंचन व्यवस्थापन शाखा कार्यालय व बांधकाम उपविभाग कार्यालयात वरील **प्रपत्र-१ ते प्रपत्र- ४** प्रमाणे ठरविलेल्या आकृतीबंधानुसार रुपांतरीत अस्थायी आस्थापनेवरील पदे राहतील. या आकृतीबंधानुसार क्षेत्रिय कार्यालयांनी अतिरिक्त ठरणारी पदे निश्चित करण्याबाबतची कार्यवाही तात्काळ करावी. तसेच, शासन परिपत्रक, पाटबंधारे विभाग, क्र.एलएबी १०८२/१७९९/४६९/आ.१४, दिनांक १८.८.१९८२ मधील रुपांतरित नियत स्थायी/ अस्थायी आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांच्या बदल्यांविषयक मार्गदर्शक सूचनांनुसार संबंधित सक्षम अधिकाऱ्यांनी आकृतीबंधानुसार अतिरिक्त ठरलेल्या कर्मचाऱ्यांचे दिनांक ३१.१०.२००३ पर्यंत आवश्यक तेथे प्रकल्प व सिंचन कार्यप्रकारातील कामाच्या ठिकाणी समावेशन करावे. सदर समावेशनाची कार्यवाही करीत असतांना कर्मचा-यांची समान वेतनश्रेणी, शैक्षणिक अर्हता व योग्यता विचारात घेऊन आवश्यक त्या ठिकाणी प्रशिक्षण देऊन नियुक्ती करावी. सदर नियुक्ती करण्यापूर्वी अतिरिक्त ठरलेल्या कर्मचा-याकडून **सदर समकक्ष पदावर स्वखुशीने व विना अट समावेशन** करण्याबाबतचे बंधपत्र घेण्यात यावे. जे अतिरिक्त कर्मचारी असे बंधपत्र देण्यास नकार दर्शवितील अशा कर्मचा-यांची नावे अतिरिक्त कर्मचा-यांच्या यादीत समाविष्ठ करावित. वरीलप्रमाणे समकक्ष पदावर समावेशन/वर्गीकरण केलेल्या कर्मचा-याचे पदनाम व वेतनश्रेणी पूर्वीप्रमाणेच राहील. सदर कर्मचाऱ्यास मुदतवाढ देताना मुळ पदावरच मुदतवाढ घेण्यात यावी. **उदाहरणार्थ "सुतार"** या पदावर सध्या काम करणाऱ्या अतिरिक्त कर्मचा-याचे **"मिस्त्री"** या पदावर वेतनश्रेणीनुरुप समावेशन केल्यावर त्याचे पदनाम **"सुतार (मिस्त्री)"** असेच राहील. परंतु, तो आवश्यकतेनुसार **मिस्त्री / सुतार** हया कोणत्याही पदाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या पार पाडील. तसेच समजा सुतार पदाचे मिस्त्री पदावर समावेशन झाले तर त्यास मिस्त्री पदावरुन मिळणारे इतर सेवाविषयक फायदे उदा.पदोन्नती, विशेष वेतन, किंवा इतर संवर्गात वर्गीकरण करणे इ. फायदे देय होणार नाहीत. हेच सुत्र इतर सर्व पदांना लागू होईल. सदर समावेशन करताना प्रकल्पावरील कामाची गरज लक्षात घेऊन त्या त्या विभागामध्ये किंवा शेजारील जवळच्या प्रादेशिक विभागांतर्गत बांधकामावरील प्रकल्प किंवा सिंचन

व्यवस्थापन विषयक संबंधित कामावर वर नमूद १९८२ च्या शासन निर्णयानुसार दिनांक ३१.१०.२००३ पर्यंत सामावून घ्यावे.

वरीलप्रमाणे कार्यवाही पूर्ण झाल्यावर सुधारीत आकृतीबंधानुसार जी पदे अतिरिक्त ठरतील त्याबाबतचा सविस्तर तपशील संबंधित कार्यकारी संचालक व प्रादेशिक मुख्य अभियंता यांनी संबधित परिमंडळीय अधिकारी यांना दिनांक ३०.११.२००३ पर्यंत सादर करावा. परिमंडळीय कार्यालयाने शासन निर्णय, पाटबंधारे विभाग, क्र.एलएबी १०८९/१५१/८९ आस्था.(काम) दि.१० जून १९९३ मधील मार्गदर्शक सूचनांनुसार अतिरिक्त ठरलेल्या कर्मचाऱ्यांची ज्येष्ठता पाहून **"प्रपत्र ५"** मधील २५ संवर्गातील कनिष्ठतम अतिरिक्त कर्मचाऱ्यांची नांवे वित्त विभागाच्या अतिरिक्त संवर्ग कक्षाकडे पाठविण्यासाठी वित्त विभागाच्या क्र. असंक १००१/प्र.क्र.२९/२००१/वित्तीय सुधारणा, दिनांक १०.९.२००१ च्या शासन निर्णयासोबतच्या **"परिशिष्ट ३ अ व ३ ब"** मध्ये शासनास दिनांक ३१.१२.२००३ पर्यंत निश्चितपणे सादर करावीत. सदर कर्मचा-यांना अतिरिक्त संवर्ग कक्षाकडे वर्ग करुन त्यांना सामावून घेईपर्यंतची कार्यवाही पूर्ण होईपर्यंत सदर अतिरिक्त कर्मचारी मुळ आस्थापनेवरच रहातील. जेणेकरुन अतिरिक्त ठरणा-या पदांवर कार्यरत कर्मचा-यांचे वेतन व भत्ते अदा करण्यास अडचण निर्माण होणार नाही.

सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक
दिनांक अन्वये मिळालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**( द. ल. थोरात )**
शासनाचे सह सचिव.

**सहपत्र : प्रपत्र १, २, ३, ४, ५.**

प्रत :-
मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा. प्रधान सचिव (सेवा) सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
मा. प्रधान सचिव(व्यय), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
मुख्यमंत्र्यांचे सचिव/ उपमुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा. मंत्री (पा. व ला.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा.राज्यमंत्री (पा. व ला.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा.मंत्री (कृ.खो. व को.पा.महामंडळे) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा. राज्यमंत्री, (कृ.खो. व को.पा.महामंडळे) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य १, मुंबई.
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य २, नागपूर.
महालेखापाल (लेखा परिक्षा) महाराष्ट्र राज्य १, मुंबई.
महालेखापाल (लेखा परिक्षा) महाराष्ट्र राज्य २, नागपूर.
कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद.
कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर.
कार्यकारी संचालक, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे.
कार्यकारी संचालक, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव
कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे.
महासंचालक, जल व भूमी व्यवस्थापन संस्था, औरंगाबाद.
पाटबंधारे भिगाच्या तसेच महामंडळाच्या अधिपत्याखालील सर्व मुख्य अभियंते/ अधीक्षक अभियंते.

२. अधीक्षक अभियंता यांनी या शासन निर्णयाच्या प्रती आपल्या अधिपत्याखालील सर्व कार्यकारी अभियंता यांना कृपया पाठवाव्यात.

अधीक्षक अभियंता व परिमंडळीय अधिकारी, पुणे परिमंडळ, पाटबंधारे संशोधन व विकास संचलनालय, पुणे.
अधीक्षक अभियंता व परिमंडळीय अधिकारी, कोल्हापूर परिमंडळ, कोयना बांधकाम मंडळ, सातारा.
अधीक्षक अभियंता व परिमंडळीय अधिकारी, औरंगाबाद परिमंडळ, दक्षता पथक, औरंगाबाद.
अधीक्षक अभियंता व परिमंडळीय अधिकारी, नाशिक परिमंडळ, घाटघर जलविद्युत प्रकल्प मंडळ, नाशिक.
अधीक्षक अभियंता व परिमंडळीय अधिकारी, मुंबई परिमंडळ, ठाणे पाटबंधारे मंडळ, ठाणे.
अधीक्षक अभियंता व परिमंडळीय अधिकारी, नागपूर परिमंडळ, नागपूर पाटबंधारे प्रकल्प अन्वेषण मंडळ, नागपूर.
अधीक्षक अभियंता व परिमंडळीय अधिकारी, अमरावती परिमंडळ, अकोला पाटबंधारे मंडळ, अकोला.
आ. (प्रशि.) कार्यासन संग्रहार्थ.

GR-20040204190446001

## प्रपत्र - १

### सिंचन व्यवस्थापन व देखभाल दुरुस्ती शाखेसाठी लागणा-या अस्थायी आस्थापनेचा मापदंड

| अ. क्र. | पदनाम | कालवे / वितरिका ( विसर्ग क्युसेक्स ) | | | | उपसा सिंचन योजना | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १०० पर्यंत | १०० ते १००० | १००० ते २००० | २००० पेक्षा जास्त | पंपगृह | उर्ध्वनलिका | सबस्टेशन | डिस्ट्रीब्युशन चेंबर |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| १ | मिस्त्री / मुकादम | १ ( २० ते ३० कि. मी. साठी ) | १ ( १० ते १५ कि. मी. साठी ) | १ ( प्रति १० कि. मी. साठी ) | १ ( प्रति ५ कि. मी. साठी ) | १ | | | |
| २ | मजूर | १ ( प्रति १० कि. मी. साठी ) | १ ( प्रति ५ कि. मी. साठी ) | १ ( प्रति २ कि. मी. साठी ) | १ ( प्रति १ कि. मी. साठी ) | -- | -- | -- | -- |
| ३ | चौकीदार / मजूर | -- | २ / प्रति काट नियामक | २ / प्रति काट नियामक | २ / प्रति काट नियामक | २ | २ ( प्रति १० कि. मी. साठी ) | २ | २ |
| ४ | मेकॅनिक / फोरमन | -- | -- | -- | -- | १ फोरमन<br>२ मेकॅनिक | -- | १ मेकॅनिक | -- |
| ५ | इलेक्ट्रीशियन / वायरमन | -- | -- | -- | -- | १ इलेक्ट्रीशियन<br>२ वायरमन | -- | १ इलेक्ट्रीशियन<br>२ वायरमन | -- |

टिप : - १) स्तंभ ३ मध्ये कालवा / वितरिकाची एकत्रित लांबी २० कि.मी. पेक्षा कमी असेल किंवा वहनक्षमता १० घ. फू./ सेकंदापेक्षा कमी असलेल्या वितरण प्रणालीला मिस्त्री / मुकादम अनुज्ञेय नाही.

२) या प्रपत्रातील मापदंड हे बारमाही सिंचन व्यवस्थापनासाठी असून बिगर बारमाही सिंचन प्रणालीसाठी वरील मापदंडाच्या ५० टक्के मापदंड अनुज्ञेय आहेत.

## प्रपत्र - २

### सिंचन व्यवस्थापन शाखेकडे धरण व इतर बाबी परिरक्षणासाठी असल्यास लागणा-या रुपांतरित अस्थायी आस्थापनेचा मापदंड

| अ. क्र. | पदनाम | मोठे धरण | मध्यम धरण | लघु पाटबंधारे प्रकल्प | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | माती / दगडी / संमिश्र | माती / दगडी / संमिश्र | लघु पाटबंधारे तलाव | को. प. बंधारा | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | मुकादम / मिस्त्री | ३ | २ | १ ( २ ल.पा.) | १ ( ४ को.प.बं) | |
| २ | मजूर / चौकीदार / मदतनीस | ९ / ६ | ७ / ५ | १ | १ | द्वारे बिगर स्वयंचलित / स्वयंचलित |
| ३ | माळी ( बगीचा असल्यास ) | १ | १ | --- | --- | |
| ४ | बोटचालक ( बोट असल्यास ) | १ | --- | --- | --- | |
| ५ | पंप ऑपरेटर ( गॅलरी असल्यास ) | २ | १ | --- | --- | |
| ६ | प्रयोग शाळा सहाय्यक (उपकरणे असल्यास) | १ | १ | --- | --- | |
| ७ | द्वारे ( असल्यास ) | | | | | |
| | १) यांत्रिकी / मेकॅनिक | २ | १ | --- | --- | |
| | २) वीजतंत्री / इलेक्ट्रीशियन | २ | १ | --- | | |

| अ. क्र. | पदनाम | विश्रामगृह | | वसाहत ( सदनिका ) | | | भांडार | बिनतारी संदेश योजना | चालू वाहनांसाठी प्रत्येकी | सिंचन भवन |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कक्ष १ ते ४ | कक्ष ४ पेक्षा जास्त | २० पेक्षा कमी | २० ते १०० | १०० पेक्षा जास्त | | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १ | खानसामा | १ | १ | --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| २ | चौकीदार /मजूर / मदतनीस/परिचर | ३ | ४ | ३ | ३ | ३ | ३ | १ | --- | ४ |
| ३ | माळी (धरणस्थळ नसेल तेथे ) | १ | १ | --- | --- | --- | --- | --- | --- | १ |
| ४ | वायरमन / पंप ऑपरेटर | --- | --- | --- | १ | १ | --- | --- | --- | २ |
| ५ | सफाई कामगार | १ | १ | --- | १ | २ | --- | --- | --- | ३ |
| ६ | प्लंबर / गवंडी / सुतार | --- | --- | --- | १ | १ | --- | --- | --- | १ |
| ७ | मिस्त्री/मुकादम/कारकून/बिनतारी संदेशक | --- | --- | --- | १ | १ | --- | २ | --- | १ |
| ८ | वाहनचालक | [illegible] | --- | --- | [illegible] | --- | --- | --- | १ | --- |
| ९ | मदतनीस (टँक र/टिपर/कॉंप्रेसर रोलरसाठी) | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | १ | --- |

(द.रु.घोरात)

<u>प्रपत्र-३</u>

<u>बांधकाम कार्यप्रकारातील उपविभागांसाठी लागणाऱ्या रुपांतरित अस्थायी आस्थापनेचा प्रस्तावित मापदंड</u>

| अ.क्र. | पदनाम | मोठे धरण/मध्यम धरण | | ल.पा.तलाव, को.प.बंधारे व इतर कामे | कालवे | | वितरिका | लाभक्षेत्र | उपसा सिंचन योजना | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | दगडी | माती | | मोठे | मध्यम | | | पंपगृह सबस्टेशन एकत्रित | ऊर्ध्वनलिका |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १) | मिस्त्री/मुकादम | १ (२ मोनोलिथसाठी) | १ (३०००० ते ५०००० घ.मी. वार्षिक) | १ | १ (६ कि.मी. साठी) | १ (१२ कि.मी. साठी) | १ (१००० हे.) | १ (१००० हे.) | १ | १ (१० कि.मी. साठी) |
| २) | मजूर/चौकीदार | २* (मोनोलिथ) | २* (१०००० घ.मी. वार्षिक) | २ | १ (३ कि.मी. साठी) | १ (६ कि.मी. साठी) | १ (५०० हे.) | १ (५०० हे.) | ३ | १ (५ कि.मी. साठी) |

टीप : १) मोठे पोहोच रस्ते, वसाहत बांधकामे, पुनर्वसन गांवठाण बांधकामे व ३ कोटींपेक्षा मोठया किंमतीची कालव्यावरील बांधकामं यासाठी स्तंभ ५ मधील लघु पाटबंधारे तलावाचे मापदंड वापरावेत.

२) *मोठया धरणांवर कमाल ३० मजूर/चौकीदार संख्या व मध्यम धरणांवर कमाल २० मजूर/चौकीदार संख्या.

( द.ल. थोरात)
शासनाचे सह सचिव

<u>**प्रपत्र - ४**</u>

<u>**बांधकाम उपविभागाकडे धरण व इतर बाबी परिरक्षणासाठी असल्यास लागणा-या रुपातंरित अस्थायी आस्थापनेचा मापदंड**</u>

| अ.क्र. | पदनाम | मोठे धरण | मध्यम धरण | लघु पाटबंधारे प्रकल्प | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | माती / दगडी / संमिश्र | माती / दगडी / संमिश्र | लघु पाटबंधारे तलाव | को. प. बंधारा | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | मुकादम / मिस्त्री | ३ | २ | १ ( २ ल.पा.) | १ ( ४ को.प.बं) | |
| २ | मजूर / चौकीदार / मदतनीस | ९ ६ | ७ ५ | १ | १ | द्वारे बिगर स्वयंचलित / स्वयंचलित |
| ३ | माळी ( बगीचा असल्यास ) | १ | १ | --- | --- | |
| ४ | बोटचालक ( बोट असल्यास ) | १ | --- | --- | --- | |
| ५ | पंप ऑपरेटर ( गॅलरी असल्यास ) | २ | १ | --- | --- | |
| ६ | प्रयोग शाळा सहाय्यक (उपकरणे असल्यास) | १ | १ | --- | --- | |
| ७ | द्वारे ( असल्यास ) | | | | | |
| | १) यांत्रिकी / मेकॅनिक | २ | १ | --- | --- | |
| | २) वीजतंत्री / इलेक्ट्रीशियन | २ | १ | --- | --- | |

| अ. क्र. | पदनाम | विश्रामगृह | | वसाहत ( सदनिका ) | | | भांडार | बिनतारी संदेश योजना | चालू वाहनांसाठी प्रत्येकी | सिंचन भवन |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कक्ष १ ते ४ | कक्ष ४ पेक्षा जास्त | २० पेक्षा कमी | २० ते १०० | १०० पेक्षा जास्त | | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १ | खानसामा | १ | १ | --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| २ | चौकीदार /मजूर / मदतनीस/परिचर | ३ | ४ | ३ | ३ | ३ | ३ | १ | --- | ४ |
| ३ | माळी (धरणस्थळ नसेल तेथे ) | १ | १ | --- | --- | --- | --- | --- | --- | १ |
| ४ | वायरमन / पंप ऑपरेटर | --- | --- | --- | १ | १ | --- | --- | --- | २ |
| ५ | सफाई कामगार | १ | १ | --- | १ | २ | --- | --- | --- | ३ |
| ६ | प्लंबर / गवंडी / सुतार | --- | --- | --- | १ | १ | --- | --- | --- | १ |
| ७ | मिस्त्री/मुकादम/कारकून/बिनतारी संदेशक | --- | --- | --- | १ | १ | --- | २ | --- | १ |
| ८ | वाहनचालक | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | १ | --- |
| ९ | मदतनीस (टॅंक र/टिपर/कॉंप्रेसर रोलरसाठी) | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | १ | --- |

## प्रपत्र - ५

## रुपांतरित अस्थायी आस्थापनेवरील समकक्ष पदे

| अ. क्र. | पदाचे नांव | वेतनश्रेणी | समकक्ष पदे |
|---|---|---|---|
| १ | फोरमन (कार्यदेशक) | ४५००-७००० | फोरमन / कार्यदेशक<br>वेतनश्रेणी ४५००-७००० मध्ये येणारी इतर पदे |
| २ | १) इलेक्ट्रीशियन<br>२) विजतंत्री<br>३) बिनतारी यंत्रचालक | ४०००-६००० | इलेक्ट्रीशियन / विजतंत्री / उपआवेक्षक / सर्वेक्षक / हिवताप संनियंत्रण निरीक्षक / जडयंत्रचालक श्रेणी-१ / सहा.कार्यदेशक / प्रमुख प्रयोगशाळा सहा. / वरिष्ठ सांधाता / वरिष्ठ सहा. सांधाता / वरिष्ठ यांत्रिकी / वरिष्ठ सहा. यांत्रिकी / जडयंत्रचालक श्रेणी-२ व ३ / विजतंत्री नि यांत्रिकी / विद्युत यांत्रिकी स्वयंचल यांत्रिकी / विजतंत्री नि जोडारी / वरिष्ठ सहा.लोहार / वरिष्ठ यंत्र कारागिर / सुरुंगवाला / कृषी सहाय्यक / बिनतारी यंत्रचालक /<br>वेतनश्रेणी रु.४०००-६००० मध्ये येणारी इतर पदे. |
| ३ | १) प्रयोगशाळासहाय्यक<br>२) मेकॅनिक<br>३) यांत्रिकी<br>४) बोटचालक | ३२००-४९०० | प्रयोगशाळा सहाय्यक / बोटवाला / सहाय्यक ग्रंथपाल / वेधशाळा सहाय्यक / दूरध्वनी -चालक / तांत्रिक सहाय्यक यांत्रिकी / रस्तारुळ चालक / यांत्रिकी सांधाता / संदेशक / कनिष्ठ सहाय्यक यांत्रिकी / यांत्रिकी सहाय्यक / जडयंत्र चालक श्रेणी-४ / अनुरेखक / डिझेल रस्तारुळ चालक / हिवताप संनियंत्रण कर्मचारी / गतीयंत्र चालक / गाळणी परिचर<br>वेतनश्रेणी रु.३२००-४९०० मध्ये येणारी इतर पदे. |
| ४ | १) मिस्त्री<br>२) वायरमन<br>३) पंप ऑपरेटर (पंपचालक)<br>४) प्लंबर<br>५) गवंडी<br>६) सुतार | ३०५०-४५९० | मिस्त्री / कनिष्ठ सर्व्हेक्षण सहाय्यक / वाहन चालक / जडवाहन चालक / विद्युत जनित्र चालक / क्षेत्रिय सहाय्यक / जोडारी (सांधाता) / यंत्रकारागीर / तारतंत्री नि जोडारी / सुतार / गवंडी / लोहार / तारतंत्री (वायरमन) / रंगारी / कातारी / नळ कारागीर / डिझेल यांत्रिकी / कनिष्ठ (विजतंत्री) चालक / सुरुंगवाला / मोजणीकार / सहाय्यक वाहन चालक / पंपचालक / हवादाब यंत्रचालक / मिश्रक / मोजणीदार / लाईनमन / हलके यंत्रचालक / कनिष्ठ सहाय्यक यांत्रिकी / यंत्रचालक / क्षेत्रिय सहाय्यक / विद्युत जनित्र चालक / कनिष्ठ विजतंत्री / घणकारी / भराव निरीक्षक / साचेकार / आवेधक / बंधकार / पत्त यंत्रचालक / गंधकी / कथिलगार<br>वेतनश्रेणी ३०५०-४५९० मध्ये येणारी इतर तांत्रिक पदे |

| अ. क्र. | पदाचे नांव | वेतनश्रेणी | समकक्ष पदे |
|---|---|---|---|
| ५ | कारकून | ३०५०-४५९० | कारकून / खेपा मोजक / कनिष्ठ दप्तर कारकून / दप्तर कारकून / अभिलेखापाल / रोजवहीपाल / दूरध्वनीचालक / भांडार कारकून / भांडार परिचर / खणपत्र लिपिक / हजेरीपट कारकून / भांडार लिपिक / वेळमापक / मिटर रिडर / मार्गदर्शक / हत्यारपाल /कार्यनोंद वहीधारक /फॉटलर / व्दारचालक / विंधनचालक / इंजिनचालक / दगड चरक यंत्रचालक / ऑगर मोजणीकार / कालवा निरीक्षक / रेंजर / जलपातळी निरीक्षक<br>वेतनश्रेणी रु.३०५०-४५९० मध्ये येणारी इतर अतांत्रिक पदे |
| ६ | वाहन चालक | ३०५०-४५९० | वाहनचालक / सहाय्यक वाहनचाल[illegible] /हवादाब यंत्र चालक / हलके यंत्रचालक / जड वाहनचालक |
| ७ | पंप ऑपरेटर | ३०५०-४५९० | विद्युत जनित्रचालक / तारतंत्री-नि-जोडारी / कनिष्ठ विजतंत्री चालक / यंत्रचालक / यंत्र कारागिर / डिझेल यांत्रिकी / कनिष्ठ विजतंत्री / कनिष्ठ सहाय्यक यांत्रिकी<br>वेतनश्रेणी रु.३०५०-४५९० मध्ये येणारी इतर पदे |
| ८ | १) माळी<br>२) खानसामा | २७५०-४४०० | माळी / खानसामा / सुरक्षा गार्ड<br>वेतनश्रेणी रु.२७५०-४४०० मध्ये येणारी इतर पदे |
| ९ | मुकादम | २६१०-४००० | मुकादम / सहाय्यक स्वयंचल जोडारी / सहाय्यक सांधाता / सहाय्यक कातारी / [illegible] नळ कारागिर / पंपपरिचर / निश्रण, [illegible] / नालाकिपर / चावीवाला / बोटवाला / तेलवाला / मापीवाचक / पाटकरी / उद्‌वाहकचालक / स्वयंपाकी / कार्यशाळा हस्तक / सहाय्यक विजतंत्री / मोची / दप्तरी<br>वेतनश्रेणी रु.२६१०-४००० मध्ये येणारी इतर पदे |
| १० | १) मजूर<br>२) चौकीदार<br>३) मदतनीस<br>४) परिचर<br>५) सफाई कामगार (मेहतर) | २५५०-३२०० | मदतनीस / जलव्दाररक्षक / स्वच्छक / सहाय्यक जोडारी / सहाय्यक लोहार / सहाय्यक साचेकार / सहाय्यक तारतंत्री / सहाय्यक तारमार्गतंत्री / खलाशी / संदेशवाहक / काळजीवाहक / चौकीदार / परिचर / प्रयोगशाळा परिचर / आगार चालक / मजूर / मेहतर (सफाई कामगार) / हमाल / पाणीवाला / टपाली / हिवताप कर्मचारी / झाडूवाला / सहाय्यक माळी<br>वेतनश्रेणी रु.२५५०-३२०० मध्ये येणारी इतर पदे |

(द.ल. थोरात)
शासनाचे सह सचिव

**परिशिष्ट ३.३**
**परिच्छेद ३.८**

महाराष्ट्र राज्यस्तरीय सिंचन प्रकल्पांच्या देखभाल व दुरुस्ती मापदंडांमधील सुधारणाबाबत अभ्यास

## देखभाल व दुरुस्ती चे २०१०-१३ करिता प्रस्तावित मापदंड
## जल व भूमि व्यवस्थापन संस्था अहवाल २००८ चा
## गोषवारा

**१. मूळ मापदंड:**

**१.१ शीर्षकामे:**

रु. ११००० प्रति दलघमी संकल्पित उपयुक्त साठयासाठी

- पावसाच्या दृष्टीने चांगले अथवा वाईट वर्ष असले तरी विचारात न घेता.
- सांडव्यावरील दरवाजांच्या देखभाल दुरुस्तीसाठी, मुख्य अभियंता (यांत्रिकी), नासिक यांच्या सुचनेनुसार अतिरिक्त तरतूद करण्यात यावी.

**१.२ वितरण व्यवस्था :**

(अ) रु. ३८० प्रति हेक्टर प्रत्यक्ष भिजविलेल्या क्षेत्राच्या आधीन राहून

- गेल्या ३ वर्षात प्रत्यक्ष भिजलेल्या क्षेत्राच्या सरासरी नुसार.
- बारमाही, इतर बारमाही व दुहंगामी पीकाचे क्षेत्र एकदाच धरुन.
- विहिरीवरील क्षेत्र विचारात घेऊ नये.
- खरीप पीकांना पाण्याची हमी दिल्यास व खरीप पिकांवर ५० % पाणीपट्टी आकारण्यासाठी कार्यवाही केल्यास, खरीप पिकांचे क्षेत्र प्रत्यक्ष भिजलेल्या क्षेत्रामध्ये समाविष्ट करावे.

(ब) रु. १९० प्रति हेक्टर शिल्लक क्षेत्रासाठी

शिल्लक क्षेत्र = लागवडीलायक क्षेत्र - प्रत्यक्ष भिजविलेले क्षेत्र.

(क) वरील (अ) व (ब) प्रमाणे येणाऱ्या एकूण खर्चाची वितरण प्रणालीच्या भागांनुसार खालीलप्रमाणे विभागणी करता येऊ शकेल.

- मुख्य व शाखा कालवे : ४० %
- वितरिका : २५ %
- लघुवितरिका : ३५ %

**१.३ कोल्हापूर पध्दतीचे बंधारे :**

(अ) रु. २३०० प्रति चौरस मीटर बर्ग्याच्या क्षेत्रफळावर.

(जलाशयातून बंधाऱ्यास पाणी पुरवठा होत असल्यास).

(ब) रु. १४५० प्रति चौरस मीटर बर्ग्याच्या क्षेत्रफळावर.

(जलाशयातून बंधाऱ्यास पाणी पुरवठा होत नसल्यास).

**१.४ शासकीय उपसा सिंचन योजना :**

(अ) वीजेचा खर्च, पंप हाऊसची देखभाल, उर्ध्वगामी नलीकांची देखभाल : प्रत्यक्ष होणाऱ्या खर्चानुसार

(ब) उपसा सिंचन योजनांची वितरण व्यवस्था: वरील १.२ प्रमाणे

**१.५ साठवण तलाव :** शीर्षकामे प्रमाणे (वरील १.१ पहावे)

**२. विशिष्ट परिस्थिती परिस्थितीला जुळवणी :**

(लागू असल्यास मूळ मापदंड व अतिरिक्त वाढ)

**२.१ प्रकल्पाचे आयुष्य :**

| **आयुष्य (वर्षे)** | **शीर्षकामे तसेच मुख्य / शाखा कालवे यासाठी अतिरिक्त तरतूद** |
|---|---|
| ३५ ते ७० | ७.५ % |
| ७० हून अधिक | १५ % |

टीप - गेल्या ३५ वर्षामध्ये, प्रकल्पांचे संबधित भागांचे नूतनीकरण किंवा अद्यावतीकरण केले असल्यास अतिरिक्त वाढ लागू होणार नाही.

**२.२ काळी माती :**

(प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात ५० टक्के पेक्षा जास्त जमीन काळया मातीची असल्यास खालीलप्रमाणे लागू राहील)

| **प्रकल्प** | **भाग** | **वरील परिच्छेद १.२ (क) प्रमाणे ठरविलेल्या मूळ मापदंडामध्ये वाढ** |
|---|---|---|
| मोठा | फक्त लघुवितरिका | मृद सर्वेक्षणानुसार लाभक्षेत्रातील काळया मातीच्या क्षेत्राच्या टक्केवारीच्या मर्यादेत |
| मध्यम | वितरिका व लघुवितरिका | १०० % |
| लघु | मुख्य / शाखा कालवा, वितरिका, लघुवितरिका | १०० % |

# प्रकरण - ४

## प्राप्त सूचना आणि निश्चित केलेले मुद्दे

### ४.१ कृषिक्षेत्र :

### ४.१.१ हंगामाच्या तारखा

ठोक जलदर निकष (२०१०-१३) मध्ये कोकण व विदर्भ आणि राज्यातील उर्वरित प्रदेशाच्या खरीप, रबी आणि उन्हाळी या तीनही हंगामांच्या केलेल्या व्याख्या खालीलप्रमाणे आहेत -

| **हंगाम** | **कोकण व विदर्भ वगळून उर्वरित प्रदेश** | **कोकण व विदर्भ** |
|---|---|---|
| खरीप | जुलै ते ऑक्टोबर | जुलै ते १५ नोव्हेंबर |
| रबी | नोव्हेंबर ते फेब्रुवारी | नोव्हेंबर ते ३१ मार्च |
| उन्हाळी | १ मार्च ते ३० जून | १ एप्रिल ते ३० जून |

सन २०१०-१३ करिता क्षेत्राधारित दर आदेश (शासन निर्णय दि. २९/६/२०११ अन्वये) निर्गमित करताना जलसंपदा विभागाने वरील कालावधी विशिष्ट तारखांसह आणखी स्पष्ट केला, तो खालीलप्रमाणे -

| **हंगाम** | **कोकण व विदर्भ वगळून उर्वरित प्रदेश** | **कोकण व विदर्भ** |
|---|---|---|
| खरीप | १ जुलै ते १४ ऑक्टोबर | १ जुलै ते १४ नोव्हेंबर |
| रबी | १५ ऑक्टोबर ते २८ फेब्रुवारी | १५ नोव्हेंबर ते ३१ मार्च |
| उन्हाळी | १ मार्च ते ३० जून | १ एप्रिल ते ३० जून |

जलसंपदा विभागाने निश्चित केलेल्या वरील तारखा २०१३-१६ कालावधीसाठी देखील लागू करण्याचे प्रस्तावित आहे.

### ४.१.२ पीकांचे वर्गीकरण :

सन २०१०-१३ च्या ठोक जलदर निर्धारणाच्या निकषांतील परिच्छेद १३.१.१ (दोन) मध्ये शिफारस केल्यानुसार पिकांचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करण्याचे दरप्रस्तावात आणि २०१०-१३ च्या प्रशुल्क आदेशामध्ये प्रस्तावित होते -

**खरीप**

१) अन्नधान्य, कांदा व इतर पीके

२) भुईमूग

३) भाजीपाला

४) भात

**रबी**

५) भाजीपाला

६) गहू

**७)** इतर रबी

**दुहंगामी**

८) मिरची, आले, तूर

९) कापूस

**उन्हाळी**

१०) भाजीपाला

११) भुईमूग

१२) भात

**बारमाही**

१३) ऊस, केळी

१४) फळबागा

जलसंपदा विभागाने सुचविल्यानुसार जरी यात कोणताही मोठा बदल २०१३-१६ साठी प्रस्तावित नसला तरी खालील किरकोळ बदल अंतर्भूत करण्याचे प्रस्तावित आहे -

| **आधीचे वर्णन** | **प्रस्तावित वर्णन** |
|---|---|
| **रबी** | |
| इतर रबी | इतर रबी आणि ज्वारी, कांदा |
| **दुहंगामी** | |
| मिरची, आले, तूर | मिरची, आले, तूर इत्यादि |

**सवलती :**

**४.१.३** ठोक जलदर निकष (२०१०-१३) च्या परिच्छेद १३.१.२ नुसार खालील सवलती प्रस्तावित केल्या होत्या -

(१) २ हेक्टर पेक्षा कमी क्षेत्रधारण करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी मूळ दराच्या ७५ % दर (उदा. केळी व फळबागा वगळून)

(२) विदर्भातील पंतप्रधान कार्यक्रमांतर्गत असलेल्या तसेच महाराष्ट्र शासनाने नक्षलग्रस्त घोषित केलेल्या जिल्हयातील ४ हे. पेक्षा कमी क्षेत्रधारण करणाऱ्या शेतकऱ्यांना मूळ दराच्या ५० % दर (ऊस, केळी व फळबागा वगळून)

(३) आदिवासी विकास उपयोजनेअंतर्गत प्रकल्पांतील आदिवासी शेतकऱ्यांना कोणतेही दर आकारण्यात येणार नाहीत.

(४) प्रकल्पग्रस्त लोकांना सर्व पिकांसाठी मूळ दराच्या ७५ % दर.

(५) पिकावर अवलंबित फळबागांसाठी मूळ दराच्या २५ % दर. तथापि आंतरपिक घेतल्यास संबंधित दर फक्त आंतरपिकास आकारला जाईल. याशिवाय फळबागांसाठीचे दर ऊस आणि केळीच्या दराच्या ७५ % पेक्षा जास्त असणार नाहीत.

(६) भात पिकासाठी घनमापन पध्दतीचा दर हा क्षेत्राधारित दराच्या ५० % राहील.

**४.१.४** जलसंपदा विभागाने असे मत प्रदर्शित केले आहे की, परिच्छेद ४.१.३ मधील सवलती अंमलात आणावयाचे काम अवघड आहे आणि त्या कमी केल्या पाहिजेत. जर शेतकऱ्यांवर सवलत मिळण्यापूर्वी पाणी मागणी अर्ज देतेवेळी लेखी पुरावा सादर करण्याची जबाबदारी ठेवली तर ही अडचण सोडविता येऊ शकेल. जलसंपदा विभागाने पाणी मागणीचे अर्ज बोलविताना त्यांच्या जाहीर प्रगटनामध्ये शेतकऱ्यांनी असा तपशील देण्याविषयीची बाब ठळकपणे नमूद केली पाहिजे. त्यामुळे क्षेत्रधारणे विषयी आणि आदिवासी व प्रकल्पाबाधितांसाठीच्या सवलती २०१३-१६ साठी सुध्दा चालू ठेवण्याचे प्रस्तावित आहे.

**४.१.५** फळबागांविषयक सवलतींच्या संदर्भात एक सूचना अशी आली आहे की हे दर ऊस व केळीच्या दराच्या ७५ % पेक्षा जास्त नसण्याविषयीची तरतूद वगळावी आणि शिवाय आंतरपिक घेतल्यास, आंतरपिक दर आणि फळबागांचा दर यापैकी जास्त असेल तो दर लावण्याचा विचार करावा. शेतकऱ्यांच्या आर्थिक उत्पनात भर

पडण्यासाठी राज्यात फळबागांस प्रोत्साहन देण्याची तसेच पौष्टिक आहाराची राज्यातील पातळी उंचावण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे फळबागा पिकासाठी दोनही सवलती चालू ठेवण्याचे प्रस्तावित आहे.

**प्रोत्साहने :**

**४.१.६** सन २०१०-१३ च्या ठोक जलदर निर्धारणाच्या निकषामध्ये क्षेत्राधारित पाणी पुरवण्यात सिंचनाच्या आधुनिक पध्दती वापरणाऱ्यासाठी अनुज्ञेय दराच्या ७५ % दर लागू असण्याची प्रोत्साहनात्मक सवलत होती. प्रवाही सिंचन क्षेत्रात बारमाही पिकांसाठी ठिबक व तुषार पध्दत अवलंबिण्यास पठिंबा देण्याची गरज आहे. अधिनियमातील कलम १४ (४) नुसार असा पाठिंबा देणे प्राधिकरणास बंधनकारक आहे. ठिबक व तुषार पध्दतीसारख्या आधुनिक सिंचनाच्या तंत्रांस आणखी वेग देण्याचे हेतुने आणि येत्या काही वर्षात गोडया पाण्याच्या कमतरतेस तोंड द्यावे लागणार असल्याची शक्यता विचारात घेऊन सिंचनाचे आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणाऱ्यास २०१३-१६ च्या ठोक जलदराच्या निकषात आणखी ७५ % वरुन ६० % पर्यंत दर कमी करण्याचे प्रस्तावित आहे. यासाठी शेततळी बांधण्यास स्वतंत्रपणे प्रोत्साहनात्मक सवलत देण्याची आवश्यकता आहे.

**शास्ती / दंड :**

**४.१.७** प्राधिकरणाच्या अधिनियमातील कलम १२ (११) नुसार दोनपेक्षा अधिक मुले असलेल्या व्यक्तिस मूळ दराच्या १.५ पट दंडनीय दर निश्चित केले आहेत. हे फक्त कृषि सिंचनासाठी पाण्याच्या हक्कदारीसच लागू आहे. ठोक जलदर निकषामध्ये (२०१०-१३) यानुसार कृषिक्षेत्राच्या क्षेत्राधारित दरामध्ये हा दंड दर्शविला होता. प्राधिकरणाने या तरतुदीचे कार्यान्वयन करु नये अशा मागण्या आहेत. संविधानात्मक तरतुदीनुसार प्रशुल्कातील हा दंड कुंटुंबाच्या आकारमानाशी निगडीत करावयाचा असल्याने प्राधिकरणास ही दंडात्मक तरतूद सन २०१३-१६ मध्ये देखील चालू ठेवणे भाग आहे. या तरतुदीत दुरुस्ती करणे अथवा ती वगळणे ही बाब शासनाच्या अखत्यारीत आहे.

**खाजगी उपसा योजना :**

**४.१.८** ठोक जलप्रशुल्क निर्धारणांचे निकष (२०१०-१३) मध्ये खाजगी उपसा सिंचन योजनांकरिता विविध पिकांचे जलदर ठरविण्याची पध्दत विशद केली नव्हती. ही पध्दत जलसंपदा विभागाच्या दर प्रस्तावामध्ये, जो लोकांच्या सल्लामसलतीसाठी वितरित केला होता, दिलेली होती. पूर्वी निश्चित केलेली ही पध्दत थोडक्यात खालीलप्रमाणे आहे -

(१) पुरवठयाच्या स्त्रोताच्या उद्‌भवावर आधारित दर असतील. (परिशिष्ट २ अ - ठोक जलदर निकष, २०१०-१३). आश्वासित पुरवठयासाठी मूळ दर आकारले जातील आणि हे दर, नियंत्रित पुरवठयास मूळ दराच्या ०.७५ पट, अंशतः आश्वासित पुरवठयास ०.५० पट आणि धरण / बंधारा / कोल्हापूर पध्दतीचा बंधारा या पायाभूत सुविधेच्या खर्चातील वाटा उचलला असल्यास ०.३३ पट अशा प्रकारे क्रमशः कमी होत जातील.

(२) बारमाही व फळबागा पिकांना क्षेत्राधारित पुरवठयाकरिता संबंधित क्षेत्राधारित दर प्रथमतः विचारात घेतले जातील. यावर शेतकऱ्यांनी पंप साहित्य इ. वर केलेल्या गुंतवणुकीचा विचार करुन ३५ % सवलत देण्यात येईल.

(३) एक हेक्टर सिंचनासाठी ५ अश्वशक्ती (एच.पी.) पंपाच्या वार्षिक ऊर्जा खर्चा प्रीत्यर्थ रु. १५०० आणि प्रचालन व परिरक्षणासाठी अंदाजे रु. १००० प्रतिवर्ष मालमत्तेच्या देखभालीसाठी धरले होते.

(४) अशा प्रकारे मूळ अनुज्ञेय दर हा ०.६५ (प्रवाही दर) - प्रचालन व परिरक्षण खर्च - उर्जा खर्च. (०.६५ हा गुणांक ३५ % गुंतवणूकीच्या सवलतीकरिता लागू आहे).

(५) बारमाही व फळबागा पिके ठिबक व तुषार सिंचनाचा अवलंब करुन घेतल्यास मूळ दर २५ % कमी करण्यात येईल.

(६) खरीप, रबी व उन्हाळी मधील इतर पिकांसाठी सध्याचे सन २००३ चे दर कायम ठेवण्यात आले होते.

(७) घनमापन पुरवठयासाठी पाणी वापर संस्थांना लघुवितरिका स्तरावर निश्चित केलेले घनमापन दर अनुज्ञेय राहतील.

**४.१.९** वरील पध्दतीने कोणत्याही खाजगी उपसा सिंचन वापरकर्त्याकडून एकही सूचना आली नाही. प्राधिकरणाने महाराष्ट्र उर्जा नियामक आयोगाकडून (MERC) खाजगी उपसा योजनांना लावण्यात येणारे आताचे उर्जा आकाराचे दर मिळविले आहेत व ते **परिशिष्ट ४.१** मध्ये दिले आहेत. खरीप, रबी व उन्हाळी हंगामातील इतर पिकांसाठी यथायोग्य नाममात्र वाढ सुचविली जाईल.

**शासकीय उपस सिंचन योजना :**

**४.१.१०** ठोक जलदर निर्धारणाचे निकष (२०१०-१३) मधील परिशिष्ट - २ ब मध्ये शासनाच्या मालकीच्या उपसा सिंचन योजनांचे ऊर्जा आकारासह प्रकल्पनिहाय जलदर निश्चित करण्याची पध्दत दिली आहे. या पध्दतीनुसार संपूर्ण ऊर्जा खर्च लाभार्थींनी उचलायचा आहे आणि क्षेत्राधारित पुरवठयाकरिता पिकनिहाय आणि घनमापन पुरवठयासाठी घनमापन दराने शुल्क भरावयाचे आहे.

**४.१.११** वरील पध्दतीसंबंधाने प्राप्त झालेला एक अभिप्राय असा आहे की उंचावरच्या भागातील आणि खालच्या भागातील शेतकऱ्यांस विषम न्याय मिळण्यास सदर पध्दत कारणीभूत होईल, कारण उंचावरच्या भागातील शेतकऱ्यांस ज्यादा दर मोजावा लागेल. शासकीय उपसा योजना बहुधा राज्याच्या अवर्षण प्रवण प्रदेशात घेतल्या जातात. यावर सूचना अशी आहे की शासकीय उपसा योजनांच्या आणि प्रवाही सिंचन योजनांच्या प्रचालन व परिरक्षणचा एकूण खर्च राज्याच्या एकूण प्रचालन व परिरक्षण खर्चात मिळवावा आणि जलदरातून तो वसूल करावा. अशीही सूचना आली आहे की शासकीय उपसा योजना देखील घनमापन पध्दतीने पुरवठा केल्या जाणाऱ्या प्रवाही सिंचनाच्या दरानेच चालवाव्यात. <u>या सूचनेची जलसंपदा विभागास सखोल तपासणी करावी लागेल.</u>

## ४.२ घरगुती :

**तत्वे :**

**४.२.१** ठोक जलदर निर्धारणाचे निकष (२०१०-१३) मध्ये पाण्याचे दर पुरवठयाच्या स्त्रोताशी संलग्न केले होते (संदर्भ: निकषाचे परिशिष्ट ३). आश्वासित पाणी पुरवठयाकरिता 'मूळ दर' होते. पाणी वापर संस्थेने वहनव्ययाचा भार सोसावयाचा असल्याने स्त्रोत जर वहनव्ययासह नियंत्रित पाणी पुरवठयाचा असेल तर पाण्याचा

दर मूळ दराच्या दुप्पट होतो. जर स्त्रोत अंशतः आश्वासित असेल तर दर, मूळ दराच्या ५० % होतो आणि वापर संस्थेने जर पायाभूत सुविधेचा प्रमाणशीर खर्चाचा वाटा उचलला असेल तर मूळ दराच्या ३३ % दर निश्चित केले होते. या वर्गवारीवर कोणतेही अभिप्राय / सूचना प्राप्त झालेल्या नाहीत आणि म्हणून या तरतुदी परिच्छेद ४.४.३ मधील नवीन प्रस्तावित तरतुदींबरोबर जलदरनिर्धारण निकष (२०१३-१६) मध्ये कायम ठेवण्याचे प्रस्तावित आहे. सोलापूर म.न.पा. ने असे सुचविले आहे की त्यांच्या देखभाली अंतर्गत असलेल्या काही बंधाऱ्यामुळे त्यांना सवलतीचे दर मिळावेत. हे बंधारे जलसंपदा विभागाने बांधलेले असल्याने आणि त्याच्या बांधकाम खर्चाचा वाटा म.न.पा. ने उचलला नसल्याने, सवलतीच्या दरासाठी बंधाऱ्यांच्या देखभालीचा विचार करता येत नाही. देखभाल खर्च पाणीवापरदारांस आकारावयाच्या किरकोळ दरातून वसूल करण्याची जबाबदारी म.न.पा.ची आहे.

**४.२.२** ठोक जलदर निर्धारण निकष (२०१०-१३) मध्ये मूळ दर तीनही हंगामाकरिता समान ठेवले होते आणि नवीन निकषांमध्ये हे कायम ठेवण्याचा दृष्टिकोन प्रस्तावित आहे. त्याचप्रमाणे व्यापारी प्रयोजन औद्योगिक वापराप्रमाणे यापुढेही मानले जाणे प्रस्तावित आहे.

**सवलती :**

**४.२.३** ठोक जलदर निर्धारण निकष (२०१०-१३) मध्ये ग्रामीण व शहरी पाणी वापरात फरक करण्याकरिता वेगवेगळे / कमी अधिक दर प्रस्तावित होते. यामध्ये ग्रामपंचायतींना दराच्या ७५ % दर, स्थानिक नागरी संस्थांना म्हणजेच नगरपालिकांना / नगरपरिषदांना ९० % दर आणि महानगरपालिकांना अनुज्ञेय दराच्या १.२५ पट दर आकारण्याची तरतूद होती. वरीलप्रमाणे वेगवेगळे दर सन २०१३-१६ करिता सुध्दा चालू ठेवण्याचे प्रस्तावित असले तरी १.२५ पट दर खालील अ, ब, क आणि ड वर्गाच्या २३ महानगरपालिकांना लागू होतील.

| अ | ब | क | ड |
|---|---|---|---|
| बृहन्मुंबई | पुणे | ठाणे | (१) कल्याण-डोंबिवली |
| नवी मुंबई | नागपूर | नाशिक | (२) उल्हासनगर |
| | | पिंपरी - चिंचवड | (३) भिवंडी-निजामपूर |
| | | | (४) मीरा-भाईंदर |
| | | | (५) मालेगाव |
| | | | (६) सांगली-मिरज-कुपवाड |
| | | | (७) सोलापूर |
| | | | (८) कोल्हापूर |
| | | | (९) औरंगाबाद |
| | | | (१०) नांदेड-वाघाळा |
| | | | (११) अमरावती |
| | | | (१२) जळगाव |
| | | | (१३) अहमदनगर |
| | | | (१४) धुळे |
| | | | (१५) वसई-विरार |
| | | | (१६) अकोला |

अन्य नगरपालिका नागरी स्थानिक संस्थांच्या (नगरपरिषदा) समान समजण्यात येतील व त्यांना मूळ दराच्या ९० % दराने आकारणी होईल.

**प्रोत्साहने :**

**४.२.४** ठोक जलदर निर्धारण निकष (२०१०-१३) मधील परिच्छेद १३.२.२ मध्ये घरगुती ठोक पाणी वापर संस्थांना, सांडपाण्यावर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या (म.प्र.नि.मं) विहीत मानकाप्रमाणे प्रक्रिया केलेले पाणी सिंचन / बगीचाकरिता वापरण्यायोग्य करण्यासाठी प्रोत्साहनात्मक सूट दिली होती. असे प्रक्रियायुक्त पाणी तयार करण्यासाठी लागणाऱ्या पाण्यास मूळ दराच्या ७५ टक्के प्रमाणे आकारणी करण्यात येत होती. प्राधिकरणाच्या असे निदर्शनास आले आहे की जलसंपदा विभागाबरोबर घरगुती पाणी वापर संस्थांच्या सर्वच करारनाम्यांमध्ये म. प्र. नि. मंडळाच्या मानकानुसार सांडपाणी शुध्दिकरणाची तरतूद केलेली असते. बहुतेक प्रकरणांमध्ये खालच्या बाजूस निवडलेल्या सिंचन वापरासाठी अशा प्रकारे प्रक्रिया केलेले सांडपाणी कालव्यात अथवा नदीमध्ये सोडले जाते. त्यामुळे ही सूट काढून टाकण्याचे प्रस्तावित आहे.

**४.२.५** नगर पालिका आणि महानगरपालिकांना सांडपाणी शुध्दीकरण प्रक्रिया केंद्रे उभारण्याचा आणि ती चालविण्याचा खर्च पुरविणे कठीण जाते. नागरी क्षेत्रातील सांडपाणी शुध्दीकरणाद्वारे पुनर्वापर आणि चक्रीय पुनर्वापरास प्रोत्साहन / पाठिंबा देण्यासाठी नगर विकास विभागाने १५/१०/२०१० चा शासन निर्णय पारित केला आहे (**परिशिष्ट ४.२**). त्यानुसार सर्व नागरी स्वराज्य संस्थांना शहरातील एकूण सांडपाण्याच्या २० % सांडपाणी चक्रीय वापर आणि पुनर्वापर केला जाईल याची खात्री करुन घ्यावी लागणार आहे. पुनर्वापर हा कृषि, व्यापारी अथवा औद्योगिक कारणास्तव असू शकेल. जलसंपदा विभागाने घरगुती पाणी वापर संस्थासमवेतच्या सर्व करारांमध्ये या शासन निर्णयाची दखल घेणे आवश्यक आहे आणि नगर विकास विभागाच्या शासन निर्णयातील हेतुला अनुसरुन स्थानिक स्वराज्य संस्थांना एकूण सांडपाण्यापैकी २० % पर्यंत चक्रीय पुनर्वापरास परवानगी दिली पाहिजे. तसेच जर प्रक्रियेनंतर हे सांडपाणी नैसर्गिक पाण्याच्या प्रवाहात सोडण्यास भाग पाडू नये. त्यापुढे, एखादी महानगरपालिका / नगरपालिका २० % पेक्षा जास्त सांडपाणी शुध्दिकरण करुन पुनर्वापर करु इच्छित असेल व खालील बाजूस दिलेल्या मूळ ठोक पाणी मंजुरीमध्ये कोणतीही बाधा येत नसेल तर, तसे करण्यास मंजुरी द्यावी. महानगरपालिका / नगरपालिका यांना अशा प्रकारे प्रक्रियायुक्त सांडपाणी

कोणत्याही अन्य वापर संस्थेस योग्य ते ठोक जलदर आकारुन विकू शकेल आणि या महसुलातून शुध्दिकरण केंद्रे चालविण्याच्या / अद्ययावत राखण्याचा खर्च भागवू शकेल. महानगर पालिका/ नगरपालिका यांनी प्रक्रियायुक्त सांडपाणी कोणत्याही संस्थेला विकताना प्राधिकरणाने निश्चित केल्यानुसार त्या त्या वर्गवारीचे ठोक जलदरानुसार पाणीपट्टी आकरली पाहिजे. हा दृष्टिकोन नदीतील पाण्याची गुणवत्ता सुधारण्यासच नव्हे तर नैसर्गिक पाण्याच्या मागणीवरील ताण कमी करण्यास मदत होईल.

**दंड / शास्ती :**

**४.२.६** ठोक जलदर निर्धारण निकष (२०१०-१३) मधील परिच्छेद १३.२.४ नुसार महानगरपालिकांनी त्यांची वाढीव पाणी मागणी चक्रीय पुनर्वापराद्वारे भागवायची आहे. राष्ट्रीय जल सेवाकार्याचे (National Water Mission) २० % पाणी वापर कार्यक्षमता वाढविण्याचे उद्दिष्टय आहे. महानगरपालिका चक्रीय पुनर्वापर स्वीकारुन त्यास हातभार लावू शकतील. अशा प्रकारे २० % पाण्याचा चक्रीय पुनर्वापर करुन औद्योगिक मागणी पुरविणारे आणि ती हळूहळू ५० % पर्यंत वाढविण्याचे उद्दिष्टय ठेवणारे सिंगापूर हे एक उत्तम उदाहरण आहे. ते (शहर) दरडोई पाणीवापराचे मापदंडही पुनर्विलोकित करुन ते खाली आणण्याचे उद्दिष्टय बाळगून आहे. जलसंवर्धन करण्याऐवजी त्याचे वाटप दरवर्षी १० % आपोआप वाढवावे अशाही मागण्या आहेत.

**४.२.७** चक्रीय पुनर्वापरास चालना देण्याचे दृष्टीने सर्व महापालिकांनी २०१६ पर्यंत एक तर २० % प्रक्रियायुक्त सांडपाणी इतर औद्योगिक वापरदारांस देण्यासाठी अथवा त्यांची मागणी २० % पर्यंत कमी करण्यासाठी उपलब्ध केले पाहिजे. त्यांनी (महापालिकांनी) माणशी पाणीवापराचे मापदंड निश्चित करण्यासाठी आणि पाईपलाइनमधील विना महसूलाची गळती / व्यय शोधून त्याचे परिमाण नक्की करण्यासाठी जललेखा ठेवला पाहिजे. सन २०१६ नंतर जलसंपदा विभागाने सध्याचे करार पुनर्विलोकनास येतील तेव्हा या बाबीसाठी आग्रह धरला पाहिजे. याची सुरुवात मुंबई, पुणे, नागपूर आणि औरंगाबाद या महानगरांनी पुढाकार घेऊन केली पाहिजे.

**४.२.८** ठोक जलदर निर्धारण निकष (२०१०-१३) मधील परिच्छेद १३.२.४ (३) नुसार महापालिकांवर २ वर्षांचे आत नवीन सांडपाणी प्रक्रिया केंद्रे स्थापन करण्याचा कृती आराखडा देण्याची जबाबदारी टाकण्यात आली होती. या प्रकरणाच्या परिच्छेद ४.२.३ मध्ये दिलेल्या २३ महापालिकांना ही बाब लागू आहे हे स्पष्ट करण्यात येत आहे. मे २०११ मध्ये दराचे आदेश निर्गमित केल्यामुळे हे आराखडे मे २०१३ पर्यंत सादर केले जाणे आवश्यक आहे अन्यथा, खरीप २०१३ पासून अनुज्ञेय दराच्या दीडपट दंडनीय दर आकारण्यात येतील.

**४.३ औद्योगिक वापर :**

**तत्वे :**

**४.३.१** ठोक जलदर निर्धारण निकष (२०१०-१३) मध्ये पाण्याचे दर पुरवठयाच्या स्त्रोताशी संलग्न केले होते (निकषाचे **परिशिष्ट ४**). विविध स्त्रोतांची वर्गवारी घरगुती वापराप्रमाणे सारखीच आहे. मूळ दर सर्व हंगामांसाठी एकच नव्हते - 'मूळ दर' हे रबी हंगामास अनुज्ञेय होते तर खरीपात या दराच्या ५० % दर व उन्हाळी हंगामात ते १५० % होते यावर एकही अभिप्राय / सूचना मिळालेली नसल्याने हेच दर २०१३-१६ साठीही प्रस्तावित करण्यात येत आहेत.

**४.३.२** उद्योगांचे दोन प्रकार नक्की करण्यात आले होते, ते म्हणजे प्रक्रियेसाठी पाणी वापर करणारे (मशिनरी थंड करणे, स्वच्छ करणे इ.) आणि कच्चा माल म्हणून पाणी वापर करणारे (शीतपेये). कच्चा माल म्हणून पाणी वापर करणाऱ्या उद्योगांस / कारखान्यांस मूळ दराच्या ५ पट दर निश्चित केले होते.

**उद्योगांस त्रिस्तरीय दर :**

**४.३.३** औद्योगिक दराचे आताचे स्वरुप द्विस्तरीय दरयुक्त म्हणजेच फक्त प्रक्रिया उद्योग आणि पाणी शीतपेयांसाठी पाणी वापरणारे उद्योग यांच्यात फरक करणारे असे आहे. शीतपेयासाठी कच्चा माल म्हणून पाणी वापरणाऱ्या उद्योगांना केवळ प्रक्रियेसाठी पाणी वापरणाऱ्या उद्योगांच्या ५ पटीने पाण्याचे दर लावलेले आहेत. मोठया प्रमाणावर रासायनिक प्रदूषण करणारे रासायनिक उद्योग, रंग, रेयॉन धागे, कागद, वीजेच्या सहाय्याने मुलामा देणारे, गॅल्हनायजिंग, चर्मोद्योग, पांढरे कापड शुभ्र

करणारे (ब्लीचिंग) यंत्रे स्वच्छ करणारे (ग्रीस काढून टाकणे) इ. उद्योग, औष्णिक, अन्नप्रक्रिया उद्योग, थंड करुन साठविणारे उद्योग यासारख्या कोणतेही रासायनिक प्रदूषण न करणाऱ्या उद्योगांप्रमाणेच समजण्यात येत होते. प्रक्रिया उद्योगांच्या ठोक पाणी वापराचे शुल्क रु. ३२/१० घमी अथवा रु. ६४/१० घमी स्त्रोतावर अवलंबून (धरण अथवा कालवा / नदी) असे आहे. रासायनिक प्रदूषणे दूर करण्याच्या (शुध्दिकरण) प्रक्रियेची किंमत रु. ६०-१००/१० घमी एवढी जास्त असू शकते. अशा प्रकारे उद्योगांना चक्रीय पुनर्वापरासाठी कोणतेही प्रोत्साहन मिळत नाही. कारण प्रक्रियायुक्त (शुध्द) पाण्यापेक्षा नैसर्गिक पाणी स्वस्त आहे. चक्रीय पुनर्वापरास आणि नद्यांमधील पाण्याची गुणवत्ता सुधारण्यास प्रोत्साहन देण्याकरिता सन २०१३-१६ पासून त्रिस्तरीय दररचना नव्याने प्रस्तावित करण्यात येत आहे ती अशी -

(१) औष्णिक केंद्रे, अन्न प्रक्रिया उद्योग, कृषि उद्योग यासारखे रासायनिक प्राणवायू मागणीच्या (COD) परिभाषेत प्रदूषण न करणारे उद्योग यांना मूळ दर.

(२) रासायनिक आणि इतर COD मध्ये मोजले जाणारे रासायनिक प्रदूषण करणारे उद्योग यांना मूळ दराच्या दुप्पट दर.

(३) शीतपेये उद्योगांना (पाणी हे कच्चा माल म्हणून वापरणारे) मूळदराच्या ५ पट दर.

वरील तीन वर्गांमध्ये उद्योगांचे वर्गीकरण महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या सल्ल्याने करण्यात येईल.

**सवलती :**

**४.३.४** ठोक जलदर निर्धारण निकष (२०१०-१३) मध्ये (परिच्छेद १३.३.२) कृषिउद्योग (कुक्कुटपालन, कॅनिंग, साखर प्रक्रिया, दुग्धव्यवसाय) यांना पाण्याच्या दरात सूट देण्यात आली होती आणि फक्त अनुज्ञेय दराच्या ७५ % दर आकारण्यात येत होता. प्राधिकरणाच्या निदर्शनास आणखी एक प्रकारचा कृषि उद्योग म्हणजे मका प्रक्रिया हा आला आहे. सन २०१३-१६ साठी कृषि उद्योगांना पूर्वी दिलेल्या सवलती यापुढेही चालू ठेवण्याचे आणि त्यात मका प्रक्रिया उद्योगसुध्दा अंतर्भूत करण्याचे प्रस्तावित आहे.

**४.३.५** निकषामधील याच परिच्छेदात पाण्याचा चक्रीय पुनर्वापर करणाऱ्या उद्योगांस प्रोत्साहनात्मक सूट दिली आहे, ती म्हणजे, जर एखाद्या उद्योगाने अशा पुनर्वापराच्या सहाय्याने त्यांची मागणी किमान २५ % ने कमी केली तर कमी झालेल्या मागणीस अनुज्ञेय दराच्या ७५% दर आकारला जाईल. सन २०१३-१६ साठी ही सूट पुढे चालू ठेवणे प्रस्तावित आहे.

**शून्य विसर्गाचे उद्योग :**

**४.३.६** विकसनशील देशांमध्ये शून्य विसर्गाच्या संकल्पनेस उत्तेजन देण्यात येत आहे. यामध्ये संस्था संपूर्ण सांडपाण्यावर प्रक्रिया करुन रासायनिक व सेंद्रीय मल (गाळ) स्वीकृत पध्दतीनुसार दूर केल्यानंतर त्या पाण्याचा पुनर्वापर करते. संस्था याप्रमाणे अगदी अल्प प्रमाणात (१०-१५%) वाटप केलेले पाणी, बाष्पीभवन आणि पाईपलाइनमधील व्यय अधिक प्रक्रियेत वापरल्या जाणा-या पाण्याची गरज भागविण्यासाठी उचलते. यासाठी प्रोत्साहन देण्याकरिता, शून्य विसर्गयुक्त उद्योगांस २०१३-१६ मध्ये अनुज्ञेय दराच्या फक्त २५ % दर त्यांनी उचलेल्या पाण्यास आकारण्याचे प्रस्तावित आहे.

**<u>प्रक्रियारहित/अंशत: प्रक्रिया केलेले सांडपाणी ग्रामपंचायत/ स्थानिक स्वराज्य संस्था/ नगरपालिका/ महानगरपालिकां कडून घेऊन प्रक्रिया उद्योगांसाठी वापरणाऱ्या उद्योगांची स्वतंत्र वर्गवारी</u>**

**४.३.७** (१) जर एखादा प्रक्रिया उद्योग जलसंपदा विभागाकडे, ग्रामपंचायत/नगरपालिका यांनी नैसर्गिक नदी-नाल्यात सोडलेले प्रक्रियारहित सांडपाणी मंजूर करण्यासाठी अर्ज करुन पाणी मागत असेल आणि ते सांडपाणी ( प्राथमिक ,द्वितीय आणि तृतीय) प्रक्रियेद्वारे शुध्द करुन उद्योगाच्या प्रक्रियेत वापरत असेल तर असे सांडपाणी त्या उद्योगास कोणताही आकार अथवा स्वामित्व शुल्क न लावता मंजूर करण्यात येईल. तथापि जलसंपदा विभागाने मात्र असा पाणी वापर मोफत करु देण्याऐवजी स्वामित्व शुल्क आकारण्याची सूचना केली आहे.

(२) जर महानगरपालिका यांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मानकाप्रमाणे शुध्द केलेले (द्वितीय प्रक्रियायुक्त सांडपाणी) जलसंपदा विभागासमवेतच्या करारानुसार त्यांना मंजूर केलेल्या पाण्यापैकी काही भाग प्रक्रियेनंतर परत (नैसर्गिक प्रवाहात)

उत्सर्जित करीत असेल आणि अशा प्रक्रियायुक्त सांडपाण्याची जैविक प्राणवायू मागणी (BOD) , जलाशयातील पाण्याच्या जैविक प्राणवायू मागणी (BOD) पेक्षा अधिक असेल ज्यामुळे उद्योगास त्या सांडपाण्याची गुणवत्ता जलाशयात साठविलेल्या पाण्याइतकी येण्यासाठी तृतीय प्रक्रियेप्रीत्यर्थ आणखी खर्च करावा लागत असेल तर वापराची अशी वर्गवारी वेगळया आधारावर हाताळली जाईल. उद्योगास दिलेल्या पाण्याची गुणवत्ता साठवलेल्या पाण्याच्या जैविक प्राणवायू मागणीच्या (BOD) तुलनेने हलक्या प्रतीची असल्यामुळे आणि त्या संस्थेने तृतीय प्रक्रियेसाठी भांडवली गुंतवणूक केली असल्याची बाब विचारात घेता पाणी प्रशुल्काचे दर मूळ दराच्या २५ % आकारण्यात येतील.

**४.३.८** ठोक जलदर निर्धारण निकष (२०१०-१३) मधील परिच्छेद १३.३.३ नुसार ''प्रदूषणकर्त्याने किंमत चुकवावी'' या तत्वाचा अंगीकार केला होता. सर्व उद्योगांनी नैसर्गिक जलप्रवाहात सांडपाणी सोडण्यापूर्वी (म.प्र.नि. मंडळाच्या मापदंडानुसार) प्रक्रियेद्वारे शुध्द करुन सोडणे आवश्यक असले तरी जे असे करण्यात कसूर करीत असतील त्यांना दंडनीय दर मूळ दराच्या दुप्पट लावला जात होता. ही दंडनीय तरतूद सन २०१३-१६ साठीही कायम ठेवण्याचे प्रस्तावित आहे.

**४.३.९** पूर्वीच्या निकषामध्ये बिगर सिंचन वापरकर्त्यांस प्रस्तावित केलेले बांधील शुल्क यापुढेही चालू ठेवणे प्रस्तावित आहे.

## ४.४ इतर मुद्दे :

### कृषिक्षेत्रातील समन्यायाचे मुद्दे :

**४.४.१** या दृष्टिनिबंधासाठी कोणीही या संबंधी मुद्दा उपस्थित केला नसला तरी पूर्वी अशासकीय संघटनांनी समन्यायाचे तत्व पाण्यास लावण्याचा मुद्दा उपस्थित केला होता. पिण्यासाठी मोफत व उदरनिर्वाहपूर्ती कृषि प्रयोजनासाठी कमीतकमी किंमतीत पाण्याची किमान गरज भागविण्याबाबत सन २०१०-१३ चे निकष निश्चित करताना प्राधिकरणाने घरगुती (पिण्याच्या) आणि कृषिवापरासाठी सुमारे एक तृतीयांश प्रचालन व परिरक्षणाचा खर्च लावला होता आणि उर्वरित खर्च उद्योगाने उचलायचा होता. याशिवाय ग्रामपंचायतींना शहरी भागापेक्षा सवलतीचे दराचा लाभ मिळत

आहे. अन्नधान्य पिकांच्या उत्पादनाचे ठोक मूल्य ३ ते ५ % धरुन दर ठरविला आहे तर हेच मूल्य नगदी पिकांसाठी ८ ते १० % आहे. अल्पभूधारक शेतकऱ्यांना, जमीनधारणेवर आधारित सवलती दिल्या आहेत. जर यापेक्षा अधिक सूट/सवलत द्यायची असेल तर ती राज्य शासनास राज्य जलनीतीत तसेच महाराष्ट्र सिंचन पध्दतीचे शेतकऱ्यांकडून व्यवस्थापन अधिनियम व महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम यांत आधी तरतूद करुन मगच देता येईल. याच्याशिवाय प्राधिकरणास ही बाब दराशी निगडीत करता येणार नाही.

**सिंचन पुनर्स्थापना शुल्क :**

**४.४.२** दि. ५/३/२००९ च्या शासन निर्णयानुसार राज्य शासनाने सिंचन पुनर्स्थापनेसाठी १/४/२००९ पासून बिगर सिंचनास पाणी वळविल्यामुळे कमी होणाऱ्या सिंचन क्षेत्राच्या रु. १ लाख/हे. प्रमाणे सुधारित दर निश्चित केले आहेत. तथापि ही रक्कम अस्तरीकरणासारख्या पाणी वाचवून सिंचन पुनर्स्थापित करावयाच्या पुनर्स्थापना कामांवर जलसंपदा विभागाकडून अभावाने वापरली जाते. आणि ती रक्कम बहुधा शासनाच्या महसुलात जमा होते. त्याचप्रमाणे पुनर्स्थापना खर्च देणाऱ्या पाणीवापर संस्थेस, हा खर्च पायाभूत सुविधेचा प्रमाणशीर खर्च म्हणून मानला न गेल्याने, कोणतीही दरात सवलत मिळत नाही. खालील सुधारित मापदंडानुसार ही पध्दती बदलण्याचे प्रस्तावित आहे-

(१) जेव्हा बिगर सिंचनास पाणी वळविण्यामुळे सिंचन बाधित होत असेल तेव्हा जलसंपदा विभाग लागणारे पाणी वाचविण्यासाठी कराव्या लागणाऱ्या प्रत्यक्ष पुनर्स्थापना कामाच्या (अस्तरीकरण, जास्तीचा साठा इ.) खर्चाचे प्रकरणनिहाय अंदाजपत्रक करुन पुनर्स्थापना खर्चाची किंमत ठरवील. ही किंमत, पाणी कोटा मंजुरीचे पत्र देण्यापूर्वी संबंधित पाटबंधारे विकास महामंडळाकडे लाभार्थी संस्था अदा करतील आणि पाटबंधारे विकास महामंडळाकडून ही रक्कम ठरविल्यानुसार प्रणालीच्या पुनर्स्थापनेचे प्रत्यक्ष कामासाठी वापरली जाईल.

**धरणाच्या खर्चाचा प्रमाणशीर वाटा देऊन निरंतरपणे सूट मिळविणाऱ्या संस्था :**

**४.४.३** सद्य:स्थितीत धरण, को.प. बंधारा / अन्य बंधारा यांच्या खर्चाचा वाटा देणारी संस्था मूळ दराच्या फक्त एक तृतीयांश (⅓) दराने पाणीपट्टी भरते. एखाद्या

संस्थेचा वापर उपयुक्त पाण्याच्या १० % असेल व त्यानुसार प्रकल्प किंमतीच्या (धरण/बंधाऱ्याची) १०% भांडवलीखर्चाचा वाटा देऊ शकते आणि ती रक्कम काही वर्षात कमी झालेल्या दरातून परत मिळवू शकते. परंतु अशी संस्था कराराच्या संपूर्ण कालावधीत कमी दराचा लाभ मिळवू शकते. हे राज्य शासनास एक प्रकारे नुकसानच आहे. त्यामुळे धरणांची प्रमाणशीर किंमत देण्याची ही संकल्पना बदलावयाचे प्रस्तावित आहे आणि अशा सर्व प्रकारचा खर्चातील सहभाग पाणीपट्टीचा आगाऊ भरणा म्हणून मानला जाईल. एकदा का ही आगाऊ भरणा रक्कम वळती झाली, की दरातील सूट देणे थांबवण्यात येईल यासाठीची वर्षांची संख्या १०% व्याजाने निव्वळ सांप्रत मूल्य (NPV) पध्दतीने काढली जातील.

तथापि ज्या संस्थानी, धरण / बंधारा याची पूर्ण किंमत उचलली असेल आणि अशा प्रकारे ते (बांधकाम) पूर्णपणे त्यांच्या मालकीचे असेल त्या संस्थांना विहित दराने स्वामित्व शुल्क आकारण्यात येईल.

**बाष्पीभवन व्यय आकारणी :**

**४.४.४** ज्या संस्थांना जलाशयातील पाणी कोटा दिला जातो त्यांना प्रमाणानुसार येणाऱ्या बाष्पीभवन व्ययाचे परिमाणही त्यातून मंजूर होते. धरणाखालील कालवा/नदीतून पाणी घेणाऱ्या संस्थांना मूळ दराच्या दुप्पट दर धरणातून सोडलेल्या पाण्यास लावला जातो. याबाबतीत योग्य पध्दत ठरविण्याचे दृष्टीने असे प्रस्तावित करण्यात येते की. बाष्पीभवन व्यय ही एक नैसर्गिक प्रक्रिया असल्यामुळे ती मानवी हस्तक्षेपामुळे झालेला प्रणालीतील व्यय मानण्यात यावी आणि त्यासाठी कोणालाही जबाबदार धरुन आकारणी करु नये. अशा प्रकारे धरणातून पाणी वापरणारांस त्यांनी उचललेल्या पाण्याच्या परिमाणा इतकी दराची आकारणी व्हावी. खालच्या बाजूस पाणी वापरणारांना, दर आधीच दुप्पट केलेले असल्याने (वहनव्ययाचा विचार करुन) त्यांना नदी/बंधाऱ्यातून उचलेल्या पाण्यासच - धरणातून सोडलेल्या नव्हे - हे दर आकारणे योग्य राहील.

**दंडापासून मिळणारा महसूल :**

**४.४.५** नेहमीच्या दरापासून मिळणाऱ्या महसूलाव्यतिरिक्त विविध वर्गातील वापरकर्त्यांस आकारलेल्या दंडामुळे अतिरिक्त महसूल राज्य शासनास मिळेल. दर निर्धारणाच्या

टप्प्यात, प्रचालन व परिरक्षण खर्च पूर्ण वसूल होण्याचे नियोजन करता येईल. परंतु अशा दंडामुळे किती रक्कम अतिरिक्त मिळू शकेल याचा अंदाज करता येणार नाही. त्यामुळे असे प्रस्तावित करण्यात येते की, पुनर्वापर इ. करिता दिलेल्या सवलती/सूट यामुळे महसूलात होणारी तूट या अतिरिक्त महसुलातून भरुन निघेल व म्हणून हा महसूल प्रचालन व परिरक्षण खर्चाच्या भागाशी जोडू नये.

**खाजगी उपसा सिंचन योजनांसाठी स्थिर शुल्क :**

**४.४.६** जलसंपदा विभागाने खाजगी उपसा सिंचन योजनांच्या सर्व शेतकऱ्यांस क्षेत्राधारीत शुल्कासह स्थिर शुल्क आकारण्याचे प्रस्तावित केले आहे. याच्या पुष्टयर्थ जलसंपदा विभागाने असे समर्थन केले आहे की फक्त काही शेतकरीच सिंचन करतात आणि संपूर्ण उर्जाखर्चाचा भार त्यांना सोसावा लागतो व अशा प्रकारे त्यांचेवरील भार वाढतो. परिणामी ते पुढील पीक घेण्यास निरुत्साही होतील व ही बाब योजना बंद होण्यास कारणीभूत ठरेल.

## परिशिष्ट ४.१

**परिच्छेद ४.१.९**

**खाजगी उपसा सिंचन योजनांसाठी मापदंड**

**उर्जा आकार**

| | |
|---|---|
| **१.** कृषि वापराकरिता कार्यसाधक मासिक दर (५ अश्वशक्ती पंपास)<br>(संदर्भ : मऊनिआ आदेश दि. १२/९/२०१०, २/१२/२०१०, ३१/१०/२०११) | |
| **मीटरसहीत जोडण्या** | **रु. / माह** |
| (१) निश्चित आकार रु. / अश्वशक्ती / माह (५ अश्वशक्तीसाठी) | ७५ |
| **(२)** उर्जा आकार स./किलोवॅट तास @ रु. १.७५/kwh प्रमाणे (१३१८ तास / अश्वशक्ती / वर्ष वापरास) | ७०६ |
| **एकूण** | **७८१** |
| **मीटररहित जोडण्या**<br>(१) भांडूप, पुणे, नाशिक विभागांकरिता वापराचे मापदंड १३१८ तास / अश्वशक्ती वर्ष पेक्षा अधिक व जेथे मूळ दर रु. २३४ /अश्वशक्ती/माह आहे.<br>(२) राज्यातील अन्य विभागांकरिता जेथे वापराचे मापदंड १३१८ तास/ अश्वशक्ती /वर्ष पेक्षा कमी आहे व जेथे मूळ दर रु. २००/ अश्वशक्ती/ माह आहे. | <br>११७०<br>१००० |
| **सरासरी** | **१०८५** |
| **२. ७५ % जोडण्या मीटररहित आणि २५ % मीटरसहित जोडण्या गृहीत धरुन**<br>भारित सरासरी दर = रु. (७८१X०.२५)+(१०८५X०.७५)<br>=रु. १००० / माह<br>अथवा रु. १२००० / वर्ष<br>५० % शासकीय अनुदान (सबसिडी) नुसार<br>भारित सरासरी दर = रु. ६००० / वर्ष<br>५ अश्वशक्ती पंपाने ३.६ हे सिंचित क्षेत्र (१ हेक्टर ऊस, २.६ हेक्टर इतर पिके) धरुन प्रति हेक्टर दर = ६०००/३.६ = रु. १६७० / हेक्टर | |
| **३. प्रचालन व परिरक्षण खर्च**<br>५ अश्वशक्ती पंपाची किंमत<br>वार्षिक देखभाल खर्च १२ % प्रमाणे<br>प्रति हेक्टर खर्च = ३६००/३.६ | <br>रु. ३०,०००<br>रु. ३६००<br>रु. १००० |

म्हणून सन २०१३-१६ साठी खाजगी उपसा सिंचन योजनांना ऊर्जा आकार रु. १६७० / हेक्टर आणि वार्षिक देखभाल दुरुस्ती खर्च रु. १००० / हेक्टर, ५ अश्वशक्ती पंपासाठी, असतील.

## परिशिष्ट ४.२
**परिच्छेद क्र. ४.२.५**

**नागरी क्षेत्रात सांडपाण्याचे**
**पुनर्चक्रीकरण व पुनर्वापराबाबत**

**महाराष्ट्र शासन**
नगर विकास विभाग
शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१०/१०१५/प्र.क्र.१२१/नवि-२०
मंत्रालय, मुंबई-३२.
दिनांक : १५ ऑक्टोबर, २०१०.

**प्रस्तावना :-** केंद्र शासनाने नागरी क्षेत्रात सांडपाण्यावर प्रक्रिया करुन त्याचे पुनर्चक्रीकरण व पुनर्वापर करण्याकरीता **एकूण सांडपाण्याच्या किमान २० टक्के सांडपाणी हे पुनर्वापरासाठी** उपलब्ध करण्यात यावे असे मानक विहित केले आहे. महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान राज्यात सुरु करताना राज्य शासनाने सांडपाण्याच्या पुनर्चक्रीकरण व पुनर्वापरासंबंधी सदर मानक स्विकृत केले आहे. सदर मानकाप्रमाणे शहरातील एकूण सांडपाण्याच्या किमान २० टक्के सांडपाणी पुनर्वापरात आणण्याकामी सुनियोजितपणे कार्यवाही होण्याच्या दृष्टीने कार्यपध्दती विहित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. या संदर्भात सर्वंकष विचारांती शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय :-**

०१. शहरातील एकूण सांडपाण्यापैकी किमान २०% सांडपाण्याचे पुनर्चक्रीकरण व पुनर्वापर होईल हे सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी स्वतःच्या प्रयत्नातून व नागरिकांना या कामी प्रवृत्त करुन सुनिश्चित करावे.

०२. नागरी भागात सांडपाण्याच्या पुनर्वापरास चालना देण्यासाठी प्रथम सांडपाण्यावरील प्रक्रियेद्वारे पुनर्वापरासाठी उपलब्ध होणारे पाणी कोणत्या कामासाठी वापरले जाऊ शकेल याचा अभ्यास होणे आवश्यक आहे. ज्याअर्थी सांडपाण्याच्या पुनर्वापराची शक्याशक्यता त्या त्या शहरांमधील स्थानिक परिस्थितीवर अवलंबून आहे, त्याअर्थी सांडपाण्याच्या पुनर्चक्रीकरणातून पुनर्वापरासाठी उपलब्ध होणारे पाणी हे खालीलपैकी कोणकोणत्या प्रयोजनासाठी वापरात येऊ शकेल याबाबतीत नागरी स्थानिक संस्थांनी पुर्वाभ्यास करण्याची कार्यवाही करावी:-

१) कृषि प्रयोजनार्थ पुनर्वापर. उदा. उद्याने, शेती, इत्यादी.

२) वाणिज्यीक प्रयोजनार्थ पुनर्वापर. उदा. पिण्याचे पाणी सोडून इतर कामाकरीता वापर उदा. वाहने धुणा-या कार्यशाळा, विटभटटया, मोठी बांधकामे, इत्यादी.

३) औद्योगिक प्रयोजनार्थ पुनर्वापर. उदा. कारखाने, विद्युतप्रकल्प, इत्यादी.

वरीलप्रमाणे अभ्यास करुन सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी शहरात सांडपाण्याचे पुनर्वापर कोणत्या प्रयोजनार्थ करणे व्यवहार्य व शक्य होईल हे सुनिश्चित करावे व त्यानुषंगाने सांडपाण्याचे पुनर्चक्रीकरण व पुनर्वापराचा सविस्तर प्रकल्प अहवाल तज्ञ सल्लागारांच्या मदतीने तयार करुन घ्यावा.

०३. सांडपाण्याच्या पुनर्चक्रीकरण व पुनर्वापरासंबंधी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना मदत करण्याच्या दृष्टीने याबाबतचे सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्याकरीता तज्ञ सल्लागारांची निवड करुन अशा मान्यता प्राप्त सल्लागारांची सूची ( Panel ) स्वतंत्रपणे प्रसिध्द करण्यात येत आहे. तसेच सांडपाण्याच्या पुनर्चक्रीकरण व पुनर्वापरा विषयीचे प्रकल्प सार्वजनिक - खाजगी सहभाग तत्वावर (PPP तत्वावर ) देखील घेणे शक्य व्हावे यादृष्टीने या संबंधातील आदर्श निविदा प्रपत्र व आदर्श करारनामे इत्यादी तयार करुन सर्व नागरी स्थानिक संस्थांना स्वतंत्रपणे वितरीत करण्यात येतील.

०४. राज्य शासनाच्या " महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान व महाअभियानाअंतर्गत" पहिल्या टप्प्यात राज्यातील सर्व "ड"वर्ग महानगरपालिका, विभागीय व जिल्हा मुख्यालयाची शहरे आणि जिल्हयातील लोकसंख्येच्या दृष्टीने दुस-या क्रमांकावर असलेल्या शहरांमध्ये पाणी पुरवठा, मल:निस्सारण व नागरी स्वच्छता या क्षेत्रात शासन मान्य मानकाप्रमाणे पायाभूत सुविधा विकसित करणे किंवा त्यांची दर्जावाढ करणे, तसेच नागरी क्षेत्राच्या पर्यावरणात सुधारणा घडवून आणण्यासाठी प्रदूषण नियंत्रण व पर्यावरण संवर्धनाच्या उपाययोजना हाती घेण्याकरीता अर्थसहाय्य अनुज्ञेय करण्यात आले आहे. त्यानुषंगाने या महाअभियानात मल:निस्सारण प्रकल्प मंजूरीस्तव सादर करताना मल:निस्सारण प्रक्रियेत किमान २० टक्के सांडपाण्याचे पुनर्चक्रीकरण करुन पुनर्वापरासाठी पाणी उपलब्ध होऊ शकेल अशा दृष्टीने वरील पूर्वाभ्यासाच्या आधारे उचित उपाय योजना प्रस्तावित करण्यात याव्यात.

०५. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकडून किमान २० टक्के सांडपाण्याचे पुनर्चक्रीकरण व पुनर्वापरासाठी वर नमूद केल्यानुसार प्रयत्न होत असतांना त्यासोबतच शहरात मोठ्या

रहिवाशी/व्यावसायिक/औद्योगिक प्रकल्पांमध्ये सांडपाण्याचे पुनर्चक्रीकरण व पुनर्वापर अनिवार्य करणे गरजेचे आहे. यासाठी **सांडपाण्याच्या पुनर्वापरासंबंधी उपविधी तयार करुन सर्व नागरी स्वराज्य संस्थांनी लागू करावेत.** नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना यासंदर्भात उपविधी तयार करण्याकामी मार्गदर्शन व्हावे यासाठी आदर्श उपविधी स्वतंत्रपणे सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना शासनाकडून प्रसृत करण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**( मनु कुमार श्रीवास्तव )**
**सचिव,**
**नगर विकास विभाग**

प्रति,
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
मा. राज्यमंत्री, नगर विकास यांचे खाजगी सचिव,
मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबइ
प्रधान सचिव (नवि-१) नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव (उद्योग), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई
सचिव (ऊर्जा), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई
सचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई
महालेखाकार ( लेखा व अनुज्ञेयता )-१, मुंबई
महालेखाकार ( लेखा व अनुज्ञेयता )-२, नागपूर.
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
अधिदान व लेखा अधिकारी ( फोर्ट ) मुंबई
व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र अर्बन इन्फ्रास्ट्रक्चर फंड ट्रस्टी कंपनी लिमिटेड , मुंबई
व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र अर्बन इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कंपनी लिमिटेड,मुंबई
विभागीय आयुक्त (सर्व)
जिल्हाधिकारी (सर्व)
आयुक्त तथा संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई.
आयुक्त, सर्व महानगरपालिका / मुख्याधिकारी सर्व "अ" नगरपरिषदा
निवडनस्ती- नवि-२०

Water Reuse D:\SRIVASTAVA\shrivastav3

# प्रकरण - ५

## आधारभूत सामुग्री

**शेतीविषयक माहिती**

**पीक उत्पादन :**

५.१ २०१०-१३ साठीच्या प्रशुल्क प्रस्तावात (परिशिष्ट ४.१) खाली दर्शविल्यानुसार वेगवेगळया सिंचित पिकांचे उत्पादन विचारात घेण्यात आले होते.

| | पिके | उत्पादन (क्विंटल / हेक्टर) |
|---|---|---|
| | **खरीप** | |
| १. | अन्नधान्य व इतर खरीप | १२ |
| २. | भुईमूग | १८ |
| ३. | भाजीपाला, कांदा | ५० |
| ४. | भात | २० |
| | **रबी** | |
| ५. | भाजीपाला | ५० |
| ६. | गहू | २० |
| ७. | इतर रब्बी (हरबरा, तेलबिया) | १५ |
| | **दुहंगामी** | |
| ८. | मिरची, आले, तूर | १५ |
| ९. | कापूस | २० |
| | **उन्हाळी** | |
| १०. | भाजीपाला | ५० |
| ११. | भुईमूग | २५ |
| १२. | भात | २५ |
| | **बारमाही** | |
| १३. | ऊस | ८०० |

५.२ केंद्रीय जल आयोगाच्या 'जल व अनुषंगिक आकडेवारी ' (Water & Related Statistics) (डिसेंबर २०१०) या अहवालात महाराष्ट्रातील विविध सिंचित पिकांच्या

उत्पादनाची सन १९९९ ते २००६ पर्यंतची माहिती नमूद केलेली असून सदर अहवालाच्या आधारे उपरोक्त सिंचित पिकांच्या उत्पादनाचा आढावा घेण्यात आला. त्यापैकी प्रत्येक पिकाचे जास्तीत जास्त उत्पन्न असलेल्या वर्षातील आकडेवारी तसेच अन्य संस्था उदा. महात्मा फुले कृषि विद्यापीठ - राहुरी, कमिशन फॉर ॲग्रिकल्चरल कॉस्ट अँड प्रायसेस (CACP) चा ऑक्टोबर २०११ मधील 'प्रायसिंग क्रायसिस इन कॉटन' या शीर्षकाचा अहवाल, शेती व सहकार विभाग, भारत सरकार यांनी प्रसिध्द केलेला 'ॲग्रीकल्चरल स्टॅटिस्टीक्स ॲट अ ग्लान्स २०११' या सारख्या अहवालात नमूद केलेली सिंचित पिकांच्या उत्पन्नाची आकडेवारी पुढे दर्शविली आहे.

| | पिके | उत्पादन क्विंटल / हेक्टर (केंद्रीय जल आयोग अहवाल) | उत्पादन क्विंटल / हेक्टर (अन्य संदर्भ) |
|---|---|---|---|
| | **खरीप** | | |
| १) | अन्नधान्ये व अन्य खरीप | १२ (बाजरी) | |
| | | १७ | |
| २) | भुईमूग | २४ | |
| ३) | भात | | |
| | **रब्बी** | | |
| ४) | गहू | १६ | |
| ५) | हरबरा | ७.४ | २५ ते ३० (कृषि विद्यापीठ, राहुरी नुसार) |
| | **दुहंगामी** | | |
| ६) | कापूस | ३.१ | ५.१ पंजाब राज्यातील १००% सिंचित क्षेत्रासाठी (CACP अहवाल) |
| ७) | तूर | - | १५-१६ (कृषि विद्यापीठ, राहुरी नुसार) |
| | **बारमाही** | | |
| ८) | ऊस | ९०० | ७९० (शेती विभाग, भारत सरकार नुसार) |

५.३ प्रशुल्क प्रस्तावात (२०१३-१६) खाली दिल्यानुसार उत्पादनाचे आकडेवारी विचारात घेण्याचे प्रस्तावित आहे.

| **पिके** | **उत्पादन (क्विंटल / हेक्टर)** |
|---|---|
| १) अन्नधान्ये | १२ |
| २) भुईमूग | १७ |
| ३) भात | २४ |
| ४) गहू | १५ |
| ५) हरबरा, तेलबिया | १५ |
| ६) कापूस | ५ |
| ७) तूर | १५ |
| ८) ऊस | ८०० |

५.४ राज्यातील विविध कृषि विद्यापीठांकडील आधार सामग्रीनुसार भाजीपाल्यांचे उत्पादन पुढील प्रमाणे आहे. तथापि ही नियंत्रित परिस्थितीत साध्य करण्यात आलेल्या उत्पादनाची आकडेवारी आहे.

| **भाजीपाला** | **उत्पन्न (टन / हेक्टर)** |
|---|---|
| १) टोमॅटो | ५०-६० |
| २) कांदा | १५-२० खरीपमध्ये |
| | २५-३० रब्बीमध्ये |
| ३) वांगी | २५-३५ |
| ४) पालेभाजी | ८ |

पूर्वी कांदा या पिकाचे उत्पादन ५ टन / हेक्टर असे विचारात घेण्यात आले होते ते आता १५ टन / हेक्टर इतके वाढविण्यात येत आहे.

**किमान आधारभूत किंमत :**

५.५ केंद्र शासनाने सन २०१०-११ साठी निश्चित केलेली किमान आधारभूत किंमत सन २०१०-१३ च्या प्रशुल्क प्रस्तावामध्ये विचारात घेण्यात आलेली होती. सन २०११-१२ साठी निश्चित केलेल्या किमान आधारभूत किंमती आता उपलब्ध झाल्या असून त्या पुढील प्रमाणे आहेत:-

| | **रु. / क्विंटल** |
|---|---|
| १) खरीप अन्नधान्य पीके (ज्वारी, बाजरी) | १००० |
| २) भात | १११० |
| ३) तूर | ३२०० |
| ४) गहू | ११७० |
| ५) तेलबिया | २८०० |
| ६) हरबरा | २१०० |
| ७) ऊस | १४५ |
| ८) कापूस | ३३०० |

५.६ किमान आधारभूत किंमत निश्चित केली जात नसलेल्या उदा. भाजीपाला, फळबागा अशा अन्य पिकांसाठी, जलप्रशुल्क प्रस्ताव तयार करतेवेळी लागू असलेले कृषि उत्पन्न बाजार समितीचे बाजार भाव विचारात घेण्यात येतील.

५.७ सन २०१०-१३ च्या प्रशुल्क प्रस्तावात (परिच्छेद ४.१) सिंचन क्षमता, सिंचन क्षेत्र, प्रत्यक्षात सिंचित क्षेत्र व विनासिंचित क्षेत्र या बाबत खालील माहिती दर्शविण्यात आलेली होती.

**लक्ष हेक्टर**

| वर्ष | निर्मित सिंचन क्षमता | सिंचन क्षेत्र (निर्मित सिंचन क्षमतेच्या ८० %) | सिंचित क्षेत्र | विनासिंचित क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| २००८-०९ | ४४.८६ | ३५.८८ | २७.३२ | ८.५६ |
| २००९-१० | ४६.४६ | ३७.१६ | २७.८२ | ९.३४ |
| २०१०-११ | ४८.२१ | ३८.५६ | २८.३२ | १०.२४ |
| २०११-१२ | ५०.२४ | ४०.१९ | २८.८२ | ११.८७ |
| २०१२-१३ | ५२.८४ | ४२.२७ | २९.३२ | १२.८५ |

सन २०१०-११ ते २०१२-१३ साठीच्या अंदाजासाठी वार्षिक २ ते २.५ लक्ष हेक्टर सिंचन क्षमता निर्मिती व ०.५ लक्ष हेक्टर प्रत्यक्षात सिंचित क्षेत्रातील वाढ धरलेली आहे.

५.८ सन २००९-१० व २०१०-११ चे सिंचन सद्य:स्थिती दर्शक अहवाल उपलब्ध झालेले आहेत. त्यात दर्शविण्यात आलेली माहिती खालीलप्रमाणे आहे :

| | | **लक्ष हेक्टर** |
|---|---|---|
| **वर्ष** | **सिंचन क्षमता निर्मिती** | **भिजलेले क्षेत्र** |
| २००९-१० | ४६.३५ | २५.४३ |
| २०१०-११ | ४७.३७ | २९.५५ |

५.९ त्यामुळे सन २०१३-१६ या कालावधीकरिता २०१२-१३ च्या निर्मित सिंचन क्षमतेवर १ लक्ष हेक्टर वाढ व सिंचित क्षमतेवर ०.५ लक्ष हेक्टर वाढ विचारात घेण्याचे प्रस्तावित केलेले आहे.

**घनमापन पध्दतीने पाणीवापर :**

**शेती :**

५.१० घनमापन पध्दतीने शेतीसाठी (पाणीवापर संस्थाकडून) होणारा २००८-०९ व २००९-१० मधील पाणी वापर खालील प्रमाणे होता.

| | | **दलघमी** |
|---|---|---|
| २००८-०९ | १८१८.६२ | (एकूण वापराच्या १०.८ %) |
| २००९-१० | ९१९.५० | (एकूण वापराच्या ७.४ %) |

५.११ सन २०१०-१३ च्या प्रशुल्क प्रस्तावात शेतीसाठी होणारा पाणी वापराचा अंदाज पुढील प्रमाणे वर्तविला होता.

| | |
|---|---|
| २०१०-११ | १८२०० दलघमी |
| २०११-१२ | १८६०० दलघमी |
| २०१२-१३ | १९००० दलघमी. |

५.१२ २०१०-११ ची माहिती उपलब्ध नसल्याने सन २०१३-१६ चे प्रशुल्क प्रस्तावासाठी एकूण पाणी वापरात सन २०१२-१३ चे आकडेवारीवर पूर्वी गृहीत धरल्याप्रमाणे

वार्षिक ४०० दलघमी वाढ गृहीत धरण्याचे व घनमापन पध्दतीचा वापरात एकूण वापराच्या १० % वाढ गृहीत धरण्याचे प्रस्तावित आहे.

**घरगुती व उद्योग :**

५.१३ सन २००८-०९ व २००९-१० मधील प्रत्यक्षातील घरगुती पाणी वापर खालीलप्रमाणे होता. (२१ सिंचन मंडळांनी आकारणी केलेल्या पाणीपट्टीच्या माहिती नुसार)

**दलघमी**

| **उप-प्रवर्ग** | **२००८-०९** | **२००९-१०** |
|---|---|---|
| ग्रामीण / ग्रामपंचायत | ६०७.०६ | ५६५.६९ |
| नागरी स्थानिक स्वराज्य संस्था (नगरपालिका) | ६४७.८८ | ५२५.६० |
| महानगरपालिका | २६५९.६४ | २९५३.२१ |
| मत्स्य व्यवसाय व अन्य | ७.१० | ०.०९ |
| | ३९२१.६८ | ४०४४.४९ |

५.१४ सन २०१०-१३ साठीच्या प्रशुल्क प्रस्तावात घरगुती पाणी वापर खालीलप्रमाणे अंदाजित करण्यात आलेला होता.

| | **दलघमी** |
|---|---|
| २०१०-११ | ४००० |
| २०११-१२ | ४२०० |
| २०१२-१३ | ४४०० |

५.१५ सन २००८-०९ व २००९-१० मधील प्रत्यक्षातील औद्योगिक पाणी वापर खालील प्रमाणे होता.

**दलघमी**

| **उप-प्रवर्ग** | **सन २००८-०९** | **सन २००९-१०** |
|---|---|---|
| पाण्याचा कच्चा माल म्हणून वापर | ३.८८ | ४.१५ |
| पाण्याचा प्रक्रियेसाठी वापर | ७१५.४८ | ८६६.६० |
| साखर कारखाने, औष्णिक वीज केंद्रे | ३१.७३ | ११.१७ |
| | **७५०.९९** | **८८१.९२** |

५.१६ सन २०१०-१३ च्या प्रशुल्क प्रस्तावात औद्योगिक पाणी वापर खालीलप्रमाणे अंदाजित करण्यात आला होता.

| | |
|---|---|
| २०१०-११ | ७२५ दलघमी |
| २०११-१२ | ७५० दलघमी |
| २०१२-१३ | ७७५ दलघमी |

५.१७ मंडळनिहाय आकारणीची उपलब्ध झालेली माहिती ही घरगुती तसेच औद्योगिक अशा दोन्ही वापरासाठीची आहे. जरी प्रत्येक प्रवर्गासाठी योग्य दराने आकारणी झालेली असली तरी प्रत्यक्षात घरगुती तसेच औद्योगिक वापराकरिता दर्शविलेली वसुली ही दोन्ही प्रकारची एकत्रित वसुली आहे. सन २०१३-१६ च्या प्रशुल्क प्रस्तावाकरीता वसुली अंदाजित करण्यासाठी बिगर सिंचन वापर या एकाच प्रवर्गात हे दोन्ही प्रवर्ग एकत्रित करण्याचे प्रस्तावित आहे. यासाठी वापरावयाची मूलभूत माहिती खालीलप्रमाणे :

| **वर्ष** | **बिगर सिंचन पाणी वापर (दलघमी)** | |
|---|---|---|
| २००८-०९ | ४६७२.६७ | प्रत्यक्षातील वापरानुसार |
| २००९-१० | ४९२६.४१ | |
| २०१०-११ | ४७२५.०० | २०१०-१३ च्या प्रशुल्क प्रस्तावानुसार |
| २०११-१२ | ४९५०.०० | |
| २०१२-१३ | ५१७५.०० | |

५.१८ सन २०१३-१६ चे प्रशुल्क प्रस्तावाकरिता बिगरसिंचन पाणी वापर अंदाजित केल्यानंतर, पुढील प्रकरणात चर्चा केल्याप्रमाणे, घरगुती वापर हा एकूण बिगर सिंचन वापराच्या ८५ % व उर्वरित १५ % औद्योगिक वापर राहील.

**आस्थापना खर्च :**

५.१९ सन २००८-०९ व २००९-१० करिता सिंचन व्यवस्थापनेचा प्रत्यक्षातील आस्थापना खर्च खालीलप्रमाणे होता.

| वर्ष | खर्च रु. कोटी |
|---|---|
| २००८-०९ | ४००.९७ |
| २००९-१० | ५४४.८१ |

५.२० सन २०१०-१३ चे प्रशुल्क प्रस्तावात सहाव्या वेतन आयोगाच्या घटकासहित एकूण अंदाजित आस्थापना खर्च सन २०१० ते २०१३ मध्ये खालीलप्रमाणे होता.

| वर्ष | खर्च रु. कोटी |
|---|---|
| २०१०-११ | ५५५.१० |
| २०११-१२ | ६५५.०१ |
| २०१२-१३ | ७७२.९१ |

५.२१ सन २०१३-१६ चे प्रशुल्क प्रस्तावासाठी सन २०१०-११ हे पायाभूत वर्ष मानून त्यावर वार्षिक १० % वाढ गृहीत धरुन आस्थापना खर्च अंदाजित करण्याचे प्रस्तावित आहे. हे पूर्वी अंदाजित केलेल्या २० % ते २५ % या जादा वाटत असलेल्या वाढीशी विसंगत आहे. तथापि २०१०-१३ च्या प्रशुल्क प्रस्तावात वेतन आयोगाचा घटक विचारात घेण्यात आलेला नव्हता. त्यामुळे पूर्वीच्या (२०१०-१३) प्रशुल्क निर्धारणावर त्याचा परिणाम होत नाही.

# प्रकरण - ६

## आधारभूत माहितीचा सन २०१३-१६ साठी अंदाज

**सिंचन विषयक आधारसामग्री :**

६.१ प्रकरण ५ च्या परिच्छेद ५.७ मध्ये नमूद केल्यानुसार निर्मित सिंचन क्षमतेमधील वाढ १ लाख हेक्टर तर सिंचित क्षेत्रातील वाढ ०.५ लाख हेक्टर सन २०१२-१३ च्या आकडेवारीवर प्रतिवर्ष मानण्यात येईल. अशारीतीने अंदाजाची आकडेवारी अशी राहील:-

**लक्ष हेक्टर**

| वर्ष | निर्मित सिंचन क्षमता | सिंचन क्षेत्र (८० % निर्मित क्षमतेच्या ) | सिंचित क्षेत्र | विना सिंचित क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| २०१३-१४ | ५३.८४ | ४३.०७ | २९.८२ | १३.२५ |
| २०१४-१५ | ५४.८४ | ४३.८७ | ३०.३२ | १३.५५ |
| २०१५-१६ | ५५.८४ | ४४.६७ | ३०.८२ | १३.८५ |

६.२ देखभाल दुरुस्तीची एकूण निकड परिगणित करताना सन २०१४-१५ अंदाजाच्या आधार सामुग्रीला वाल्मीने प्रस्तावित केलेले देखभाल दुरुस्तीचे सुधारित मापदंड (प्रकरण ३, परिच्छेद ३.११ नुसार) लावण्यात येतील.

**आस्थापना खर्च :**

६.३ प्रकरण ५ च्या परिच्छेद ५.१९ मध्ये केलेल्या विवेचनानुसार एकूण आस्थापना खर्चाचे अंदाज सन २०१०-११ च्या आधार सामुग्रीला (रु. ५५१.१० कोटी) प्रतिवर्षी १० टक्के वाढ लावून काढण्यात येतील. अशारितीने आलेली आकडेवारी अशी राहील :-

| वर्ष | एकूण आस्थापना खर्च (रु. कोटी) |
|---|---|
| २०१०-११ | ५५५.१० |
| २०११-१२ | ६१०.६१ |
| २०१२-१३ | ६७१.६७ |
| २०१३-१४ | ७३८.८३ |
| २०१४-१५ | ८१२.७२ |
| २०१५-१६ | ८९४.०० |

**पाणी वापर :**

**बिगर सिंचन :**

६.४ **परिरक्षण व दुरुस्ती खर्च :**

प्रकरण - ३ 'सिंचन व्यवस्थापनाचा प्रचालन व देखभाल खर्च' या मधील परिच्छेद ३.१२ मध्ये चर्चा केल्यानुसार नवीन नियंत्रण कालावधीतील मध्यस्थित २०१४-१५ या वर्षासाठी अंदाजित परिरक्षण व दुरुस्ती खर्च हा पूर्वीच्या जलप्रशुल्क (२०१०-१३) प्रस्तावातील परिरक्षण व दुरुस्तीसाठी असलेल्या मापदंडावर १० % अधिक असेल.

६.५ एकूण पाणी वापराची प्रकरण ५ च्या परिच्छेद ५.१५ मधील आधार सामुग्री **आलेख ६.१** (सोबत जोडल्यानुसार) मध्ये रेखांकित केली आहे. एकूण बिगर सिंचनाच्या पाणी वापराचे अंदाज सन २०१३-१६ च्या नवीन नियंत्रण कालावधीसाठी खालील प्रमाणे वर्तविले आहेत.

**दलघमी**

| **वर्ष** | **एकूण बिगर सिंचन पाणी वापर** | **जवळच्या १००० दलघमी ला पूर्णांकित करुन** |
|---|---|---|
| २०१३-१४ | ५१७५ | ५२०० |
| २०१४-१५ | ५२७५ | ५३०० |
| २०१५-१६ | ५३६० | ५४०० |

यातील सन २०१४-१५ या मध्यंतर वर्षाची आकडेवारी दरप्रयोजनासाठी विचारात घेतली आहे. त्यानुसार घरगुती पाणी वापर ४५०० दलघमी (८५ %) तर औद्योगिक पाणी वापर ८०० दलघमी (१५ %) येतो.

**सिंचन :**

६.६ २०१३-१६ च्या नियंत्रण कालावधीसाठी एकूण सिंचन पाणी वापर व घनमापनाने करावयाच्या पाणी वापराचा अंदाज प्रकरण ५ च्या परिच्छेद ५.१० मध्ये नमूद केल्यानुसार खालीलप्रमाणे येतात :

**दलघमी**

| **वर्ष** | **एकूण सिंचन पाणी वापर** | **१० % दराने घनफळात्मक पाणी वापर** |
|---|---|---|
| २०१३-१४ | १९४०० | १९४० |
| २०१४-१५ | १९८०० | १९८० |
| २०१५-१६ | २०२०० | २०२० |

**आलेख ६.१**

परिच्छेद ६.५



# प्रकरण - ७

## ठोक जलदर निश्चितीची प्रस्तावित पध्दत (२०१३-१६)

७.१ मजनिप्रा कायद्यानुसार राज्यातील ठोक पाण्याचे दर जलसंपत्ती प्रकल्पांच्या सिंचन व्यवस्थापन, प्रचालन, परिरक्षण आणि देखभाल दुरुस्ती खर्चाची पूर्ण वसुली होईल अशा पध्दतीने ठरवावयाचे आहेत. अशा प्रकारे दरामधून भांडवली खर्चाचा अंशदेखील अथवा पर्यावरण ऱ्हासापोटीचा खर्च वसूल करता येत नाही. अर्थात त्यामुळे पाण्याचा कार्यक्षम वापर व वापरानंतर विहित गुणवत्तेचे सांडपाणी सोडण्याची जबाबदारी मात्र वापरकर्ते टाळू शकत नाहीत. ही सर्व उद्दिष्टये साध्य करण्याकरिता दंड व प्रोत्साहनपर सवलती या दोन्ही गोष्टींच्या सहाय्याने दररचनेची अंमलबजावणी करावी लागेल.

७.२ ठोक जलदर निर्धारणाचे निकष (२०१०-१३) मधील प्रकरण आठ मध्ये आस्थापना व देखभाल दुरुस्ती खर्चाची विभागणी **परवडणे, पाण्याची सुलभ उपलब्धता आणि प्रमाण व नियमितता** या तीन घटकांचा विचार करुन केली होती. या तीन घटकांना भारांकन देऊन कृषि, घरगुती व औद्योगिक पाणी वापरकर्त्यांमध्ये असलेले तौलनिक महत्व दर्शविणारे एक कोष्टक तयार केले होते. या खेरीज लाभार्थींची शेतकऱ्यांची पाणीदेयक प्रदान करण्याची क्षमता मुख्य चिंतेची बाब असल्याने आणि कृषिक्षेत्र हा सर्वाधिक पाणी वापरणारा घटक असल्याने परवडण्याजोगे दर या घटकास एकूण एक च्या मापनामध्ये ०.६० भारांकन तर सुलभ उपलब्धता आणि प्रमाण व नियमितता यांना प्रत्येकी ०.२० भारांकन दिले होते.

७.३ पूर्वी तयार केलेल्या प्रत्यक्ष कोष्टकावर चर्चा करण्यापूर्वी निश्चित केलेल्या तीन घटकांची आणि त्यांना दिलेल्या भारांकनाचा आधार याविषयी संक्षेपात विवेचन करण्यात येत आहे

**परवडण्याची क्षमता :**

ग्राहकांची **परवडण्याची क्षमता** ही देयक भरण्याच्या तयारीपेक्षा भिन्न आणि देयक प्रदान करण्याच्या क्षमतेशी निगडीत आहे. पैसे खर्च करण्याची तयारी, पूर्ण खर्च भरुन

काढण्याशी संबंधित असते आणि म्हणून ती पाणी दराची उच्चतम मर्यादा असते. आर्थिक सहकार्य व विकास संघटना (OECD) च्या उपलब्ध लेखांनुसार सामान्यतः असा ठोक ताळा आहे की, पाणी सेवांचे परवडण्याजोगे दर घरगुती पाणी वापरकर्त्यासाठी उत्पन्नातील खर्चाच्या भागाच्या ३ ते ५ टक्के असतात. तथापि वरील सुत्र घरगुती वापराच्या किरकोळ दराच्या पातळीवर थेट लागू होऊ शकते परंतु कृषिसिंचन आणि औद्योगिक क्षेत्राबाबत जेथे पाणी हे आर्थिक व्यवहारातील उत्पादन खर्चातील एक महत्वाचा घटक आहे, तेथे मात्र ते अप्रत्यक्षरित्या लागू होते. पुढे, पाणीपट्टी ही उद्योगापेक्षा कृषिक्षेत्रात उत्पादन खर्चातील मोठा घटक असतो. कृषिक्षेत्रात अन्नधान्य पिकांच्या पाण्याचे दर एकूण उत्पादन खर्चाच्या ३ ते ५ % पेक्षा जास्त असू नयेत आणि नगदी पिकांच्या बाबत ८ ते १० % पेक्षा जास्त असू नयेत. औद्योगिक क्षेत्रात बहुतेक उद्योगांमध्ये पाणीपट्टी हा घटक उत्पादन खर्चाच्या ९ % पेक्षा कमी असतो. हे सर्व डोळयापुढे ठेऊन **परवडण्याची क्षमता** या घटकास भारांकनाचे मान उद्योगास सर्वात जास्त (रु. ७५ एकूण १०० रु देखभाल दुरुस्ती खर्चापैकी) व त्यानंतर कृषिसिंचनास रु. १५ तर पिण्याचे पाण्यास रु. १० घेतले होते.

**सुलभ उपलब्धता :**

परवडण्याच्या क्षमतेप्रमाणे पाणी किती सहजपणे उपलब्ध होते याचाही दरावर थेट परिणाम होतो. येथे सहज उपलब्धता याची व्याख्या 'पोहोच' यानुसार आहे व ती नुसत्या उपलब्ध्तेपेक्षा अधिक योग्य आहे अथवा दुसऱ्या शब्दात **'सुलभ उपलब्धता'** हा शब्दप्रयोग निव्वळ **'उपलब्धता'** पेक्षा अधिक अर्थपूर्ण ठरेल. पिण्याचे पाणी (घरगुती वापरापैकी) सामान्यतः वीजेवर चालणाऱ्या पंपाद्वारे जलाशयांमधून उचलले जाते आणि पाईपलाईनमधून घरगुती वापरदारांपर्यंत पोचविले जाते. पोहोचण्याचे ठिकाणी पाणी लहान-मोठया आकाराच्या टाक्यांमध्ये साठविले जाते. या सर्व खर्चाचा भार पाणी वापरणारी संस्था उचलते. म्हणून सुलभ उपलब्धतेसाठीचे भारांकन घरगुती वापरास फार कमी असेल. कृषि सिंचनाच्या पाण्याचे वहन सामान्यतः राज्याने पूर्वीच बांधलेल्या कालवे प्रणालीतून होते. मात्र घरगुती वापरापेक्षा त्यांचा पल्ला फार मोठा नसतो आणि वापरकर्त्यांची संख्याही कमी असते. म्हणून घरगुती वापरापेक्षा सिंचनास अधिक भारांकन ठेवावे लागेल. सिंचन व घरगुती वापराच्या तुलनेत औद्योगिक वापरकर्त्यांस कारखाना उभारण्यापूर्वी जलाशयानजिकचे स्थान निवडण्याचा पर्याय उपलब्ध असतो. औद्योगिक वसाहती, विशेष आर्थिक क्षेत्र (SEZ) आणि

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळासारख्या (MIDC) संस्था धरण बांधल्यावर आणि पाणी वाटपाची जागा निश्चित झाल्यावरच त्यांचे उभारणीचे ठिकाण नक्की करतात. म्हणून या घटकास उद्योगासाठी आणखी जास्त भारांकन द्यावे लागेल. अशा प्रकारे रु. १०० देखभाल दुरुस्ती व प्रचालन खर्चापैकी निश्चित केलेले भारांकन औद्योगिकसाठी रु. ४५, कृषिकरता रु. ३० आणि घरगुतीसाठी रु. २५ असे होते.

**प्रमाण व नियमितता :**

सुलभ उपलब्धतेशी अन्य दोनही घटक जोडले गेले असले तरी या तीन घटकांचा तीनही वर्गातील वापरकर्त्यांवर वेगवेगळा परिणाम होतो. घरगुती वापराकरिता, प्रतिमाणशी मापदंडावर आधारित एकदा परिमाण निश्चित ठरेपर्यंत महत्व असते कारण ते जगण्यासाठी आवश्यक असते. तथापि वेळेवर सातत्याने पुरवठा म्हणजेच नियमितता ही संस्थेने मार्गात निर्माण केलेल्या साठयांमुळे खात्रीशीर मिळू शकते. म्हणून संपृक्ततेपर्यंत (पूर्ण परिमाणात मिळेपर्यंत) घरगुती वापरासाठी प्रमाणास सर्वात कमी भारांकन राहील. कृषिवापरामध्ये प्रमाण हे महत्वाचे ठरते परंतु घरगुती वापराशी तुलना करता सिंचनास पावसाळयातील पाणी व भूजल यांचा आधार मिळत असल्याने, त्याची तीव्रता कमी असते. सिंचनामध्ये मार्गातील साठे नसले तरी पुरवठयातील अनियमिततेचा उत्पादनावर जाणवण्याएवढा परिणाम होत नाही. तथापि, योग्य प्रमाणातील व योग्य वेळी मिळणाऱ्या आवश्यक पुरवठयामुळे दोन वेळा पिक घेणे, नगदी पिके घेणे आणि सिंचनाची आधुनिक पध्दत वापरणे यासाठी पाण्याची शाश्वती वाढेल. उद्योगाकरिता **प्रमाण व नियमितता** हे दोनही घटक महत्वाचे ठरतात. सर्व उत्पादक प्रक्रियांमध्ये या ना त्या स्वरुपात पाणी आवश्यक असते आणि अशा किमान प्रमाणाखेरीज कोणताही उद्योग तग धरु शकणार नाही. पाण्याचा कच्चा माल म्हणून वापर करणाऱ्या उद्योगांना परिमाण हे सर्वच वेळी अधिक महत्वाचे ठरते. वेळेवर पुरवठयास (नियमितता) तुलनेने कमी महत्वाची ठरते कारण उद्योगांकडे साठा असतो अथवा टँकरने पाणी पुरवठा होऊ शकतो. **प्रमाण व नियमितता** यांचा एकत्रित विचार करता घरगुती वापरास सर्वात कमी व त्यापेक्षा कृषि आणि औद्योगिक वापर यांना क्रमाने अधिक भारांकन दिले आहे. म्हणून आस्थापना व देखभाल दुरुस्ती खर्चाच्या रु. १०० पैकी रु. ४५ उद्योगास, रु. ३० कृषि आणि रु. २५ घरगुती वर्गवारीस असे भारांकन केले आहे.

**७.४** वरील विधानांवर आधारित रु. १०० देखभाल दुरुस्ती खर्चाची तीनही घटकांमध्ये आणि वापराच्या तीन वर्गांमध्ये केलेली विभागणी खालीलप्रमाणे-

| | कृषी | पिण्याचे पाणी | उद्योग | एकूण |
|---|---|---|---|---|
| परवडण्याची क्षमता | १५ | १० | ७५ | १०० |
| सुलभ उपलब्धता | ३० | २५ | ४५ | १०० |
| प्रमाण व नियमितता | ३० | २५ | ४५ | १०० |

परवडणे या निकषास ०.६० व सहज उपलब्धता आणि प्रमाण व नियमितता या दोन्ही निकषांना प्रत्येकी ०.२० भारांकन (गुणक) वापरुन आस्थापना व देखभाल दुरुस्ती खर्चाची केलेली विभागणी खालीलप्रमाणे-

| | **कृषि** | **पिण्याचे पाणी** | **उद्योग** |
|---|---|---|---|
| परवडण्याची क्षमता | १५ X ०.६ = ९ | १० X ०.६ = ६ | ७५ X ०.६ = ४५ |
| सुलभ उपलब्धता | ३० X ०.२ = ६ | २५ X ०.२ = ५ | ४५ X ०.२ = ९ |
| प्रमाण व नियमितता | ३० X ०.२ = ६ | २५ X ०.२ = ५ | ४५ X ०.२ = ९ |
| **एकूण** | **२१** | **१६** | **६३** |

अशा प्रकारे मागील प्रशुल्क (२०१०-१३) दर निश्चित करताना आस्थापना व देखभाल दुरुस्ती खर्चाची विभागणी ६३ % उद्योगास, व १६ % घरगुतीसाठी आणि २१ % सिंचनास असे केले होते. कृषिसिंचनात कालव्याचे प्रवाही क्षेत्र आणि भूजल वापराचे क्षेत्र दोन्ही असल्यने आणि राज्यशासनाने भूजलाची आकारणी माफ केल्याने कालव्याचे प्रवाही सिंचनास आस्थापना व देखभाल दुरुस्ती खर्चापैकी १६ % आणि राज्य भूजल वापरातून कमी झालेला शासनाचा महसूल भरपाई करण्याकरिता भूजलवापराचे अनुदान (subsidy) ५ % धरण्यात आले होते.

**सन २०१३-१६ च्या ठोक प्रशुल्क निकषाकरिता कोष्टकाचे पुनर्विलोकन :**

**७.५** या संबंधात प्राप्त झालेली एकमेव सूचना ही होती की भारांकन ठरविण्यासाठी अवलंबिलेली पध्दत काल्पनिक होती आणि भारांकने नियोजनकारांकडून मनाला येईल तशी बदलली जाऊ शकतात. म्हणून एकूण राज्यस्तरीय घरगुती उत्पादन

(GSDP) पध्दत सुचविण्यात आली होती. प्रत्येक वर्गवारीचा GSDP मधील अंशदान पायाभूत मानावे असा त्याचा अर्थ होता. कोष्टकातील अशा प्रकारे भारांकन ठरविण्याचा भाग पूर्णपणे काल्पनिकतेला सोडून जमणार नाही ही बाब नाकारता येत नाही. प्राधिकरणाने त्यापूर्वीच्या (२०१०-१३) दर निर्धारणाच्या जनसुनावण्यांच्या वेळी बव्हंशी लाभार्थींनी व्यक्त केलेला हा दृष्टिकोन स्वीकारला आहे. भारांकने शासन / नियोजनकारांकडून बदलण्याबाबत असे स्पष्ट करण्यात येत आहे की कायद्यातील कलम ११ (घ) मध्ये नमूद केलेल्या पध्दतीनुसार प्राधिकरणाने एकदा निकष निश्चित केल्यावर ते अंतिम आणि बंधनकारक ठरतात आणि त्याचे पुनर्विलोकन पुढील दर निश्चितीच्या कार्यवाहीच्या वेळी प्राधिकरण करु शकते.

**७.६** राज्याच्या GSDP बाबत सन २०१०-११ साठी अभ्यास केला असता (संदर्भ महाराष्ट्राचे आर्थिक सर्वेक्षण अहवाल) असे दिसून येते की राज्याच्या एकूण अंतर्गत उत्पादन रु. ९,०१,३३० कोटी मध्ये वाटा असणारे घटक असे आहेत - कृषि व संबंधित बाबी (१०.६९ %), औद्योगिक क्षेत्र (३०.४२%) आणि सेवा क्षेत्र ज्यामध्ये रेल्वे, वाहतूक, दळणवळण, व्यापार, हॉटेल्स, बँका, विमा, लोकसेवा इ. (५८.८९ %). कदाचित ही सूचना GSDP मध्ये कृषिक्षेत्राचा भाग फक्त १०.६९ % असल्याचे समोर ठेऊन केली असावी आणि म्हणून आस्थापना व देखभाल दुरुस्ती खर्चाची विभागणी त्यावरच (GSDP वर) आधारित असावी.

**७.७** प्रचालन व परिरक्षण खर्चाचे विभागणी GSDP तत्वावर करण्याचा विचार करावयाचा झाल्यास खालील मुद्दे उपस्थित होतात -

(१) GSDP मध्ये सर्व भांडवली खर्चाचा विचार केलेला आहे (धरणासाठीचा खर्च इ.) जो प्रचालन व परिरक्षण खर्चात केलेला नाही.

(२) घरगुती पाणी (जीवनावश्यक) सामाजिक गरज असल्याने GSDP मध्ये अंशदान देत नाही आणि म्हणून राज्यशासनाकडून त्यास पूर्णतया अनुदान देणे (subsidy) गरजेचे आहे.

(३) सेवाक्षेत्र जरी GSDP मध्ये जवळजवळ ६० % अंशदान उचलते, परंतु वाणिज्यिक आस्थापनेने केलेला पाणी वापर हा दर निर्धारणात औद्योगिक

समजला जातो. या बाबी व्यतिरिक्त सेवाक्षेत्र हे थेट ठोक पाणीवापरकर्ते गटात मोडत नाही.

त्यामुळे कृषि व उद्योगांना लक्षणीय दरसवलत मिळत असताना राज्यशासनाचे अनुदान (subsidy) जवळजवळ ६० % पर्यंत असेल. यामुळे कलम ११ (घ) च्या मूळ गाभ्याशी विसंगत होईल.

७.८ यातून असा निष्कर्ष निघतो की प्रचालन व परिरक्षण खर्चाच्या विभागणीसाठी पूर्वी स्वीकारलेल्या दृष्टिकोनात तथ्य आहे. पूर्वीच्या दरपध्दती ठरविण्याच्या प्रयोगात तज्ञ / अशासकीय संघटना यांचेकडून पुष्कळ सूचना मिळाल्या आणि नवीन अभ्यासाचे वेळी पुन्हा त्यांचा आढावा घेणे युक्त राहील.

७.९ **(१) श्री. या. रा. जाधव (प्राधिकरणाचे माजी विशेष निमंत्रित):**

कृषि वापरकर्त्यांस नियमित व पुरेसे पाणी मिळत नसल्यामुळे सुलभ उपलब्धता तसेच प्रमाण व नियमितता यासाठी अन्य दोन वापरकर्त्यांपेक्षा कमी भारांकन (३० ऐवजी २०) मिळावे. घरगुती आणि उद्योगांसाठीचे भारांकन अनुक्रमे ३० आणि ५० असे वाढविण्यात यावे.

**(२) सोपेकॉम :**

मूलभूत घटक जरी स्वीकारार्ह असले तरी गुणवत्ता हा घटकही त्यात असला पाहिजे. शेतकऱ्यांचे बाजारभावांवर कोणतेही नियंत्रण नसते व ते असंघटित असतात म्हणून 'परवडणे' या घटकास पिण्याच्या पाण्याइतकेच भारांकन हवे (कृषि व पिण्याचे पाणी यांस १० प्रत्येकी आणि उद्योगास ८०). त्याचप्रमाणे कृषि वापरकर्ते मातीच्या कालव्यांवर अवलंबून असतात व त्यांना पाणीचोरी आणि वहनव्यय / गळती यांस तोंड द्यावे लागते. म्हणून 'सुलभ पोहोच' चे भारांकन कृषि, घरगुती आणि उद्योगासाठी २०-२०-६० (३०-२५-४५ ऐवजी) हवे. 'प्रमाण व नियमितता' मध्ये कृषि वापरकर्त्यांना कमी विश्वासार्हतेचे पाणी मिळते त्यामुळे कृषि, घरगुती व उद्योगांस ३०-२५-४५ ऐवजी २५-२५-५० भारांकन योग्य ठरेल.

**(३) डॉ. आर. पी. कुरुलकर :**

कृषि क्षेत्राचा वाढीचा दर ४ % असणे, त्या क्षेत्राची कमी उत्पादकता, प्रति माणशी कमी उत्पन्नाचा स्तर या बाबी लक्षात घेता कृषि प्रयोजनासाठी १३ %

भारांकन असावे.  घरगुती वापरातील वाणिज्यिक घटक लक्षात घेता प्रचालन व परिरक्षण खर्चातील २२ % वाटा ते उचलू शकतील.

**(४) श्री. आर. टी. पोखरकर :**

कृषिवापरकर्त्यांसाठी प्रचालन व परिरक्षणासाठीचे भारांकन १३ ते १५ % असावे.

**भारांकन कोष्टकाचे पुनर्विलोकन :**

**७.१०** जरी 'सुलभ उपलब्धता' आणि 'प्रमाण व नियमितता' घटकांच्या भारांकनासाठी पुनर्विलोकनाची आवश्यकता नसली तरी खालील बाबींमुळे 'परवडण्याची क्षमता' याकरिता दिलेल्या भारांकनाचे पुनर्विलोकन केले आहे -

(१) राज्यात कमी धारणक्षमता ( १ हेक्टर पेक्षा कमी ) असलेले अल्पभूधारक / सीमांत शेतकरी सुमारे ४४ % आहेत.  अल्प भूधारणा त्यांना अधिक उत्पन्न देणारी नगदी पिके घेण्यास पायबंद घालते आणि त्यांना सिंचन सुविधा उपलब्ध झाल्या तरी अल्प उत्पादकता व अल्प कृषिउत्पन्न (अन्नधान्य पिकांपासून) जबरदस्ती वाटयाला येते.  उत्पन्नातील वाढ ही लक्षणीय नसते.

(२) जरी घरगुती पाण्याचे परवडण्याजोगे दर वापरायोग्य उत्पन्नाच्या ३ ते ५ % असले, तरी पूर्वीच्या सन २०१०-१३ च्या निकषांमध्ये अन्नधान्य पिकांचे दरसुध्दा त्यांच्या एकंदर उत्पादन किंमतीच्या ३ ते ५ % शिफारस केले होते.  त्यामुळे कृषि (१५) आणि घरगुती (१०) भारांकनातील फरक कमी करण्यास सबळ कारण आहे.

**७.११** त्यामुळे 'परवडण्याची क्षमता' या घटकाचे भारांकन कृषि १२, घरगुती १० आणि उद्योग ७८ असे सुधारित करण्याचे प्रस्तावित आहे.  या सुधारणेमुळे खर्चविभागणीचे सुधारित कोष्टक आता खालीलप्रमाणे असेल -

| घटक | कृषि | घरगुती | औद्योगिक |
|---|---|---|---|
| **पडवण्याची क्षमता** | १२ X ०.६ = ७.२ | १० X ०.६ = ६ | ७८ X ०.६ = ४६.८ |
| **सुलभ पोहोच** | ३० X ०.२ = ६ | २५ X ०.२ = ५ | ४५ X ०.२ = ९ |
| **प्रमाण व नियमितता** | ३० X ०.२ = ६ | २५ X ०.२ = ५ | ४५ X ०.२ = ९ |
| **एकूण** | १९.२ | १६ | ६४.८ |
| **समजा,** | **१९** | **१६** | **६५** |

**७.१२** भूजल वापरासाठी असलेले ५ % अनुदान (subsidy) विचारात घेता, कालवे प्रणाली वापरकर्त्यांना प्रचालन व परिरक्षण खर्चाचा वाटा पूर्वीच्या १६ % ऐवजी **१४ %** (१९-५) उचलावा लागेल.

**दरनिर्धारणाची प्रस्तावित पध्दत (२०१३-१६) :**

**बिगर सिंचन** :

**७.१३** सन २०१०-१३ च्या ठोक जलदर निर्धारण निकषामधील परिच्छेद १४ मध्ये वर्णन केलेली पध्दत खाली नमूद केल्यानुसार थोडीशी बदलण्याचे प्रस्तावित आहे.

(१) घरगुती आणि औद्योगिक ठोक वापर संस्थाकरिता सन २०१३-१६ या नियंत्रण कालावधीतील ३ वर्षांपैकी मधल्या वर्षाच्या म्हणजेच २०१४-१५ च्या अंदाजित परिमाणास वरील खर्च वाटपाच्या कोष्टकावरुन आलेली टक्केवारी लावून (घरगुतीस १६ % आणि औद्योगिकरणासाठी ६५ %), मूळ घनमापन दर काढले जातील.

(२) घरगुती वापराच्या ग्रामपंचायती, नगरपरिषदा व महानगरपालिका या उपप्रवर्गांसाठी आणि औद्योगिक वापराच्या, प्रक्रिया उद्योग (प्रदूषणरहित व प्रदूषण करणारे विभक्तपणे) आणि पाण्याचा कच्चा माल म्हणून वापरणारे (शीतपेये) उद्योग या उपप्रवर्गांसाठी स्त्रोतावर आधारित दर यापूर्वी प्रकरण ४ मध्ये चर्चिल्यानुसार ठरविण्यात येतील.

(३) प्रत्येक वापराच्या वर्गवारीचा एकूण मिळू शकणारा महसूल अंदाजित केला जाईल आणि ज्याप्रमाणे तो प्रचालन व परिरक्षण खर्चाच्या तुलनेत कमी अथवा अधिक असेल त्याप्रमाणे मिळणारा महसूल खर्चाच्या विभागणीशी मेळ होईपर्यंत मूळ दर कमी अथवा अधिक करण्यात येतील.

(४) सवलती आणि दंड यामुळे राज्यशासनाच्या महसुलात घट अथवा वाढ होईल. दर निर्धारणाच्य टप्प्यात हे वास्तवपणे (नेमके) निर्धारित करणे फारच कठीण आहे. म्हणून मूळ दर प्रचालन व परिरक्षण खर्चाशी महसूल जुळेल अशा बेताने निश्चित केले जातील. पाणी वापरातील सवलती मुळे येणारी महसूलातील घट ही पाणी वापर कार्यक्षमता वाढविण्यासाठी राज्यशासनाने दिलेले अनुदान (subsidy) म्हणून मानले जाईल. कोणत्याही स्थितीत, राज्य शासन

वाचविलेले पाणी नवीन वापरकर्त्यांस देऊन आणखी महसूल मिळवू शकेल यात शंका नाही.

**७.१४** काल्पनिकरित्या हे शक्य आहे की अंदाजापेक्षा जास्त पाणी वापरल्यामुळे अथवा सवलतींमुळे येणाऱ्या महसूलातील घटीपेक्षा दंडामुळे मिळालेला महसूल अधिक असल्यामुळे, एखाद्या वापरवर्गाचा मिळालेला एकूण महसूल हा (खर्च) वाटपापेक्षा अधिक आहे. परंतु येथे हे लक्षात ठेवले पाहिजे की दराचे कालचक्र ३ वर्षांचे आहे आणि आवश्यकतेपेक्षा कमी अथवा अधिक दर निश्चित केले आहेत असा एकदम निष्कर्ष काढण्यापूर्वी सर्व वर्गातील वापरकर्त्यांचे एकूण चित्र विचारात घ्यावे लागेल.

**कृषि :**

**७.१५** विविध पिकांच्या क्षेत्राधारित दरांकरिता अवलंबिण्याची तक्ते ठोक जलदर निर्धारणाचे निकष (२०१०-१३) प्रमाणेचे असतील, म्हणजेच, अन्नधान्य पिकांसाठी दर एकंदर उत्पादन मूल्याच्या ३ ते ५ % पेक्षा जास्त असू नयेत आणि ऊस, केळी व फळबागांकरिता एकूण उत्पादन मूल्याच्या ८ ते १० % पेक्षा जासत नसावेत. **हा मूळ दर रबीसाठी असेल.** पिकांचे नामनिर्देशन उन्हाळी अथवा खरीपमध्ये रबी सारखेच राहील. परंतु दर रबीच्या अनुक्रमे १५० % अथवा ५० % राहील. हा मापदंड बारमाही पिकांचे दर ठरविताना वापरला जाईल. खरीप पीक रबीमध्ये लांबल्यामुळे अथवा रबी पीक उन्हाळयामध्ये लांबल्यामुळे घेतलेल्या आवर्तनास लावावयाचे दर शेतकऱ्यास नुकसान करणारे नसतील. याचा अर्थ एखाद्या खरीप पिकासाठी खरीपात २ आवर्तने आणि रबीत १ आवर्तन घेतल्यास त्या पिकाचा क्षेत्राधारित दर फक्त खरीपातील संलग्न दराप्रमाणे असेल. हा खुलासा आधीच्या निकषामध्ये (२०१०-१३) नव्हता आणि सदर मुद्दा प्राधिकरण व वाल्मी यांनी संयुक्तपणे हक्कदारीपूर्वीच्या हंगामात घेतलेल्या क्षमताबांधणी कार्यशाळांमध्ये काही लाभार्थींनी उपस्थित केला होता.

७.१६ जलसंपदा विभागाने सुचविल्याप्रमाणे घनमापन दरांसाठी खरीपाकरिता रबीच्या मूळ दराच्या ५० % आणि उन्हाळी हंगामासाठी १५० % दर वापरता येतील. परंतु

क्षेत्राधारित दरांसाठी उन्हाळी हंगामातील १५० % वरुन २०० % पर्यंत वाढविले पाहिजेत. यावर चर्चा होणे आवश्यक आहे.

७.१७ एकूण उत्पादन किंमत काढण्यासाठी एखाद्या पिकाचे किमान आधारमूल्य हे कृषि खर्च व मूल्य समितीने केलेल्या शिफारशींच्या आधारित केंद्र शासनाने या पूर्वी शेवटच्या वर्षी निश्चित केलेले असे विचारात घेतले जातील.

७.१८ ठोक जल निर्धारण निकष (२०१०-१३) मधील परिशिष्ट १ मध्ये पाणी वापर संस्थाकरिता लघु वितरिका पातळीवर घनमापन दर परिगणित करण्याची पध्दत दिली आहे, ती पुनर्विलोकित करण्यात आली. या पूर्वीचा दृष्टिकोन पाण्याचे परिमाण आणि क्षेत्राधारित दर यांचा विचार करुन घनमापन दर परिगणित करण्याबाबत होता. कालव्यातील प्रवाहाचे क्षेत्राधारित वापरकर्ते आणि घनमापक वापरकर्ते यांच्यामध्ये प्रचालन व परिरक्षण खर्चाचे पुर्नवाटप करुन ही पध्दत समजावयास अधिक सोपी करता येऊ शकेल अशा सूचना मिळाल्या होत्या. प्रत्येक वर्षाकरिता घनमापक पुरवठयाची माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदर परिगणनेची पध्दत आता सुधारण्यात आली असून ती **परिशिष्ट ७.१** मध्ये दिली आहे.

७.१९ वरच्या स्तरावरील पाणी वापर संस्था (प्रकल्पस्तरीय संस्था, कालवा स्तरीय संस्था, शाखा स्तरीय संस्था) या बऱ्याचशा प्रकल्पांमध्ये अद्यापही तयार झालेल्या नसल्यामुळे लघुवितरिकेच्या वरील कालवा प्रणालीची देखभाल दुरुस्ती जलसंपदा विभागाकडेच चालू राहिल. जलसंपदा विभागास यासाठी आवश्यक अनुदान उपलब्ध केले जाते. राज्यशासनाने वेळोवेळी निश्चित केलेल्य मापदंडाप्रमाणे पाणी वापर संस्थांकडून प्राप्त झालेल्या पाणीपट्टीपैकी पाणी वापर संस्थेचा वाटा लघुवितरिकेखाली कालव्याच्या देखभाल दुरुस्तीसाठी परत करण्यात येईल. जेव्हा वरील वरिष्ठ स्तरावरील संस्था स्थापन होतील तेव्हा त्यांना राज्यशासनाकडून कालव्याच्या देखभालीसाठी अनुदान मिळेल.

७.२० प्रत्येक पिकाचे क्षेत्राधारित दर परिगणित करण्याकरिता देखभाल दुरुस्ती खर्चाशी संबंध जोडून पध्दत ठरवता येत नसल्यामुळे बिगर सिंचनाच्या पध्दतीपेक्षा वेगळी अशी सिंचित क्षेत्र आणि राज्याची सरासरी पिक पध्दत यावर आधारित प्रत्येक पिकाचा दर ठरवून एकूण मिळणारा महसूल काढण्यात येईल. हा महसूल

घनमापन क्षेत्राचा भाग वगळून प्रवाही कालव्याच्या क्षेत्रासाठी असलेल्या देखभाल दुरुस्ती खर्चाच्या वाटयाशी जुळला पाहिजे. या निर्धारणामध्ये भूधारणेवर आधारित सवलतींचा विचार केला पाहिजे कारण त्यामध्ये लक्षणीय प्रमाणात महसूलात घट होऊ शकते. जर एकूण मिळणारा महसूल जास्त असेल तर दर कमी करावे लागतील तसेच जर मिळणारा महसूल कमी असेल तर पिकाच्या एकूण उत्पादन मूल्याशी निगडीत वरच्या मर्यादा पाळून दर वाढवावे लागतील.

**परिशिष्ट ७.१**
**(परिच्छेद क्र. ७.१८)**

## लघुवितरिका स्तरावरील पाणी वापर संस्थेकरिता कृषिवापराचे घनमापन दर परिगणित करण्याची पध्दत

(सन २०१४-१५ साठी अंदाजित केलेल्या आकडेवारीनुसार परिगणना करावी)

१. गृहित - महाराष्ट्र जलक्षेत्र सुधार प्रकल्पातील बहुतेक प्रकल्पांच्या प्रणालीची पुनर्स्थापना कामे सन २०१४-१५ पर्यंत पूर्ण होणार असल्याने एकंदर कार्यक्षमता ०.४८ व लघुवितरिकेपर्यंतची कार्यक्षमता ०.६४ घेतली आहे.

२. प्रचालन व परिरक्षण खर्चाचा कालव्याच्या सिंचनाचा भाग 'C' मानू.

३. सिंचनासाठी वापरलेले एकूण घनमापित पाणी '$V_1$' मानू.

४. लघुवितरिकांमध्ये पाणी वापर संस्थांनी वापरलेले एकूण घनमापित पाणी $V_2$ (लघुवितरिका मुखाशी) मानू.

५. कालव्याच्या मुखाशी पाणी वापर संस्थासाठी सोडलेले पाणी = $V_2$/०.६४ = $V_3$ मानू.

६. पाणी वापर संस्थांचा प्रचालन व परिरक्षण खर्चाचा भाग = $C \times \frac{V_3}{V_1} = C_1$

७. पाणी वापर संस्थांसाठी घनमापन पुरवठयाचा दर = $C_1/V_3$

हा दर रबी हंगामाचा असेल

टीप : आवश्यकता वाटल्यास वरील दरात २५ % सवलत देण्याचा विचार करता येईल.

८. खरीप साठी घनमापन दर रब्बी हंगामाचे दराच्या ५० % प्रस्तावित आहे आणि उन्हाळी हंगामात १५० % प्रस्तावित आहे. चर्चेअंती (सल्लामसलती नंतर) या दरांची बदलण्याची मर्यादा अंतिम करण्यात येईल.

************************************************************************

**महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण**

**Maharashtra Water Resources Regulatory Authority (MWRRA)**

9th Floor, Centre-1, World Trade Centre, Cuffe Parade, Mumbai – 400 005, India
Phone : 22152019 / Fax : 22153765, Web : www.mwrra.org E-Mail: mwrra@mwrra.org